
सप्टेंबर २०१६ / पाने ६० / किंमत ₹१०/-

# लोकराज्य

## आपले पोलीस

### सदैव - सुसज्ज, तत्पर, दक्ष...



महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)**

माझा महाराष्ट्र स्वच्छ महाराष्ट्र

स्वच्छ महाराष्ट्रासाठी १८ लाख

कुटुंबस्तर

# संवाद अभियान

२२ ऑगस्ट ते ०२ ऑक्टोबर २०१६

**भेटीगाठी... स्वच्छतेसाठी!**

## स्वच्छतेतील आपल्या प्रगतीचा चढता आलेख आणखी वर नेऊया!

शौचालयाची गरज आणि महत्त्व पटवून देण्यासाठी कुटुंबस्तर अभियानाअंतर्गत शौचालय नसणाऱ्या १८ लक्ष कुटुंबांना भेटी दिल्या जाणार आहेत. या अभियानात सहभागी होवून आपण आपला महाराष्ट्र स्वच्छ महाराष्ट्र करण्यासाठी हातभार लावू आणि अभियान यशस्वी करू!









“राज्यातील सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि शासकीय यंत्रणेने या अभियानात सामाजिक जबाबदारीच्या भावनेने गृहभेटींमध्ये सहभागी होऊन 'स्वच्छ महाराष्ट्राचे स्वप्न' पूर्ण करण्यास हातभार लावावेत.”

पश्चिम भारतातील सिंधुदुर्ग हा पहिला 'हागणदारीमुक्त जिल्हा' घोषित

राज्यातील १५ तालुके हागणदारीमुक्त घोषित

सन २०१९ पर्यंत राज्य हागणदारीमुक्त करण्याच्या दिशेने वाटचाल



मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. ना. श्री. बबनराव लोणीकर
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य

**भेटीगाठी... स्वच्छतेसाठी!**



महाराष्ट्र पोलीस

# अंतरंग



६

## सदैव तत्पर, सुसज्ज

खून, मारामारी, दरोडा ते दहशतवादी कारवाया, संगणकीय गुन्हे अशा गुन्ह्यांमधील जप्त नमुने, प्रदर्शित पुराव्यांचे विश्लेषण, भौतिक पुरावे या सगळ्या गोष्टींची गुन्हासिद्धतेत महत्त्वपूर्ण भूमिका असते.

## आम्ही समर्थ...

महाराष्ट्र पोलीस दल हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे दल आहे. २ लाख २० हजार अधिकारी व कर्मचारी पोलीस दलात विविध पदांवर कार्यरत आहेत. ११ कोटी जनतेची सुरक्षा आणि सुव्यवस्थेचे दायित्व या दलावर आहे.



१०

## सुरक्षेचा प्रहरी

वाढती लोकसंख्या व शहरीकरणामुळे नागरिकांना सुरक्षा पुरवणे ही शासन व पोलीस खात्याची महत्त्वाची जबाबदारी आहे.



ती पार पाडण्यासाठी राज्यात गुन्हे अन्वेषण विभागामार्फत क्राईम, क्रिमीनल, ट्रेकींग, नेटवर्क व सिस्टीम (सीसीटीएनएस) हा प्रकल्प यशस्वीरीत्या महाराष्ट्रात राबवला जात आहे.

१६

## सायबर सिद्धता

महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत राज्यात ५१ ठिकाणी अत्याधुनिक 'सायबर सेल' स्थापन करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्टला एकाच दिवशी पहिल्या टप्प्यात ४२ सायबर लॅबचा राज्यभरात शुभारंभ झाला..



२०


| | |
|---|---|
| सदैव तत्पर, सुसज्ज | ६ |
| आम्ही समर्थ... | १० |
| सायबर गुन्हेगारांनो सावध... | १२ |
| शिक्षेचे प्रमाण वाढले | १३ |
| सुरक्षित रस्ते, सुरक्षित प्रवास.. | १४ |
| सुरक्षेचा प्रहरी | १६ |
| तिसरा डोळा | १८ |
| अपराधसिद्धी वाढली.. | १९ |
| सायबर सिद्धता | २० |
| सोशल मीडियावर बदनामी | २२ |
| पोलीस सेवा ऑनलाइन | २४ |
| नक्षलींवर नियंत्रण... | २६ |
| सुरक्षा महिलांची | २८ |
| दामिनी | ३१ |
| सुधारणा व पुनर्वसन | ३२ |
| नागरी हक्कांचे संरक्षण | ३५ |
| सामाजिक बहिष्कारमुक्ती | ३६ |
| उत्तम निवारा, उत्कृष्ट निवास | ३८ |
| शांततेतून समृद्धीकडे | ४० |
| इथे कर माझे जुळती... | ४२ |
| 'मुस्कान'चा आनंद | ४३ |
| येथे घडतात अधिकारी | ४४ |
| पोलीस दलात कसे याल? | ४६ |
| दक्षताः रंजन आणि प्रबोधन | ४८ |
| 'हे' आणि 'ते' म्हणजे काय? | ४९ |
| पोलीस आपल्या सेवेत... | ५० |
| स्पर्धा परीक्षा | ५२-५५ |
| हाजराफॉल धबधबा | ५६ |


## तिसरा डोळा

शहरांची सुरक्षितता व सुव्यवस्थेचे गुणात्मकरीत्या व्यवस्थापन करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा प्रभावी उपयोग



जगभरात केला जात आहे. ही बाब लक्षात घेऊन मुंबई व महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रभावीपणे राबवण्याचा संकल्प शासनाने केला आहे.

१८

## पोलीस सेवा ऑनलाइन



पोलीस दलाने जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहावे, यासाठी गृहविभागाने गेल्या दोन वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या विभागाने अधिसूचित केलेल्या सेवा ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या ऑनलाइन सेवांमुळे नागरिकांच्या वेळेत आणि खर्चात बचत झाली आहे..

२४

वर्ष ६८ वे | अंक ३ | सप्टेंबर २०१६

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

## संपादन

- अतिथी संपादक — के. पी. बक्षी
- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in




@Dev_Fadnavis

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असतात. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिन्याभरातील त्यांचे काही ट्विटस्.**

निवडणूक काळात तैनात असलेल्या पोलिसांना एक महिन्याचा पगार देण्याची घोषणा करताना...

Announced grant of 1 month basic salary as a remuneration to all the police officials & employees working on election duty since 2014.

कायदा व सुव्यवस्थेविषयी बोलताना...

Rule of law is the most important thing for development of a person, of the society & of democracy; we all need to strictly abide by it.

पोलिसांसाठी गृहनिर्माणाविषयी...

Officials made presentation with a roadmap to construct around 75000 houses for police personnel till March 2018.

पोलिसांच्या चांगल्या कामगिरीची स्तुती करताना...

CM congratulates all the police officials for their concentrated and focused efforts in increasing the rate of conviction significantly.

सायबर लॅबच्या उद्घाटनानंतर...

I congratulate Team Maharashtra Police as we launched 38 Cyber Labs & Cyber Police Force all across Maharashtra

डिजिटल पोलीस फोर्सविषयी...

With @DigitalIndia mission, our cities & villages are becoming smart. But I'm happy that we are ready with our digital police force too.

नागपूर पोलिसांच्या कामगिरीविषयी...

US Consul General appreciates @NagpurPolice for ensuring Ms Chen's safety! Great team work! Well done @NagpurPolice

पुणे येथे ई-कम्प्लेंटची सुविधा कार्यान्वित केल्यानंतर...

All police stations are online and digitally connected. Now we are trying for e-complaint project & launched it on pilot basis for Pune.

# आपले पोलीस, आपला अभिमान



'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय', हे ब्रीदवाक्य घेऊन महाराष्ट्र पोलीस दल २४x७ वर्षभर राज्याच्या जनतेच्या सेवेत कार्यरत आहे. देशातील क्रमांक दोनचे हे पोलीस दल अत्यंत सक्षम, समर्थ आणि आधुनिक शस्त्रांनी सज्ज आहे. महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे पुरोगामी आणि प्रगतिशील राज्य आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई आणि महाराष्ट्रात घडणाऱ्या घटना घडामोडींचा मोठा व्यापक परिणाम देश आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही होत असतो. त्यामुळेच महाराष्ट्रातील पोलीस दलास सदैव जागरूक राहावे लागते. नागरिकांना सर्व प्रकाराचे संरक्षण पुरवण्यासाठी अतिशय कसोशीने प्रयत्न या दलामार्फत केले जातात.

गेल्या काही वर्षात अनेक प्रकारच्या सामाजिक, आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. दहशतवादी, नक्षलवादी कारवाया वाढल्या आहेत. सायबर गुन्ह्यांची तीव्रता वाढत आहे. पण या साऱ्या आव्हानांचा सामना राज्याचे पोलीस दल करत आहे. या बदलांचा अंगीकार करून पोलीस दलामार्फत स्वत:ला प्रशिक्षित आणि ज्ञानसंपन्न करण्यासाठी सर्वप्रकारचे प्रयत्न अथकरीत्या होत आहेत. पोलीस दलाने केलेल्या प्रभावी कार्यवाहीमुळेच राज्यातील नक्षली कारवायांवर मोठ्या प्रमाणावर यश मिळू शकले. महाराष्ट्राच्या पोलीस दलाच्या या नक्षली कारवायांचे हे मॉडेल इतर नक्षलग्रस्त राज्यांसाठी उपयुक्त ठरत आहे.

गेल्या दोन वर्षात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस यांनी गृहविभागास वेगळ्या गुणात्मक उंचीवर नेले आहे.त्यामुळेच आज महाराष्ट्रात विविध प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे. गुन्ह्यांच्या सिद्धतेमध्ये वाढ झाली आहे.पोलीस दल अधिक आधुनिक होत असून माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीरीत्या केला जात आहे. हेल्पलाइन्स, वेबसाइट विविध ॲप्स अशा बाबींद्वारे पोलीस विभाग अधिकाधिक नागरिकांशी जोडले जात आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी सीसीटीव्हीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम मुंबई, पुणे, नागपूर आदी शहरांमध्ये राबवण्यात येत आहे. पोलीस ठाण्यांमध्येही सीसीटीव्हीची यंत्रणा उभारण्यात आली आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनी राज्यात ४२ ठिकाणी सायबर लॅबची सुरुवात करण्यात आली. सागरीसुरक्षा आणि वाहतूकसुरक्षेवरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पोलीस दलात नवी भरती केली जात असून,त्यांना अत्याधुनिक प्रशिक्षण दिले जात आहे. महिला, बालक आणि वृद्धांना अधिक सुरक्षितता मिळावी, त्यांच्यावरचे अन्याय, अत्याचार कमी व्हावेत, त्यांना अधिक आत्मविश्वास मिळावा यासाठी पोलीस दल कार्यरत झाले आहे.

महाराष्ट्र पोलीस दलाने आपला चेहरा मानवी असावा, असा कायमच प्रयत्न केला आहे. नागरिकांच्या साहाय्याने हे दल आज महाराष्ट्राची शांतता आणि सुव्यवस्था अतिशय उत्तमरीत्या कायम ठेवण्यात यशस्वी ठरत आहे. कोणत्याही प्रदेशाची कायदा आणि सुव्यवस्था जेव्हा उत्तम असते तेव्हा त्या प्रदेशात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित होते. त्यातून रोजगार आणि स्वंयरोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि त्या प्रदेशाच्या समृद्धीस हातभार लागतो. महाराष्ट्राची समृद्धी आणि चौफेर विकासास अतिशय समर्थरीत्या हातभार लावण्याचे कार्य पोलीस दल करत आहे.

या सर्व बाबींचा आढावा लोकराज्यच्या सप्टेंबरच्या अंकात घेण्यात आला आहे. हा अंक महाराष्ट्राच्या जनतेला पोलीस दलाविषयी माहिती तर देईलच, शिवाय पोलीस दलाविषयी अभिमानही निर्माण करेल, असा मला विश्वास वाटतो.

**के. पी. बक्षी**
**(अतिथी संपादक)**

# सदैव तत्पर, सुसज्ज

**खून, मारामारी, दरोडा ते दहशतवादी कारवाया, संगणकीय गुन्हे अशा गुन्ह्यांमधील जप्त नमुने, प्रदर्शित पुराव्यांचे विश्लेषण, भौतिक पुरावे या सगळ्या गोष्टींची गुन्हासिद्धतेत महत्त्वपूर्ण भूमिका असते. पोलिसांना अद्ययावत वाहनांपासून नव्या तंत्रज्ञानांनी पूर्ण प्रयोगशाळांनी सज्ज राहावे लागते.**




**सदैव तत्पर, सदैव मदतीस:** बृहन्मुंबई शहरामध्ये महिला व बाल सुरक्षा, गस्तीसाठी आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या ताफ्यामध्ये सुरक्षा बहाल करण्यासाठी उच्च इंजिन क्षमतेची वाहन व्यवस्था.

तपासातील तत्परता आणि गतिशील शोधासाठी अचूक माहिती आवश्यक असते. त्यामुळे माहितीची देवाणघेवाण शीघ्रतेने होणे क्रमप्राप्त ठरते. पोलीस दल आता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून माहितीचे आदानप्रदान करीत आहे.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आधिपत्याखालील मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नांदेड व कोल्हापूर या ठिकाणी एकूण आठ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. या प्रयोगशाळेत खून, मारामारी, दरोडा, बलात्कार, हुंडाबळी, मादकपदार्थ सेवन, अग्निशस्त्र, दहशतवादी कारवाया, स्फोटके, मद्य व रक्तमद्यार्क, संगणकीय गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित इ. गुन्ह्यांमधील जप्त नमुने / प्रदर्शित पुराव्यांचे विश्लेषण करून, याबाबतचा रासायनिक विश्लेषण अहवाल संबंधित पोलीस ठाण्यास; पाठवला जातो. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये रासायनिक विश्लेषण अहवाल, हा एक भक्कम पुरावा

म्हणून दाखल करून घेतला जातो. वरील बाबी विचारात घेऊन, न्यायालयीन प्रक्रियेतील बहुतांश महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये रासायनिक विश्लेषण अहवाल देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यास साक्ष देताना किंवा उलटतपासणी करताना जिल्ह्यांमधील वेगवेगळ्या सत्र व फौजदारी न्यायालयामध्ये उपस्थित राहावे लागते. व्हिडीओ कॉन्फरसिंग सुविधेद्वारे न्यायालयास संबंधित तज्ज्ञांची साक्ष उपलब्ध करून दिल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या वेळेचा अपव्यय तसेच; होणाऱ्या शासकीय खर्चाची बचत होण्यास मदत होऊ शकेल. यासाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये व्हिडीओ कॉन्फरसिंग सुविधा कार्यान्वित केली आहे.

### विशेष प्रशिक्षण कार्यक्रम

न्यायालयीन प्रक्रियेत गुन्हा सिद्धतेचे प्रमाण वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून या प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या विविध यंत्रणांमध्ये समन्वय निर्माण होण्यासाठी पाच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये पोलीस अधिकारी, न्यायसहायक तज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी व सरकारी अभियोक्ते यांनी सहभाग घेतला. सदर प्रशिक्षणामध्ये संबंधित यंत्रणामध्ये करण्यात येणाऱ्या कामकाजाबाबत, निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत, तसेच भविष्यकाळात गुन्हा सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी सुधारणा सुचविण्याबाबत; एकत्रितपणे चर्चासत्र तसेच प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये न्यायसहायक तज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी, संबंधित यंत्रणांमधील अनुभवी अधिकारी तसेच सरकारी अभियोक्ते यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. याच प्रकारच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम सेंटर फॉर पोलीस रिसर्च, पुणे येथेही आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणांमध्ये विविध यंत्रणांमधील जवळपास २५० अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

### कोल्हापूर व नांदेड येथे न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा

नांदेड येथे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथील जागेत सर्व सोयीयुक्त व अत्याधुनिक यंत्रसामग्रीसह प्रयोगशाळा सुरू करण्यात आली.

या प्रयोगशाळेच्या अखत्यारित परभणी, हिंगोली व लातुर जिल्ह्यांतर्गत घडणाऱ्या गुन्ह्यांमधील परिस्थितीजन्य पुराव्यांच्या विश्लेषणाचे काम सुरू करण्यात आलेले आहे. सदर प्रयोगशाळेत सामान्य विश्लेषण व उपकरणीय, विषशास्त्र, जीवशास्त्र व रक्तजलशास्त्र आणि दारुबंदी व उत्पादन शुल्क या विभागातील कामकाज सुरू करण्यात आले आहे.

कोल्हापूर येथेही सर्व सोयीयुक्त आणि अत्याधुनिक सुसज्ज यंत्रसामुग्रीसह नवीन प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारतीमध्ये सुरू करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेच्या अखत्यारित सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतर्गत घडणाऱ्या गुन्ह्यांमधील परिस्थितीजन्य पुराव्यांच्या विश्लेषणाचे कामकाज सामान्य विश्लेषण व उपकरणे, विषशास्त्र, जीवशास्त्र व रक्तजलशास्त्र आणि दारूबंदी व उत्पादन शुल्क विभागांमध्ये सुरू करण्यात आले आहे.

### उच्च इंजिन क्षमतेची विशेष वाहने

राज्य पोलीस दलाकडील सध्या महत्त्वाच्या आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेसाठी त्यांच्या वाहनांस सुरक्षा प्रदान करताना वापरण्यात येणारी वाहने उपलब्ध निधीच्या प्रमाणांत खरेदी करण्यात येत असल्याने; ती वाहने कमी क्षमतेच्या इंजिनची आहेत. त्यामुळे ही वाहने महत्त्वाच्या आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या उच्च इंजिन क्षमतेच्या वाहनांसोबत धावू शकत नाहीत. पर्यायाने महत्त्वाच्या आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेमध्ये बाधा निर्माण होते. ही बाब विचारात घेऊन राज्यातील महत्त्वाच्या व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेसाठी उच्च इंजिन क्षमतेची एकूण १०६ वाहने खरेदी करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून; त्यानुसार, मुंबईव्यतिरिक्त राज्यातील सर्व ९ पोलीस आयुक्तालयांसाठी प्रत्येकी दोन प्रमाणे ३६ आणि ३५ जिल्ह्यांकरिता प्रत्येकी दोनप्रमाणे ७० वाहने खरिदी करण्यात येणार आहेत.

### पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रम

पोलीस दल आधुनिकीकरण योजना २000-0१ या वर्षापासून राबवण्यात येत आहे. ही योजना केंद्र साहाय्यित योजनेतर



## पोलीस दलात आधुनिक तंत्रज्ञानावर भर

**पोलीस दलाने जनतेत राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यासाठी समाजातील वेगवेगळ्या घटकांशी विचारविनिमय करावा. सर्वमान्य राष्ट्रीयतेच्या बाबींचा वापर करून जनतेत सलोखा राखण्याचे काम करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे राज्यात सन २०१४ मध्ये असलेला दोषारोप सिद्धीचा दर १९.३ टक्क्यांवरून ३३.५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. विविध गुन्ह्यांमध्ये साक्षीदार बदलतात, यापुढे मानवी साक्षीवर फारसे अवलंबून न राहता तांत्रिक साक्षींवर भर द्यावा लागणार आहे. यासाठी राज्यात फॉरेन्सिक लॅबची संख्या वाढवण्याबरोबरच त्यांचे सक्षमीकरण करण्यात येत आहे. आधुनिक काळात राज्याचे पोलिसिंग तंत्रज्ञानाधारित होण्यासाठी सीसीटीएनएस प्रणाली राबवण्यात येत आहे. त्यासाठी सायबर लॅबची स्थापना करण्यात आली आहे. अधिकाधिक पोलिसांना घरे देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. ही घरे उपलब्ध करून देण्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. पोलिसांसंबंधित प्रस्तावांना तत्काळ मंजूरी दिली जाईल.**

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**




## फिरते न्यायसहायक वैज्ञानिक पथक

**शासनाने गुन्हा सिद्धतेच्या प्रमाणात वाढ होण्याच्या उद्देशाने ४५ फिरत्या न्यायसहायक वैज्ञानिक पथकांची स्थापना केली आहे. ही पथके राज्यातील ३५ जिल्हे व ९ पोलीस आयुक्तालयांमध्ये कार्यरत राहतील. एका पथकात न्यायवैद्यक तज्ज्ञ (सहायक रासायनिक विश्लेषक), फिंगरप्रिंट तज्ज्ञ, छायाचित्रकार, मदतनीस, यांचा समावेश असतो. खून, बलात्कार, दरोडा, घरफोडी अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये, गुन्हा सिद्धतेच्या दृष्टिकोनातून उपयोगी पडू शकणारे भौतिक पुरावे गोळा करण्यासाठी आणि गुन्हेस्थळाची तपासणीकरिता आवश्यक असलेली तांत्रिक साधनसामग्री या पथकाकडे सुपुर्द करण्यात येते. त्यांचा उपयोग करून प्रथमदर्शी चाचण्या केल्या जातात. या चाचण्यांचा पुढील तपासासाठी प्रभावी उपयोग होतो.**

**या फिरत्या न्यायसहायक वैज्ञानिक युनिट्सपैकी, उपलब्ध २५ युनिटचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. बृहन्मुंबईसाठी २, ठाणे ग्रामीण, सोलापूर, पुणे शहर, पुणे ग्रामीण, उस्मानाबाद, औरंगाबाद शहर, अमरावती ग्रामीण, नागपूर शहर, नाशिक शहर, नांदेड तसेच, ठाणे शहर, नवी मुंबई, रायगड, नंदूरबार, जळगांव, अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, बीड, जालना, अकोला, नागपूर ग्रामीण आणि चंद्रपूर अशा २३ जिल्ह्यांमध्ये युनिट्स वाटप करण्यात आले आहे.**

योजना आहे. या योजनेंतर्गत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्यासह राज्य पोलीस दल, होमगार्डस् व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय यांना आवश्यक वाहने, संगणक व त्यानुषंगाने आवश्यक साधनसामग्री, शस्त्रे व दारूगोळा, संपर्कासाठी आवश्यक साधनसामुग्री, यांच्या खरेदीसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थाने आणि पोलीस ठाणी व कार्यालयांसाठी तसेच इमारती बांधकामासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो.

या योजनेमुळे शासनास अंतर्गत अत्याधुनिक शस्त्रास्त्रे व दारूगोळा आणि वाहने खरेदी करणे शक्य झाले आहे.

### सिद्धार्थ रुग्णालय, गोरेगाव, मुंबई येथे नवीन शवविच्छेदन केंद्र

सर्व जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, इतर शासकीय रुग्णालये आणि काही महापालिका रुग्णालये येथे शवविच्छेदनाची सुविधा उपलब्ध आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूचे कारण ज्ञात नसल्यास, पोलीस विभागाकडून शवविच्छेदनाची विनंती केली जाते. गुन्हे अन्वेषणासाठीही शवविच्छेदन काही वेळा आवश्यक ठरते. ही बाब विचारात घेऊन सर्व रुग्णालयांमध्ये संध्याकाळनंतरही २४ तास शवविच्छेदनाची सुविधा उपलब्ध करण्याचे शासनाने निर्देश दिले आहेत.

मुंबईमधील वाढती लोकसंख्या आणि विशेषत: सध्या चालू असलेल्या कूपर इस्पितळ, अंधेरी आणि भगवती रुग्णालय, बोरीवली येथील शवविच्छेदन केंद्रांमधील शवविच्छेदन प्रकरणांच्या संख्येमध्ये झालेली वाढ आणि उत्तर मुंबईमध्ये नवीन शवविच्छेदन केंद्राची आवश्यकता विचारात घेऊन गोरेगाव, मुंबई येथील सिद्धार्थ रुग्णलयाच्या आवारात ०१ मार्च, २०१६ रोजी नवीन शवविच्छेदन केंद्र सुरू करण्यात आले.

त्यानुसार बोरीवली व कूपर शवविच्छेदन केंद्रांच्या अंतर्गत येणारी पोलीस ठाणी, सिद्धार्थ शवविच्छेदन केंद्राला जवळ असलेली पोलीस ठाणी यांची विभागणी करण्यात आली आहे. हे शवविच्छेदन केंद्र चालू करण्यासाठी पोलीस शल्य चिकित्सक, मुंबई यांच्या आस्थापनेवरील इतर शवविच्छेदन केंद्रातील काही वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी यांना प्रतिनियुक्ती देण्यात येऊन, प्रत्यक्षात शवविच्छेदनाच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली आहे. या शवविच्छेदन केंद्राशी १) गोरेगाव २) ओशिवरा ३) जोगेश्वरी ४) मेघवाडी ५) अंबोली ६) वर्सोवा ७) डी.एन. नगर ८) बांगुर ९) दिंडोशी १०) कुरार ११ ) आरे १२) वनराई ही पोलीस ठाणी संलग्न आहेत.

### साप्ताहिक सुट्टी मोबदला

सण-उत्सवाच्या काळात पोलीस कर्मचाऱ्यांना मात्र कामावर हजर राहावे लागते. अशा वेळी त्यांच्या या कामाचा सन्मान म्हणून एका पूर्ण दिवसाचा पगार

## पोलीस अधीक्षक आता विभाग प्रमुख

राज्य पोलीस दलातील जिल्हा पोलीस अधीक्षक / राज्य राखीव पोलीस बल गटाचे समादेशक हे संबंधित घटकाचे घटक प्रमुख असल्याने संपूर्ण जिल्ह्याची जबाबदारी त्यांच्याकडे असते. राज्य पोलीस दलामध्ये पोलीस अधीक्षक दर्जाचे अधिकारी यांचे वेतन हे त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार तीन वेगवेगळ्या वेतनश्रेणींमध्ये विभागलेले आहे. मात्र पोलीस अधीक्षक दर्जाच्या कोणत्याही अधिकाऱ्याची जिल्हा पोलीस अधीक्षक, राज्य राखीव बल गटाचे समादेशक, विशिष्ट घटकाचे पोलीस अधीक्षक अथवा प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र या पदावर शासनाकडून नियुक्ती केली जाते. त्यामुळे राज्य पोलीस दलातील सर्व पोलीस अधीक्षक व राज्य राखीव गटातील समादेशक यांना, वित्तीय बाबींकरिता विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे पोलीस दलाच्या कार्यक्षमतेमध्ये गतिमानता आलेली आहे.




देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगिक भरभराट आणि विविध साजरे होणारे धार्मिक सण (गणेशोत्सव, ईद, नवरात्र, दिवाळी), राजकीय स्तरावर महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी, अचानक उद्भवणारे दंगे, जातीय तणाव, अपुरे मनुष्यबळ अशा अनेक कारणांमुळे पोलीस कर्मचारी यांना सातत्याने १२ तासांपेक्षा जास्त काळ कामावर हजर राहावे लागते. त्यामुळे साप्ताहिक सुट्टी उपभोगता येत नाही. यापूर्वी पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या हुद्द्यावर कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी कामावर हजर राहिल्यास वेतनानुसार अल्प मोबदला मिळत होता. (वेतनानुसार किमान रु. ६८/- व कमाल रू. १०५/- फक्त) त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना होती. आता या कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात एक दिवसाचे वेतन मंजूर करण्याचा निर्णय लागू केला आहे.

## बृहन्मुंबईत महिला सुरक्षेकरिता ९४ वाहने

बृहन्मुंबई शहरामध्ये महिला व बाल सुरक्षेसाठी/गस्तीसाठी बृहन्मुंबई पोलीस दलातील ९४ पोलीस ठाण्यांकरिता प्रत्येकी एक याप्रमाणे अत्याधुनिक प्रकारातील मारुती एर्टिगा वाहने खरेदी करण्यात येतील. या वाहनामध्ये रायफल, शिल्ड, लाठी व ॲमिनेशन ठेवण्याकरिता सोय करण्यात आली आहे.
या वाहनामध्ये बिनतारी संदेश




संच, पब्लिक ॲड्रेस सिस्टिम बसवण्यात आली आहे. या वाहनांचा उपयोग पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये महिला व बालकांवर होणारे अत्याचार रोखण्याकरिता केला जात असून या वाहनामध्ये प्रत्येकी एक महिला अधिकारी व दोन महिला कर्मचारी कार्यरत असतील. या वाहनांकडून मुख्य नियंत्रण कक्षाकडून संदेश प्राप्त होताच घटनास्थळी जाऊन त्वरित कार्यवाही करण्यात येते. तसेच, या वाहनाद्वारे पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये देखील गस्त केली जाते.

# आम्ही समर्थ...

**महाराष्ट्र पोलीस दल हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे दल आहे. २ लाख २० हजार अधिकारी व कर्मचारी पोलीस दलात विविध पदांवर कार्यरत आहेत. ११ कोटी जनतेची सुरक्षा आणि सुव्यवस्थेचे दायित्व या दलावर आहे. पोलीस दलामध्ये वेळोवेळी नवीन सुधारणा आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. महाराष्ट्रातील पोलीस दल हे देशातील सर्वाधिक अद्ययावत आहे..**

२०१५ मध्ये शासनाने सर्व पोलीस घटकांना मोबाइल फोरेन्सिक व्हॅन (फिरती न्यायसहायक / न्यायवैद्यक प्रयोगशाळा) दिल्या. गुन्ह्यांच्या तपासकामी मदत करण्यासाठी ४५ पैकी २५ मोबाइल व्हॅन, जिल्ह्यांना व पोलीस आयुक्तालयांना पुरवण्यात आल्या आहेत. सी.सी.टी.एन.एस. (क्राइम अॅण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अॅण्ड सिस्टिम) प्रणालीमध्ये उल्लेखनीय प्रगती झाली आहे. एकूण १०५४ पोलीस ठाण्यांपैकी १०५१ पोलीस ठाणी या प्रणालीद्वारे जोडली गेली आहेत. याअंतर्गत नागरिकांना सुलभ सेवा देण्यासाठी, सिटीझन पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यामध्ये या वेबपोर्टलवरून नागरिकांना ई-तक्रार नोंद करण्याची सुविधा पुणे शहर येथे प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे.

नागरिकांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या पोचपावतीची प्रत काढता येते. त्याच्या सर्व्हिस रिक्वेस्ट नंबरद्वारे सद्य:स्थितीची माहितीदेखील प्राप्त करता येते. संबंधित गुन्ह्याची प्रथम खबर (एफआयआर) दाखल करण्यासाठी नागरिकांना स्थानिक पोलीस ठाण्यास जावे लागते. गुन्ह्याच्या तपासातील अद्ययावत प्रगतीची माहिती तक्रारदार/ फिर्यादी यांना एस.एम.एस. संदेश पाठवून दिली जाते. गुन्हा दाखल केल्याबाबत, आरोपी अटक केल्याबाबत आणि गुन्ह्यांचा अंतिम अहवाल इत्यादीबाबतची माहिति



तक्रारदाराने दिलेल्या मोबाईल नंबरवर एस.एम.एस. संदेशाद्वारे दिली जाते.

**सदैव साहाय्यासाठी: टोल फ्री नंबर १००, १०९८, १०३, १०९०**

### सक्षमीकरण

राज्यातील पोलीस दलाचे बळकटीकरण करण्यासाठी २०१४-१५ मध्ये १०४४३ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

मागील २ वर्षांत पोलीस दलामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या. पोलीस दलाचे बळकटीकरण आणि सक्षमीकरण करण्यात आले. त्यामुळे राज्यातील गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे.

### पोलीस मित्रांचा सहभाग

सर्व पोलीस घटकांना पोलीस मित्रांचा जास्तीत जास्त सहभाग घेऊन गुन्हेगारीस आळा घालण्याच्या सूचना देण्यात आल्या. गुन्ह्यात घट झाली आहे. पोलीस मित्रांकरिता मोबाईल ॲपसुद्धा तयार करण्यात आले आहे. हे ॲप ९१ हजारांपेक्षा जास्त लोकांनी डाऊनलोड केले आहे. तसेच या ॲपद्वारे नवीन पोलीस मित्रांनांही या कामात सहभाग घेता येतो. या ॲपद्वारे अनुचित घटनेची तक्रार/ आगाऊ माहिती पोलिसांना उपलब्ध होते. पोलीस उपअधीक्षक व सहायक पोलीस आयुक्तांमार्फत दारू व जुगारासंबंधी दर आठवड्याला २ क्वॉलिटी रेड टाकण्यात येतात. दिवसा व रात्रीच्या वेळी पोलीस गस्तमध्ये वाढ करून, गुन्ह्यांना वेळीच प्रतिबंध करण्यात आले आहेत.

प्रत्येक पोलीस घटकांच्या नियंत्रण कक्षास व्हॉट्सॲप मोबाइल सुविधा उपलब्ध आहे. त्यांचे व्हॉट्सॲपग्रुप तयार करण्यात आले आहेत. त्याद्वारे जनजागृती केली जाते. त्यावर सूचना दिल्या जातात.

पोलीसठाणे हद्दीत गर्दीच्या ठिकाणी, शाळा व महाविद्यालये, धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसवण्यात आले आहेत. यामुळे गेल्या २ वर्षात २२६३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

### जनजागृती

शाळा, कॉलेज इत्यादी ठिकाणी कायदेविषयक तसेच वाहतूक नियमांविषयक माहिती दिली जाते. वसतिगृहे व महिला आश्रम येथे वेळोवेळी भेटी दिल्या जातात.

पोलीस महासंचालक यांनी चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांना आळा घालण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी व पोलीस गस्त व कायम स्वरूपाचे फिक्स पॉईंट केले आहेत. अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. पोलीसठाणे हद्दीतील हौसिंग सोसायटींची यादी करून अध्यक्ष/ व्यवस्थापक यांच्यासोबत व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आले आहेत. घरफोडी टाळण्याच्या अनुषंगाने व्हॉट्सॲपमार्फत सूचना दिली जाते. पर्यटनस्थळाच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेण्यात येते.

## पोलीस मित्र

**शांतता** समित्या व /पोलीस मित्र समित्यांची पुनर्रचना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यात वेगवेगळ्या स्तरावर समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हास्तरावरील समिती, आयुक्तालय स्तरावरील समिती, तालुकास्तरावरील समिती, परिमंडळ स्तरावरील समिती, पोलीस ठाणे स्तरावरील समिती यांचा समावेश आहे.

जिल्हास्तरावरील व पोलीस आयुक्तलयातील मुख्यालय स्तरावरील शांतात समितीमध्ये ३0ते ४0 सदस्य व तालुका /परिमंडळ व पोलीस ठाणे स्तरावरील शांतता समितीमध्ये २0ते २५ सदस्य असतील. समितीमध्ये अशासकीय सदस्यांच्या नेमणुका करून त्यांची नावे अनुक्रमे जिल्हा दंडाधिकारी/ पोलीस आयुक्त यांच्याकडून मान्य करून घेण्यात येतात. महत्त्वाचे सण व धार्मिक उत्सव, तसेच जातीय तणाव जेव्हा निर्माण होतात, अशा प्रत्येक वेळी शांतता समितीची बैठक आयोजित केली जाईल. समितीवर नियुक्ती करताना, शांतता समितीमध्ये त्यांच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या लोकांचा समावेश केला जाईल. स्थानिक राजकीय नेते, वकील, पत्रकार, शिक्षक यांना प्राधान्य दिले जाईल. शांतता समितीच्या कक्षेमध्ये वेगवेगळ्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये जातीय तणाव, दंगल, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सरकारी यंत्रणेशी संपर्क यासारख्या विषयांचा ही समिती परामर्श घेईल.

पोलीस मित्र समितीची रचना व एकूणच कार्यपद्धती लक्षात घेऊन शहरी तसेच ग्रामीण भागात पोलीस मित्र समित्या स्थापन करण्यात येतील. पोलीस मित्र समितीच्या रचनेमध्ये साधारणतः २० ते २५ व्यक्ती असतील. या समित्या पोलीस ठाण्याच्या स्तरावर असतील.

पोलीस मित्र समितीच्या सदस्यांची निवड पोलीस ठाण्याच्या मुख्य पोलीस अधिकारी करतील. या समितीत स्थानिक नगरसेवक, आमदार, खासदार, शिक्षक, वकील, पत्रकार, निवृत्त पोलीस अधिकारी तसेच महिलांचा समावेश केला जाईल. सक्रीय राजकीय कार्यकर्ते यांचा समावेश केला जाणार नाही.

कायदा व सुव्यवस्था परिस्थिती उत्तम राहावी, यासाठी पोलीस जनता सहयोगाचे कार्यक्रम आयोजित होतात. पोलीस मित्र समितीचा उपयोग कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता प्रभावीपणे करण्यात येणार आहे.

# सायबर गुन्हेगारांनो सावध...

**पुढील काळात महाराष्ट्र हे सायबर क्राइममध्ये गुन्हेगारांवर अंकुश ठेवणारे अग्रेसर राज्य असणार आहे. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस दलातील १ हजार पोलिसांना सायबर गुन्हे उघडकीस आणण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.**



डॉ. रणजित पाटील

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. नवनवीन तंत्रज्ञान व उपकरणे वापरून गुन्हे करण्याचे प्रमाण यामुळे दिवसेंदिवस वाढत आहे. इंटरनेटच्या माध्यमातून व इतर अनेक अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित घडणाऱ्या गुन्ह्यांची व सायबर गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी जगभरातील तंत्रज्ञान सरकार आत्मसात करत असून, १५ ऑगस्टला एकाच दिवशी ४२ सायबर लॅबचे उद्घाटन राज्यभर करण्यात आले. हा त्याचाच भाग आहे. अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर गृहविभागाचे प्रतिनिधित्व करताना त्या ठिकाणच्या नव्या तंत्रज्ञानाची महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी करण्याबाबत मुख्यमंत्र्यांची आग्रही भूमिका असते. त्यामुळे पुढील काळात महाराष्ट्र हे सायबर क्राइममध्ये गुन्हेगारांवर अंकुश ठेवणारे अग्रेसर राज्य ठरेल. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस दलातील १ हजार पोलिसांना सायबर गुन्हे उघडकीस आणण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

### सीसीटीव्हीला प्राधान्य

संपूर्ण मुंबई शहर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई शहरामध्ये १५०० ठिकाणी एकूण ६०२० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवण्यात आले आहेत. येत्या ऑक्टोबर पर्यंत संपूर्ण मुंबई शहर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स योजनेंतर्गत गुन्हा व गुन्हेगारीचा माग काढण्यासाठी क्राइम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम (सीसीटीएनएस) प्रणाली राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची



कोल्हापूर व नांदेड येथे स्थापना करण्यात आली आहे. तसेच राज्यात ४५ ठिकाणी मोबाइल फॉरेन्सिक सपोर्ट युनिट्स स्थापन करण्यात येत आहेत. १० ठिकाणी हे युनिट स्थापन करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

**डॉ. रणजित पाटील**
गृहराज्यमंत्री (शहरे)

शब्दांकन: विलास बोडके

## आधुनिक सुधारणा

- **१५ ऑगस्ट २०१६ रोजी ४२ सायबर लॅब सुरू**
- **१ हजार पोलिसांना सायबर गुन्हे प्रतिबंध प्रशिक्षण**
- **ऑक्टोबर २०१६ पूर्वी संपूर्ण मुंबई शहर सीसीटीव्ही च्या निगराणीखाली**
- **क्राइम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम (सीसीटीएनएस) प्रणाली राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य**
- **राज्यातील १०४३ पोलीस ठाण्यांची संगणकीय प्रणालीद्वारे जोडणी**
- **राज्यात ४५ ठिकाणी मोबाइल फॉरेन्सिक सपोर्ट युनिट्स**
- **बृहन्मुंबई पोलीस दलासाठी मेगासिटी पोलिसिंग योजना**
- **अनैतिक व्यापाराबाबतच्या खटल्यांच्या निपटाऱ्यासाठी मुंबईत जलदगती न्यायालयाची स्थापना**
- **पोलिसांसाठी १ लाख घरे**
- **मुंबईत वाहतुकीची माहिती मिळण्यासाठी ८४५४९९९९९९ हेल्पलाईन क्रमांक**
- **संकटात सापडलेल्या बालकांसाठी १०९८ टोल फ्री हेल्पलाईन**

# शिक्षेचे प्रमाण वाढले

**ग्रामीण महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था राखताना जनतेला तत्काळ न्याय मिळावा, यासाठी राज्य शासनाने सिद्ध अपराध वाढवण्यासाठी पोलीस दलावर जबाबदारी निश्चित केली आहे. यामुळे शिक्षेचे प्रमाण वाढले आहे. या गुणात्मक वाढीमुळे पोलिसांबद्दल आदर वाढत आहे.**



दीपक केसरकर

देशातील सर्वाधिक जागरूक व दक्ष पोलीस दलाचे बिरुद महाराष्ट्र पोलीस दलाने कायम जोपासले आहे. पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी तसेच बळकटीकरणासाठी पोलीस दलातील बदल्यांच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे, पोलीस गृहनिर्माण महामंडळातील प्रशासकीय मान्यतेचे अधिकार संचालक मंडळास देणे, पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांना साप्ताहिक सुट्टीच्या मोबदल्यात त्यांच्या दैनिक भत्याच्या दरात वाढ करणे, यासारखे महत्त्वाकांक्षी निर्णय घेण्यात आले आहेत.

राजकीय व सामाजिक आंदोलनामध्ये १ जानेवारी २०१४ पूर्वी दाखल झालेले व प्रलंबित असलेले खटले मागे घेणे. राज्यातील महिलांच्या अत्याचाराविरुद्ध कामगिरी करणाऱ्या नागरिकांसाठी शासनाच्या वतीने 'निर्भया 'पुरस्कार देणे, फौजदारी खटल्यातील सिद्धापराध प्रमाण वाढविण्यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबतचे निर्णय घेण्यात आले आहेत. नक्षलवाद्यांबाबत माहिती देणाऱ्या खबऱ्यांच्या बक्षिसात, नक्षलवाद्याच्या हुद्द्यानुसार वाढ करण्याबरोबरच; नक्षलविरोधी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्यातील नक्षल कारवायांमध्ये मागील काही वर्षांच्या तुलनेत घट झाली आहे.

## नव्या सुविधा

न्यायसहायक वैज्ञानिक संस्थेच्या पदव्यांना समकक्ष दर्जा देण्याबरोबरच, राज्यातील गुन्ह्यांच्या तपासकामी, सबळ भौतिक पुरावे गोळा करण्यासाठी; पोलीस अधिक्षक कार्यालयांमध्ये मोबाइल फॉरेन्सिक सपोर्ट युनिट्स स्थापन करण्यात येत आहे. न्यायसाहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यंत्रणेचे सक्षमीकरण करून गुन्ह्यांचा तपासाला गती देण्यात येत आहे. तुरुंगातील कैद्यांच्या मानसिक आरोग्यात सुधारणा करण्याकरिता राज्यातील सर्व तुरुंगामध्ये योगासनाचे वर्ग सुरू करण्यात आले. राज्यातील सर्व कारागृहांच्या सुरक्षा व्यवस्थेची तपासणी (सिक्युरिटी ऑडिट) करण्यात आली. त्यामुळे कारागृहातील गैरकृत्यांवर नियंत्रण आणण्यात





न्यायसाहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यंत्रणेचे सक्षमीकरण

**दीपक केसरकर**

गृहराज्यमंत्री (ग्रामीण)

यश आले. राज्यातील सर्व मध्यवर्ती तुरुंग व न्यायालये यांच्यामध्ये व्हिडीओ कॉन्फरसची सुविधा कार्यान्वित करण्यात आली.

## महिला सुरक्षेला प्राधान्य

मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी महिला व बालक यांच्या मदतीकरिता राज्यातील एस.टी. स्टॅन्डवर मदत केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. त्यांच्या मदतीकरिता 'निर्भया पथक' कार्यरत करण्यात आली आहेत. हरवलेल्या बालकांच्या संदर्भात ऑपरेशन मुस्कान ही शोधमोहीम राबवण्यात येत आहे. गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी पोलीस मित्रांची मदत घेण्यात येत असून रात्रीच्या वेळी व महत्त्वाच्या दिवशी पोलीस गस्तीत वाढ केल्यामुळे गुन्ह्यांमध्ये घट होण्यास होण्यास मदत झाली आहे.

## नवीन ठाणी

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नव्याने पोलीस ठाणे निर्माण करण्यात येत आहे. राज्य भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी धडक मोहीम राबवून लाचलुचपत प्रकरणांमध्ये सिद्ध दोषाच्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्याचबरोबर तपासी यंत्रणा व सरकारी वकील यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यात आल्यामुळे, न्यायालयीन खटल्यांमध्ये शासनाची बाजू भक्कमपणे सादर होण्यास मदत होत आहे. गावात तंटे होऊ नयेत म्हणून किंवा दाखल असलेले तंटे व नव्याने निर्माण होणारे तंटे लोकसहभागातून मिटवण्याकरिता राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून गावातील तंटे गावातच सोडवण्यास मदत होत आहे.

**– विलास बोडके (लेखक हे विभागीय संपर्क अधिकारी आहेत.) संपर्क : ०९८५०४६४३०१**

# सुरक्षित रस्ते, सुरक्षित प्रवास..

**वाहनांची वाढती संख्या व रस्त्यांवर दिवसेंदिवस वाढत असलेले अपघात लक्षात घेता 'रस्ते सुरक्षा' हा अत्यंत महत्त्वाचा विषय ठरत आहे. या दृष्टीने जनतेला रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यासाठी परिवहन विभागामार्फत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. परिवहन विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि वाहतूक पोलिसांमार्फत जनजागृती करून रस्त्यांवरील सुरक्षेचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे.**



दिवाकर रावते

मागील दोन वर्षात राज्यभरात सर्व ठिकाणी रस्ता सुरक्षा पंधरवड्यासारखे उपक्रम राबवून लोकांना याबाबत प्रबोधित करण्यात आले आहे. या संधीचा मी पुरेपूर उपयोग करून घेतला. राज्यभर फिरून 'घरी कुणीतरी आपली वाट पाहतोय, त्यामुळे सुरक्षित प्रवास करा, वाहतूक नियमांचे उल्लंघन करू नका' असा संदेश आम्ही राज्यभर दिला. महिला सुरक्षेसारखा महत्त्वाचा विषयदेखील आमच्यासमोर होता. त्यामुळेच शेअर टॅक्सीतील चालकाशेजारील पुढची सीट महिलांसाठी राखून ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही घेतला.

विशेषतः मुंबईतील महिलांनी या निर्णयाचे जोरदार स्वागत केले. 'भगिनी सन्मान योजना' म्हणून राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी सुरू आहे. याशिवाय वातानुकूलित शिवनेरी बसमध्ये महिलांसाठी १० जागा आरक्षित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही आम्ही घेतला. या निर्णयाचेही महिलांमधून स्वागत झाले आहे.

विशाखापट्टणम (आंध्र प्रदेश) येथे नुकतीच राष्ट्रीय रस्ते सुरक्षा परिषद झाली. या परिषदेत मी सहभागी झालो होतो. महाराष्ट्रात रस्ते सुरक्षेसंदर्भात करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मी

**दिवाकर रावते**
परिवहन मंत्री

या परिषदेत दिली. या परिषदेत रस्ते सुरक्षेच्या अनुषंगाने व्यापक चर्चा झाली. कल्पनांची देवाणघेवाण झाली. त्याअनुषंगाने महाराष्ट्रातील रस्ते अधिक सुरक्षीत करण्याच्या दृष्टीने अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्यात येतील. वाहन चालक प्रशिक्षण केंद्रे सुरु करणे, महामार्गांवरील अपघातप्रवण क्षेत्रांच्या ठिकाणी (ब्लॅक स्पॉट) आवश्यक दुरुस्त्या, सुधारणा करणे, ट्रॉमा केअर सेंटरला जवळच्या खाजगी, सरकारी रुग्णालयांशी जोडणे अशा अनेक सुधारणा येत्या काळात केल्या जातील.

### हेल्मेट वापरासाठी महत्त्वपूर्ण निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार दुचाकी वाहन चालकाने सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून हेल्मेट वापर करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे परिवहन कार्यालयातून दुचाकी वाहन चालकांना शिकाऊ वाहन चालक परवाना दिला जात असताना त्यांच्याकडून हेल्मेट वापराविषयी बंधपत्र घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या रस्ता सुरक्षा समितीने मोटार वाहन कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार दुचाकी वाहन चालकांनी व त्यासोबत बसणाऱ्या व्यक्तीने



हेल्मेट वापरणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने पेट्रोल पंप चालकांनी हेल्मेट परिधान न केलेल्या दुचाकीस्वारास पेट्रोल दिल्यानंतर अशा वाहनांचे क्रमांक संबंधित प्रादेशिक / उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यास पाठवावे. ही माहिती देण्याची वारंवारिता व पद्धत संबंधित प्रादेशिक / उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हे ठरवून देतील, असा निर्णय घेण्यात आला आहे.

### राज्य रस्ते सुरक्षा परिषदेची स्थापना

रस्ते सुरक्षेच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी व यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी आणि सनियंत्रण करण्यासाठी राज्य रस्ते सुरक्षा परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. वाढते अपघात रोखण्यासाठी उपाययोजना सुचविणे, रस्ते - महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करणे यासाठी या परिषदेमार्फत कार्यवाही करण्यात येते. रस्ता सुरक्षेवर विशेष लक्ष देऊन त्याप्रमाणे धोरणांची आखणी करण्याच्या दृष्टीने या परिषदेचे मोठे महत्त्व आहे. आपण अपघात तेव्हाच टाळू शकतो जेव्हा वाहन चालक अधिक प्रशिक्षित आणि सजग असतील. याकरिता राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षित चालक निर्माण करण्यासाठी चाचणी मार्गिका (टेस्टिंग ट्रॅक) निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### मुंबई – पुणे द्रुतगती महामार्गावर अपघात रोखण्यासाठी उपाययोजना

अपघात टाळण्यासाठी मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर महिन्यातून दोन वेळा महामार्ग पोलीस आणि आरटीओ यांच्यामार्फत वाहनचालकांची व वाहनांची संयुक्त तपासणी करण्यात येणार आहे. यामुळे अवैध वाहतुकीला आळा बसेल. ट्रक व बसच्या चालकांना आठ तासांपेक्षा अधिक तास काम देऊ नये, यावर उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यापुढे नव्याने बनवण्यात येणाऱ्या महामार्गांच्या निविदा प्रक्रियेमध्ये महामार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे, स्पीड गन तसेच स्पीड कंट्रोल यंत्रणा उभारण्याच्या तरतुदींबरोबरच एखाद्या लेनवर अपघात झाल्यास वाहनचालकांना त्याची माहिती देणारे इंडिकेटर लावण्यासाठी यंत्रणा उभारणे आदी अटी ठेवण्यात येणार आहेत. मद्यपी वाहनचालकांना आळा घालण्यासाठी मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील आयआरबीच्या दोन्ही टोलनाक्यांवर अल्कोमीटर बसवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

**शब्दांकन: इर्शाद बागवान**
(लेखक विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)
संपर्क : ०७७३८७९३७२२

## वाहतूक गुन्ह्यांसाठी तडजोड शुल्कामध्ये वाढ




**अनेक वाहन चालकांमध्ये वाहन चालविण्याबाबत सध्या बेशिस्तीचे प्रमाण वाढले आहे. या बेशिस्तीवर नियंत्रण आणण्यासाठी मोटार वाहन कायद्यांतर्गत आकारण्यात येणाऱ्या तडजोड शुल्काची (दंडाची) रक्कम वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार हेल्मेट न घालणे, विनाअनुज्ञप्ती वाहन चालविणे, शारीरिक / मानसिकदृष्ट्या अपात्र असताना वाहन चालविणे, अधिकाऱ्यांच्या सूचनांचे उल्लंघन करणे यापैकी होणाऱ्या वाहतूक गुन्ह्यांसाठी ५०० रुपये तडजोड शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाहनांची नंबर पाटी विहित पद्धतीने न लिहिणे म्हणजे दादा, मामा, बाबा इत्यादी प्रकारे लिहिणे, वाहनांस रिफ्लेक्टर्स नसणे किंवा टेल लाईट नसणे, अतिवेगाने वाहन चालविणे, धोकादायकपणे वाहन चालविणे, वाहनात अवैध बदल करणे, विनानोंदणी दुचाकी वाहन चालविणे यापैकी होणाऱ्या वाहतूक गुन्ह्यांसाठी १ हजार रुपये तडजोड शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शर्यत लावून वाहन चालविणे, विना नोंदणी चारचाकी वाहन चालविणे, विमा नसताना वाहन चालविण्यास देणे या वाहतूक गुन्ह्यांसाठी २ हजार रुपये तडजोड शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाहनचालकांमध्ये वाढत असलेली बेशिस्त रोखणे आणि त्यांना सुरक्षित प्रवासाची खात्री देणे हाच उद्देश या निर्णयामागे आहे.**

**केंद्र शासन 'रस्ते वाहतूक व सुरक्षा विधेयक' प्रस्तावित केले आहे. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांकडून मोठ्या प्रमाणात दंड आकारण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. वेगाच्या मर्यादा ओलांडणे, दारू पिऊन गाडी चालवणे, मोबाइलवर बोलत गाडी चालवणे, सिग्नल न पाळणे, हेल्मेटचा वापर न करणे, अल्पवयीन मुलांनी गाडी चालवणे यासाठी या विधेयकात कठोर शिक्षा तथा मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. वाहनचालक करत असलेल्या अशा चुकांचे परिणाम त्यांच्यासह इतरांनाही भोगावे लागतात. वाहनचालकांच्या चुकांमुळे अनेकांना प्राण गमवावे लागतात तर अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. हे रोखण्यासाठी वाहतुकीचे गुन्हे करणाऱ्या वाहनचालकांकडून दंड आकारणी करण्याबरोबरच त्यांचे प्रबोधन करण्यावरही भर देण्यात येत आहे.**

# सुरक्षेचा प्रहरी

**वाढती लोकसंख्या व शहरीकरणामुळे नागरिकांना सुरक्षा पुरवणे ही शासन व पोलीस खात्याची महत्त्वाची जबाबदारी आहे. ती पार पाडण्यासाठी राज्यात गुन्हे अन्वेषण विभागामार्फत क्राईम, क्रिमीनल, ट्रेकींग, नेटवर्क व सिस्टीम (सीसीटीएनएस) हा प्रकल्प यशस्वीरीत्या महाराष्ट्रात राबवला जात आहे.**




सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत सर्व कार्यरत १०५२ पोलीस ठाणी व ६२७ वरिष्ठ कार्यालये समाविष्ट करण्यात आली आहेत. सीसीटीएनएस हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे.

या प्रकल्पामुळे पोलीस खात्याच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता येईल. कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढेल. ही प्रक्रिया स्वयंचलित असेल, यामुळे तपासकार्य वेगाने व अचूकरित्या होण्यास मदत होईल.

या प्रकल्पामुळे सर्व गुन्हे व गुन्हेगारांची एकत्रित माहिती संकलित करणे शक्य होईल. त्याची निरनिराळ्या घटकांत, वरिष्ठ कार्यालयात व पोलीस ठाणे स्तरावर देवाणघेवाण होऊन तपासाला गती मिळेल. गुन्हे उघडकीस आणण्यासाठी या माहितीची मदत होईल. गुन्हे व गुन्हेगारांच्या तपासाचा व कोर्टात दाखल केसेसचा मागोवा घेणे सुलभ होईल. गुन्हे अभिलेख हाताळणे व जतन करणे अधिक सोपे होईल.

### पहिला क्रमांक

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत करण्यात महाराष्ट्र देशात क्रमांक एकवर आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता निरनिराळी पारितोषिके राज्याला प्राप्त झाली आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचा स्मार्ट गव्हर्नन्स - २०१५, प्रशिक्षण व सक्षमीकरण-२०१४, स्कॉच इलेट्स स्मार्ट सेफ सिटी नॅशनल ॲवॉर्ड २०१५ आणि नॅसकॉम ॲवॉर्ड फॉर सिक्युरिटी रेडिनेस २०१५ यांचा समावेश आहे.

केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली व नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो, नवी दिल्ली यांनी या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र पोलिसांची प्रशंसा केली आहे. महाराष्ट्राने उपयोगात आणलेल्या निरनिराळ्या योजना इतर राज्यांसाठी मार्गदर्शक असल्याचे कौतुक केले आहे.

### प्रकल्पाची उद्दिष्टे

सीसीटीएनएस प्रोजेक्ट गो-लाईन लोकार्पण सोहळा राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत १५ सप्टेंबर २०१५ रोजी नागपूर येथे संपन्न झाला होता. सीसीटीएनएस सिटीजन पोर्टल गो-लाईव्ह लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री यांच्या हस्ते ७ जानेवारी २०१६ रोजी संपन्न झाला. या पोर्टल अंतर्गत गहाळ व हरवलेले भ्रमणध्वनीचे दाखले, हरवलेल्या व्यक्ती व बेवारस मयत व्यक्तींची माहिती तसेच फरारबाबतची माहिती उपलब्ध होईल.

e-complaint सेवेचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते २३ जुलै २०१६ रोजी संपन्न झाले.

या सेवेंतर्गत नागरिक ऑनलाइन तक्रार पोलीस ठाण्यांना पाठवू शकतात. पोलीस अधिकारी सदर तक्रारींचा पाठपुरावा व निरसन तत्परतेने करू शकतात.

सीसीटीएनएस एसएमएस सर्व्हिसेस गो-लाईन लोकार्पण मुख्यमंत्री यांच्या हस्ते २३ जुलै २०१६ रोजी संपन्न झाला. या सेवेंतर्गत तक्रारदारांना त्यांची एफआयआर दाखल झाल्यानंतर, आरोपी अटक झाल्यानंतर व अंतरिम अहवाल कोर्टात पाठवल्याचे एसएमएस स्वयंचलितरीत्या विनामूल्य प्राप्त होणार आहेत.

या सेवेंतर्गत गंभीर गुन्हे दाखल होताच त्याबाबतची माहिती त्वरित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना एसएमएसद्वारे कळवण्यात येईल.

### महाराष्ट्रातील प्रकल्पाची सद्य:स्थिती

- १०५२ पोलीस ठाणी व ६२७ वरिष्ठ कार्यालये प्रकल्पांतर्गत कार्यान्वित.
- एकूण ६३२४१ युजर्स कार्यरत आहेत.
- राज्यात ३.३९ लाख एफआयआर, १.१८ कोटी ठाणे दैनंदिनी नोंदी, ७.८८ लाख अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद, ३०४५१ हरवलेल्या व्यक्ती व ३,६६४ अकस्मात मृत्यू नोंदी.






सीसीटीएनएस प्रकल्पाचे लोकार्पण करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव. सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गृहविभागाचे अपर मुख्य सचिव के. पी. बक्षी

- पोलीस अंमलदारांच्या मदतीसाठी आणि देखरेख करण्यासाठी ५० विप्रो संपर्कतज्ज्ञ प्रतिनिधी (स्पॉक) व २६५ मदतनीस नियुक्त.

### सक्षमीकरण व प्रशिक्षणे

- ६६ जिल्हा संगणक प्रशिक्षण केंद्रे संगणक व साधनसामग्रीसह कार्यरत आहेत.
- संगणक प्राथमिक प्रशिक्षणे मापदंडाप्रमाणे १.४ लाख पोलीस अंमलदारांना देण्यात आली आहेत.
- ६९ मानसिकता बदलाच्या कार्यशाळा राज्यात आयोजित करण्यात आल्या आहेत.
- १.१० लाख लक्षपैकी १.०३ लाख पोलीस अंमलदारांना रोलबेस प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- ७,७५० अंमलदारांना प्रशिक्षकांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

### गुन्हे अभिलेखांचे संगणकीकरण व स्थलांतरण

- मे.विप्रो यांनी १९९८ ते डिसेंबर २०१२ पर्यंतचे १.४२ कोटी गुन्हे अभिलेखांचे संगणकीकरण केले आहे. १.५७ लाख अभिलेख सीसीटीएनएस सर्व्हरमध्ये रूपांतरित केले आहेत.
- २०१३ ते २०१५ मधील प्रलंबित अभिलेख विप्रोमार्फत संगणकीकृत करण्याचे काम २४ घटकांत कार्यरत.

### स्टेट डेटा सेंटर

- स्टेट डाटा सेंटर (एसडीसी) हे मुंबई येथील बीएसएनएल, आय. डी.सी. येथे आहे.
- एसडीसी येथे सीसीटीएनएस सर्व्हरवर C-S आवृत्ती ४.० प्रस्थापित करण्यात आली आहे.
- डाटा रिट्रीव्हल सिस्टिम (डीआरएस) हे एनआयसी नवी दिल्ली येथे प्रस्थापित करण्यात आले आहे.




### सीसीटीएनएस कार्यप्रणालीचे मराठीत रूपांतर

- एनसीआरबी, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त C-S इंग्रजी आवृत्तीचे मराठीत रूपांतर.
- राज्याचे १९२ अहवाल व ४७ रजिस्टर्स मराठीत रूपांतरित.
- सिटीजन पोर्टल मराठीत रुपांतरित व कार्यरत.

# तिसरा डोळा

**शहरांची सुरक्षितता व सुव्यवस्थेचे गुणात्मकरीत्या व्यवस्थापन करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा प्रभावी उपयोग जगभरात केला जात आहे. ही बाब लक्षात घेऊन मुंबई व महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रभावीपणे राबवण्याचा संकल्प शासनाने केला आहे.**



सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या थेट प्रक्षेपणामुळे पोलिसांना शहरात कायदा व सुव्यवस्था पाळण्यासाठी तसेच भूतकाळात घडलेल्या गुन्ह्यांच्या तपासासाठी व्हिडिओ फूटेजच्याद्वारे मदत होईल. शहरातील वाहतूक व्यवस्था नियंत्रणासाठी मदत होईल. शहरात घडणाऱ्या गुन्हेगारी कारवायांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मदत होईल.

### मुंबई

मुंबई शहराच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने सीसीटीव्ही प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत रु.९४९ कोटी आहे. मुंबई शहरात १५०० ठिकाणी एकूण ६०२० कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. मुंबई सीसीटीव्ही प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १३८१ कॅमेरे बसवण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या कामाचे लोकार्पण ३० नोव्हेंबर २०१५ रोजी, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडले. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व वाहतूक मुख्यालय, वरळी या कार्यालयात दोन स्वतंत्र आदेश व नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे निरीक्षण एका ठिकाणावरून करता येणार आहे. दुसरा टप्पा ऑक्टोबर-२०१६ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

### पुणे व पिंपरी चिंचवड शहर

पुणे व पिंपरी चिंचवड शहरांत सीसीटीव्ही प्रकल्प ८ ऑगस्ट २०१५ पासून कार्यान्वित करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत पुणे शहरातील एकूण ४२५ ठिकाणी सुमारे १२३४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. पुणे महानगरपालिका व इतर संस्थांनी बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे या प्रकल्पाशी जोडले जाणार आहेत. सीसीटीव्हीच्या मदतीने आजपर्यंत २१ गुन्ह्यांचा तपास पूर्ण करण्यास पोलिसांना यश आले आहे. जवळपास ७०० व्हिडिओ फूटेज आजपर्यंत वापरण्यात आले आहेत. तसेच १२००० पेक्षा जास्त वाहनांवर वाहतूक विभागामार्फत कारवाया करण्यात आल्या आहेत.

### नाशिक व त्र्यंबकेश्वर

कुंभमेळ्याच्या ठिकाणी भाविक मोठ्या संख्येने नदीमध्ये शाहीस्नान करण्यासाठी एकत्र येतात. ही भाविकांची संख्या निश्चित नसते. एवढ्या मोठ्या संख्येने जमलेल्या भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कालावधीत नाशिक व त्र्यंबकेश्वर या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. त्यानुसार नाशिक शहरामध्ये विविध १५७ ठिकाणी एकूण ३४८ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले. त्र्यंबकेश्वर येथे ७३ विविध ठिकाणी एकूण २०५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. नियंत्रण कक्ष निर्माण करण्यात आला होता. ही यंत्रणा १५ जून २०१६ ते १५ ऑक्टोबर २०१६ या कालावधीत कार्यान्वित होती. या यंत्रणेच्या मदतीने सिंहस्थ कुंभमेळा शांततेत पार पडला.

### पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही

**उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या अधिकारक्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर २५ संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आले आहे. कोठडीतील मृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यातील मार्गिका, रूम, लॉकअप, स्टेशन हाऊस व चार्जरूम या पाच ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आलेले आहेत. पोलिसांनी स्थानिक प्रशासनाच्या मदतीने आमदार निधी किंवा जिल्हा नियोजन व विकास परिषदेच्या निधीतून १०८० पोलीस ठाण्यांमध्ये एकूण २४३८ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत.**

# अपराधसिद्धी वाढली..

**नोव्हेंबर २०१४ ते जून २०१६ या कालावधीत अपराधसिद्धीचे प्रमाण ३३.९५% आहे. या कालावधीची तुलना मार्च २०१३ ते ऑक्टोबर २०१४ (एकूण २० महिने) या कालावधीशी केली असता अपराधसिद्धीमध्ये १९.७६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. खटले निकाली लागून गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढले आहे.**





राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबद्दल जनसामान्यांमध्ये आस्था निर्माण करायची असेल तर अपराध्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढणे आवश्यक असते. अनेक प्रकरणांमध्ये अपराधी तपासात आवश्यक ती पूर्वकाळजी न घेतल्यामुळे खटल्यातून ते निर्दोष सुटतात. मात्र, सरकारने या संदर्भात दोषसिद्धीचे प्रमाण वाढवण्याचे धोरण अवलंबिले आहे. विनाकारण गुन्हा दाखल करण्याचे प्रमाणही कमी झाले असून, एकदा गुन्हा दाखल झाल्यावर त्यामध्ये शिक्षेचे प्रमाण वाढले आहे. या अनुषंगाने काढण्यात आलेल्या १४ शासननिर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.

सात वर्षे व त्यापेक्षा जास्त शिक्षेच्या गुन्ह्यात सरकारी पंच घेण्यात येतात. खटल्यांचे पुनर्विलोकन केले जाते. त्याकरिता प्रत्येक घटकात जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर समिती स्थापन करण्यात आली आहे. महत्त्वाच्या खटल्यात खाजगी वकील नेमण्याचा अधिकार घटकप्रमुखांना देण्यात आले आहेत. खटल्याच्या सुनावणीमध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर केला जातो. साक्षीदारांना संरक्षण व सुविधा पुरवल्या जातात. प्रत्येक न्यायालयात पैरवी अधिकारी नियुक्त केले आहेत. दोषारोपपत्र तपासणीकरिता संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील न्यायसहायक प्रयोगशाळांचे सक्षमीकरण करण्यात आले आहे.

## उत्कृष्ट कामाला प्रोत्साहन

पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त यांनी पोलीस प्रॉसिक्यूटर, ज्युडीशियल ऑफिसर यांच्यासह मॅजिस्ट्रेट/ जज यांना दर १५ दिवसातून एकदा भेटून, गुन्ह्यांच्या निर्गती व दोषसिद्धीबाबत चर्चा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दोषसिद्धीबाबत उत्कृष्ट कामाला प्रोत्साहन देण्याकरिता मुख्यमंत्री पदक दिले जाते. त्याबाबत गोपनीय अहवालात नोंद घेतली जाते. आरोपी निर्दोष सुटल्याबाबत कारणांचा अभ्यास केला जातो. त्यासाठी नियमित कार्यशाळा आयोजित केली जाते. तपासातील त्रुटींबाबत मार्गदर्शन केले जाते. दारूबंदीच्या गुन्ह्यांमधील दोषसिद्धीचे प्रमाण वाढवण्यासाठी पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त यांना विशेष लक्ष देण्याबाबत सूचित केले आहे.

## डिजिटल पुरावे

फिर्यादी, साक्षीदार फितूर होण्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढ व खटल्याची प्रत्यक्ष सुनावणी सुरू झाल्यावर फिर्यादी, साक्षीदार व पंच यांना घटनेची, घटनास्थळ पंचनामा व जप्तीचा पंचनामा इत्यादीचे विस्मरण होते. यामुळे दोषसिद्धीच्या प्रमाणावर फरक पडतो. याकरिता भारतीय पुरावा कायदा-६५ ब प्रमाणे फिर्यादीची फिर्याद, साक्षीदारांचे जबाब, घटनास्थळ पंचनामा व जप्तीचा पंचनामा व्हिडिओ रेकॉर्डिंग करून डिजिटल पुरावे गोळा केले जातात. निर्दोष सुटलेल्या गुन्ह्यांच्या कारणांचा सविस्तर अभ्यास केला जातो. दरमहा दोषसिद्धीबाबत जिल्ह्यांकडून माहिती मागवली जाते. ज्या पोलीस घटकांच्या दोषसिद्धीच्या प्रमाणात वाढ झाली नसेल त्यांना योग्य सूचना देऊन मार्गदर्शन केले जाते. आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा केल्यानंतरच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले जाते.

# सायबर सिद्धता

**महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पांतर्गत राज्यात ५१ ठिकाणी अत्याधुनिक 'सायबर सेल' स्थापन करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. स्वातंत्र्यदिनी, १५ ऑगस्टला एकाच दिवशी पहिल्या टप्प्यात ४२ सायबर लॅबचा राज्यभरात शुभारंभ झाला..**



माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात आपल्या दैनंदिन जीवनाचा बहुतांशी भाग हा माहिती तंत्रज्ञान आणि संबंधित सेवांनी व्यापला आहे. माहिती तंत्रज्ञान सेवांच्या प्रसारातून सहज सुविधा निर्माण होत असल्या तरी त्यातून 'सायबर' सुरक्षेशी संबंधित उद्‌भवणाऱ्या समस्यादेखील काही कमी नाहीत. सायबर सुरक्षेशी संबंधित गुन्ह्यांची उकल करण्याबरोबरच अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला आहे.

## सायबर गुन्ह्यांची संख्या मोठी

माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे दैनंदिन व्यापार तसेच इतर अनेक व्यवहार करणे आपल्याला सोईस्कर झाले आहेत. एकीकडे या सुविधा सहज मिळत असल्या तरी त्याचा गैरवापर करून सायबर गुन्हे करण्याचे प्रमाणदेखील वाढत आहे. हॅकिंगच्या माध्यमातून आर्थिक गैरव्यवहार आणि फसवणूक, सोशल मिडियाच्या माध्यमातून आक्षेपार्ह छायाचित्रे, प्रक्षोभक संदेश पाठवणे आदी गोष्टी समाजकंटक आणि विकृतांकडून केल्या जातात. समाजमनावर त्याचा वाईट परिणाम होत असून, त्यातून राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेस आणि शांततेस बाधा पोहोचण्याची शक्यता असते.

संगणकाच्या माध्यमातून किंवा संगणक हे लक्ष्य ठेवून जे गुन्हे केलेले जातात त्यात प्रामुख्याने सायबर गुन्ह्यांचा समावेश होतो. माहिती तंत्रज्ञान कायदा २000, भारतीय दंड विधान तसेच विशेष आणि स्थानिक कायदा (एसएलएल) च्या विविध कलमांनुसार २०१३ मध्ये ५६९३ आणि २०१४ मध्ये ९६२२ सायबर गुन्ह्यांची नोंद झाल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरो (एनसीआरबीच्या) अहवालात म्हटले आहे. या सायबर गुन्ह्यांमध्ये फिशिंग, बनावट आयडी,



वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे सायबर सेलचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, मुंबईच्या महापौर स्नेहल आंबेकर, खासदार अरविंद सावंत, गृहविभागाचे अपर मुख्य सचिव के.पी. बक्षी

**किशोर गांगुर्डे**

दुसऱ्याच्या नावाने प्रोफाइल-ई-मेल आयडी, दुसऱ्याच्या नेटवर्कचा गैरवापर करणे, संगणकामध्ये जाणूनबुजून व्हायरस पाठविणे, माहितीची चोरी करणे, चाइल्ड पोर्नोग्राफी व इतर प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचा समावेश आहे.

देशातील एकूण सायबर गुन्ह्यांचा आलेख पाहिला तर महाराष्ट्रात सायबर गुन्ह्यांची संख्या मोठी आहे. एनसीआरबीच्या २०१४ च्या अहवालानुसार २०१२ मध्ये महाराष्ट्रात ५६१ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली, हीच संख्या २०१३ मध्ये ९०७ झाली तर २०१४ मध्ये या गुन्ह्यांची संख्या दुपटीने वाढून १८७९ झाली. २०१२ ते २०१४ या तीनही वर्षांतील सायबर गुन्ह्यांची संख्या पाहिली तर त्यात झालेली वाढ चिंताजनक आहे.

## कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम

केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम या




संस्थेकडे प्राप्त माहितीनुसार २०१४ मध्ये ४४६७९ आणि २०१५ मध्ये ४९४५५ सायबर सुरक्षेशी संबंधित घटनांची नोंद झाली आहे. यात प्रामुख्याने फिशिंग, स्कॅनिंग, बनावट कोड, वेबसाईटवर अनधिकृत प्रवेश आदी घटनांचा समावेश आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार एटीएम कार्ड, डेबिट कार्ड आणि नेट बँकिंगच्या माध्यमातून केलेल्या फसवणुकीच्या सन २०१४-१५ मध्ये १३०८३ आणि डिसेंबर २०१५ अखेर ११९९७ घटना घडल्या. मुंबईची आर्थिक राजधानी म्हणून असलेली ओळख, मुंबईसह राज्यामध्ये कार्यरत आर्थिक, व्यावसायिक संस्था, बँकांना सायबर हल्ल्यापासून रोखण्यासाठी, केंद्र शासनाच्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम धर्तीवर; महाराष्ट्र राज्यासाठी कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम तयार करण्यात येत आहे.

### महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प

सायबर गुन्ह्यांचा मुकाबला करण्यासाठी गृह विभागाने विविध तंत्रज्ञान विकास योजनेंतर्गत 'महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत सायबर गुन्ह्यांचा तपास, अन्वेषण तातडीने होण्याकरिता सर्व जिल्हा पोलीस मुख्यालये, पोलीस आयुक्तालये, रेल्वे परिक्षेत्र, सीआयडी, एसीबी आदी ५१ ठिकाणी अद्ययावत सायबर लॅब स्थापन करण्यात येणार आहेत. गृह विभागामार्फत विशेष पोलीस महानिरीक्षक (सायबर गुन्हे व महिला अत्याचार प्रतिबंध) ब्रिजेश सिंह यांच्या आधिपत्याखाली सायबर सुरक्षा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

### अद्ययावत डाटा सेंटर

या प्रकल्पांतर्गत अद्ययावत डाटा सेंटर उभारले जाणार असून, त्यामुळे फरारी गुन्हेगारांना पकडण्याबरोबरच गुन्ह्यांची उकल करून; अपराधदोषसिद्धीचे प्रमाण वाढवणे शक्य होणार आहे. त्याशिवाय पोलीस अधिकारी, सरकारी वकील, शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांना सायबर तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी, अद्ययावत प्रशिक्षण केंद्रदेखील स्थापन करण्यात येणार आहे.


(लेखक हे वृत्त विभागात वरिष्ठ साहाय्यक संचालक आहेत.)
संपर्क : ०९९८७१७६४००


## सायबर सुरक्षा प्रकल्प

**सध्या** बदललेले गुन्ह्यांचे स्वरुप पाहिले तर त्यात सायबर क्राईमचा समावेश देखील मोठा आहे. अशा गुन्ह्यांच्या तपासासाठी आणि सायबर सुरक्षेसाठी 'सायबर लॅब' महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प' नावाची एक यंत्रणा उभारली आहे. या यंत्रणेत तंत्रज्ञानाधारित अन्वेषण, कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम-महाराष्ट्र, माहिती विश्लेषण केंद्र (डाटा नालिसिस सेंटर) आणि प्रशिक्षण शाखेचा समावेश आहे. सायबर गुन्ह्यांव्यतिरिक्त इलेक्ट्रॉनिक पुरावे ज्या प्रत्येक गुन्ह्यात आवश्यक असतात (वधू-वर सूचक संकेतस्थळावरील वाद (मॅट्रिमोनियल डिस्पुट), बँक खाते हॅक होणे आदी) अशा गुन्ह्यांमध्ये कम्युनिकेशन, लोकेशन, ट्रान्झॅक्शन असे कुठलेही दुवे असले तरी ते सायबर गुन्हे नसतानाही तंत्रज्ञानाचा वापर करुन पुरावे म्हणून तपासणे आवश्यक असते, त्यासाठी तंत्रज्ञानाधारित अन्वेषण महत्त्वाचे ठरते. एखाद्या सामान्य गुन्ह्यामध्ये संशयितांचे कॉल डिटेल्स (सीडीआर), कोण कुणाशी किती वेळ बोलले? याचे विश्लेषण या नवीन लॅबमुळे सहजपणे करता येणे शक्य आहे.

क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टम (सीसीटीएनएस)ची देशात प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्र राज्याने केली आहे. यातून मिळणाऱ्या माहितीमुळे कुठलाही गुन्हा ट्रॅक करता येणे शक्य आहे. आता एखाद्या गुन्ह्याबद्दल माहिती शोधायची असेल तर जुन्या फाईल्स, रजिष्टर शोधण्याची आवश्यकता राहिलेली नाही, संगणकाच्या एका क्लिकवर तपासी अधिकाऱ्याला ही माहिती उपलब्ध होऊ लागली आहे.



१९९८ पासून आजपर्यंतचा गुन्हे व गुन्हेगारांचा संपूर्ण डाटाबेस तपास अधिकाऱ्याला ऑनलाइन उपलब्ध झाला आहे, त्यामुळे गुन्ह्यांचा तपास, प्रतिबंध करण्यास मदत होणार आहे. वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था म्हणून आपल्या देशाची ओळख आहे. हा विकास साधत असताना या देशाला 'लक्ष्य' करण्याचा प्रयत्न कुठूनतरी होतो, त्यावेळी या प्रयत्नांना हाणून पाडण्यासाठी, त्याला प्रतिबंध करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आपल्याकडे असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात कार्यन्वित झालेल्या या 'सायबर लॅब'चा आरोपींच्या विरुद्ध पुरेसा पुरावा शोधण्यात निश्चितच यशस्वी होतील, असा मला विश्वास वाटतो.

**– ब्रिजेश सिंह, (आयपीएस)**
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर तथा महिला अत्याचार प्रतिबंध,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# सोशल मीडियावर बदनामी

**इलेक्ट्रॉनिक मेल किंवा इलेक्ट्रॉनिक मेसेज, एखाद्याची गैरसोय करण्यासाठी वा फसवण्यासाठी किंवा तो मूळचा संदेश कोठून आला, त्या संदर्भात पाठवणाऱ्या व येणाऱ्यास भ्रम निर्माण करण्यासाठी जेव्हा केला जातो तेव्हा त्यास सायबर डिफमेशन गुन्हा असे म्हणतात. सायबर डिफमेशनचे उद्दिष्ट हे दुसऱ्या व्यक्तींचे समाजातील नाव, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठेला नुकसान पोहोचवणे हे असते.**

जेव्हा एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीबद्दल जाणीवपूर्वक बदनामीकारक, अपमानकारक, लांछनास्पद, हानिकारक मजकूर संगणक व इतर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्रसिद्ध करते व दुसऱ्या व्यक्तीला त्यापासून हानी पोहोचते तेव्हा त्यास सायबर डिफमेशन असे म्हणतात. कुठलाही इलेक्ट्रॉनिक मेल किंवा इलेक्ट्रॉनिक मेसेज, एखाद्याची गैरसोय करण्यासाठी वा फसवण्यासाठी किंवा तो मूळचा मेसेज कोठून आला त्या संदर्भात पाठविणाऱ्या व येणाऱ्यास भ्रम निर्माण करण्यासाठी जेव्हा केला जातो तेव्हा त्यास; सायबर डिफमेशन गुन्हा असे म्हणतात. सायबर डीफमेशनचे उद्दिष्ट हे दुसऱ्या व्यक्तीचे समाजातील नाव, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठेला नुकसान पोहोचवणे हे असते.

सामाजिक आणि आर्थिक बाबी, परस्परांवरील विश्वास आणि प्रतिष्ठा या गोष्टींवर अवलंबून असतात. बदनामीकारक माहिती म्हणजे, एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेबाबत चुकीची माहिती पसरविणे. कुठलीही माहिती जी आक्षेपार्ह किंवा चारित्र्यावर कलंक लावणारी, खोटी असून फक्त गैरसोय, अडवणूक, अपमान, हानी पोहचवणे, गुन्हेगारी दहशत निर्माण करणे, दुश्मनी, तिरस्कार, आकस करणे ह्या हेतूने, संगणक किंवा कम्युनिकेशन साधनांचा वापर करून पसरवणे होय.

सोशल नेटवर्किंग वेबसाइट्सच्या प्रसारामुळे आणि त्यांच्या व्यापक वापरामुळे, विशेषतः तरुणांमधील वापरामुळे; हल्ली अनेकदा बरोबर महितीच्या ऐवजी चुकीचीच माहिती जास्त व्हायरल होताना दिसत आहे. अनेकांसाठी फेसबूक, ट्विटर किंवा अगदी जवळचे वाटणारे व्हॉट्सॲप नवीन असल्याने, ते त्याचा बातमीचे प्रमुख माध्यम म्हणून वापर करतात. यामुळेच ब-याचदा नेत्यांची,




सरकारी कर्मचाऱ्यांची तसेच मंत्र्यांची चुकीच्या बातम्या पसरवून बदनामी केली जाते. जरी या वेबसाइट्स वापराकरिता सोप्या, स्वस्त आणि सोयीस्कर असल्या तरी त्यांचे दुरुपयोग मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहेत. त्यापैकीच एक दुरुपयोग म्हणजे सोशल मीडीयावरील बदनामी. इंटरनेट जवळजवळ सर्वांना आपल्या मनातील भावना व्यक्त

**ॲड. प्रशांत माळी**

करण्याची अगदी सहज परवानगी देते. इंटरनेट हे एक असे माध्यम आहे, जिथे कोणीही, हेतुपुरस्सर किंवा चुकीने एखादी संभाव्य बदनामीकारक टिप्पणी किंवा पोस्ट सोडू शकतो.

या लेखामध्ये, बदनामी केल्यामुळे होणारे परिणाम आणि बदनामी होऊ नये याकरिताचे उपाय मी नमूद केले आहेत.

### उदाहरण क्रमांक १

एका अनोळखी व्यक्तीने शाळेतील एका मुलीचे अश्लील फोटो फेसबूकवर अपलोड केले आणि तिचे नाव, फोन नंबर व तिची माहिती दिली होती. त्यामुळे जे कोणी फेसबूकवर ती माहिती वाचत ते तिला फोन करीत होते, जेव्हा तिच्या घरी फोन येऊ लागले तेव्हा तिच्या घरी हे सर्व कळले. घडलेला प्रकार हा भयंकर होता आणि त्यामुळे त्या मुलीची खूप बदनामी झाली होती, म्हणून तिच्या घरच्या लोकांनी घडलेला प्रकार ताबडतोब पोलिसांना कळवला. पोलिसांनी तपास करून गुन्हेगारस अटक केली. तेव्हा त्यांना असे समजले की, आरोपी ही तिच्याच सोसायटीत राहणारी होती.

### उदाहरण क्रमांक २

आशा नावाच्या एका महिलेने ब्लॉग डॉट कॉम या साइटवर आपली वैयक्तिक माहिती टाकली होती. अप्रत्यक्षरीत्या त्यातील काही

माहिती ही तिच्या नवऱ्याशी म्हणजेच दिलीपशी संबंधित होती. दिलीपने केस दाखल केली व आशाकडे १० लाख रुपये नुकसान भरपाईची रक्कम मागितली. दिलीपच्या म्हणण्यानुसार, त्या वेबसाइट वरील ब्लॉगमुळे त्याच्या प्रतिष्ठेला नुकसान पोहोचत होते. दिलीप एका कंपनीत उच्च पदावर कार्यरत होता व त्याची समाजात प्रतिष्ठा होती. ब्लॉग त्याच्या कंपनीतील काम करणारे तसेच त्याच्या मित्रमंडळींनीही वाचला होता, हा ब्लॉग सर्वांसाठी खुला होता. त्याच्या मित्राद्वारे त्याला यासंदर्भात काही ईमेल आले होते, ज्यामुळे त्याच्या समाजातील प्रतिष्ठेवर परिणाम झाला असा दिलीपचा दावा होता. म्हणून पोलिसांनी दिलीपच्या बायकोला अटक केली.

### उदाहरण क्रमांक ३

एका नावाजलेल्या कंपनीच्या एका कर्मचाऱ्याने मानहानी, बदनामी करणारे व अश्लील ई-मेल कंपनीच्या मालकाविरुद्ध पाठविले. ई-मेल निनावी, वारंवार व कंपनीचे इतर भागीदार असलेल्या बऱ्याच लोकांना पाठविले गेले होते, की ज्यामुळे कंपनीला काळिमा लागून कंपनीचे नाव खराब होईल. कंपनीला एका गुप्त संगणकाद्वरे त्या व्यक्तीपर्यंत पोहोचता आले. हे प्रकरण दिल्ली उच्च न्यायालयात हलविण्यात आले आणि यावर न्यायालयाने त्या व्यक्तीला तात्पुरता मनाई हुकूम दिला व कंपनीविरुद्ध बदनामी व मानहानी करणारे ईमेल पाठविण्यास सक्त मनाई केली.

### भारतातील कायदा काय म्हणतो?

भारतात, बदनामीविरुद्ध दिवाणी व फौजदारी असे दोन्ही प्रकारचे उपाय उपलब्ध आहेत. भारतीय दंड संहिता अंतर्गत फौजदरी आणि टॉर्ट (Tort) अंतर्गत नुकसानभरपाई देण्यासंदर्भात दिवाणी दायित्वे लादण्यात आली आहेत.

भारतीय दंड संहिता, १८६० अंतर्गत कलम ५०० व ५०९ अनुसार सायबर डिफमेशन गुन्ह्याविरुद्ध तक्रार नोंदविली जाऊ शकते.

अश्लील साहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करण्याबाबत किंवा तो पाठविल्याबाबत, माहिती व तंत्रज्ञान कायदा, २००० (अमेंडेड) अंतर्गत कलम ६७ अनुसार पहिल्या अपराधासाठी तीन वर्षांपर्यंत कोणत्याही प्रकारच्या कारावासाची शिक्षा आणि पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल, इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होऊ शकते. दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी पाच वर्षांपर्यंत कोणत्याही प्रकारच्या कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होऊ शकते.

### उपाय

तुमचे वास्तव्य असलेल्या तसेच आरोपीचे वास्तव्य असलेल्या राज्यावर अवलंबून असलेली ही गुंतागुंतीची समस्या आहे. तुम्हाला कोणीतरी ऑनलाइन बदनाम करत आहे असे तुमच्या लक्षात आले की, त्वरित तुम्ही नजीकच्या पोलीस ठाण्यात लेखी तक्रारीच्या दोन प्रती बदनामी झालेल्या साहित्याच्या प्रिंट-आउट स्वरूपातील पुराव्यांसह दाखल कराव्यात. त्यापैकी एक प्रत पोलिसांकडे जमा केली जाईल आणि दुसरी प्रत तुमच्याजवळ पोचपुरावा म्हणून ठेवली जाईल. जर बदनामी मोबाइल फोन वर झाली असेल, तर बदनामी झालेल्या मजकूराचा प्रिंट-आउट तसेच मोबाइलमध्ये मजकूर आल्याचा मोबाइलचा फोटो पुरावा म्हणून लेखी तक्रारीसोबत जोडावा.

असे साहित्य व मजकूर ज्या वेबसाईटवर तुम्हाला दिसेल त्या वेबसाइटच्या मेन्यूमध्ये तक्रार नोंदवून ही मजकूर काढून टाकण्यास सांगावे. तक्रार करूनदेखील जर असे साहित्य किंवा मजकूर वेबसाइटने काढले नाही, तर एखाद्या सायबर कायदा तज्ज्ञ वकिलांना भेटून न्यायालायाकडून हुकूम घेऊन ते साहित्य किंवा मजकूर काढून टाकला जाऊ शकतो.




### माहिती व तंत्रज्ञान कायदा, २००० चे कलम ६६ (अ) रद्द झाल्याचे परिणाम

कलम ६६ (अ) सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर सर्वच स्तरांमधून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. समाज माध्यमांवर सक्रीय असणाऱ्या सदस्यांनी खुल्या दिलाने या निर्णयाचे स्वागत केले. या कायद्याने पोलिसांना अमर्याद अधिकार दिले होते, तसेच सत्ताधारी या कायद्याचा त्यांच्या स्वार्थ साधण्यासाठी वापर करीत होते. त्यामुळे कलम ६६ (अ) रद्द करण्याचा सर्वोच्च न्यायालयाने घेतलेला निर्णय अत्यंत योग्य असल्याचे म्हटले जात असले तरी कलम ६६ (अ) रद्दबातल केल्याने समाज माध्यमांमध्ये वाटेल ते लिहिण्याची मुभा मिळाली आहे. हे कलम रद्द करण्यात आल्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे खूप गरजेचे आहे.

सर्वोच्च नायायालयाच्या ह्या निर्णयाचा असा अर्थ नाही की, सोशल नेटवर्किंग साइट द्वारे बदनामीकारक भाषेचा वापर करण्याचे अनिर्बंध अधिकार किवा स्वातंत्र्य मिळाले आहे.

### विचार आणि अविचार

एक खरे आहे की, विचार आणि अविचार मांडण्याचा फार मोठा कल्लोळ आज खऱ्या अर्थाने सोशल नेटवर्किंग साइट जसे गुगल, फेसबूक, ट्विटर ह्या माध्यमाद्वारे पाहायला मिळतो.

आजच्या पिढीची भावनिक, वैचारिक उंची मोजण्याचे समाज माध्यमे हे उत्तम साधन आहे हे लक्षात घेतले पाहिजे. आपला समाज माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करत असला, तरी सामाजिक जबाबदाऱ्यांचे भान फार थोड्या लोकांना असते. त्यामुळे ६६ (अ) रद्द केल्यानंतरही समाज माध्यमांवर एखादा संदेश टाकताना किंवा कमेंट करताना प्रत्येक जण त्यामुळे होणाऱ्या परिणामांची काळजी करेलच, हे मानणे फारच धाडसाचे होईल. त्यामुळे कलम ६६ (अ) मध्ये सुधारणा करून हा कायदा पुन्हा अंमलात आणणे अत्यंत गरजेचे आहे.

**(लेखक हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सायबर सुरक्षा, सायबर कायदा तज्ज्ञ व मुंबई उच्च न्यायालयाचे वकील आहेत. सायबर विश्वातील ते प्रसिद्ध वक्ते आहेत.)**

# पोलीस सेवा ऑनलाइन

**पोलीस दलाने जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहावे, यासाठी गृहविभागाने गेल्या दोन वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या विभागाने अधिसूचित केलेल्या सेवा ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या ऑनलाइन सेवांमुळे नागरिकांच्या वेळेत आणि खर्चात बचत झाली आहे..**



राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्श, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभाग व अभिकरणामध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणामध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ लागू केला आहे.

ऑनलाइन सेवांमुळे पोलीस ठाण्यांमध्ये खेपा मारण्याची गरज उरली नसून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ऑनलाइन परवानगी घेणे शक्य झाले आहे. या नव्या धोरणामुळे नागरिकांच्या वेळ आणि पैशाच्या खर्चात बचत झाली.

### विदेशी कलाकारांना परवानगी

राज्यातील विविध सांस्कृतिक व इतर कार्यक्रमामध्ये विदेशी कलाकारांचा सहभाग असतो. या सहभागासाठी केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्य शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असते.

ई, बी आणि एक्स् व्हिसावर येणाऱ्या विदेशी कलाकारांना, विविध कार्यक्रमात सहभागी होण्यास राज्य शासनामार्फत परवानगी देण्यात येते. ही सेवा ऑनलाइन स्वरूपातसुद्धा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### कागदपत्रांचे साक्षांकन

भारतीय नागरिकांना परदेशामध्ये नोकरी, व्यवसाय, शिक्षण इत्यादी कारणासाठी कागदपत्रे तसेच विविध कंपन्या यांना व्यवसायानिमित्त आवश्यक असलेली कागदपत्रे शासनाकडून साक्षांकीत करून परदेशी शासन / राजदुतावास यांच्याकडे द्यावी लागतात. केंद्र शासनाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या निर्देशाप्रमाणे विविध कागदपत्रांचे साक्षांकन गृह विभागामार्फत तत्काळ करून देण्यात येते.

### भारतीय नागरिकांना 'नोरी' प्रमाणपत्र

महाराष्ट्रातील विद्यार्थी / नागरिक अमेरीकेमध्ये उच्च शिक्षणासाठी जे- १ व्हिसा प्राप्त करून जात असतात. हा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर अशा विद्यार्थी / नागरिकांनी भारतामध्ये किमान दोन वर्ष वास्तव्य करणे आवश्यक असते. भारतामधील दोन वर्षे वास्तव्याची अट शिथिल करण्यासाठी नोरी प्रमाणपत्र भारतीय राजदूतावासाकडून दिले जाते. त्यासाठी आवश्यक असलेले नोरी प्रमाणपत्र राज्य शासनामार्फत दिले जाते.

### पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र (परदेशी नागरिकांसाठी)

परदेशी नागरिक अनुज्ञेय व्हिसा प्राप्त करून महाराष्ट्रात विविध कारणासाठी वास्तव्य करीत असतात. सदरहू परदेशी नागरिक भारत देश सोडून त्यांच्या स्वत:च्या देशात अथवा अन्य देशात शैक्षणिक / व्यावसायिक / नोकरी इ. कारणासाठी स्थलांतर करू इच्छितात, अशा व्यक्ती



पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्राची मागणी करतात. या परदेशी नागरिकांना आवश्यकती तपासणी करून / अहवाल प्राप्त करून राज्य शासनामार्फत पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र देण्यात येते.

### विदेशी नागरिकांचे नागरिकत्वाचे प्रस्ताव

काही परदेशी नागरिक यांना भारताचे नागरिकत्व स्वीकारावयाचे असते. भारतीय नागरिकत्व मंजूर करण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे. परदेशी नागरिकांचे नागरिकत्वाचे प्रस्ताव तपासणी करून, केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविले जातात.

### तक्रारदारास एफआयआर प्रत

फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम १५४ अन्वये दखलपात्र गुन्हा दाखल करताच तक्रारदारास तत्काळ विनाशुल्क प्रथम खबरी अहवालाची प्रत देणे पोलिसांवर बंधनकारक आहे. त्याप्रमाणे तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची प्रत उपलब्ध करून देण्यात येते.

### मनोरंजनाच्या कार्यक्रमांना परवाना देणे

सार्वजनिक मोकळया ठिकाणी / सार्वजनिक इमारतींमध्ये होणारे कार्यक्रम / खेळ किंवा विदेशी कलाकारांचा सहभाग असलेले कार्यक्रम किंवा त्या-त्या वेळी ज्या कलाकारांच्या / व्यक्तींच्या कृतीने अथवा वक्तव्याने वादविवाद निर्माण झाले आहेत असे कलाकार / व्यक्तींच्या बाबतीत किंवा त्या-त्या वेळी पटकथा, प्रदर्शनामुळे वादविवाद निर्माण झाले आहेत किंवा कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली / होण्याची शक्यता आहे अशा कार्यक्रमांसाठी वाहतूक पोलीस व स्थानिक पोलीस यांची ना-हरकत प्राप्त करणे आयोजकावर बंधनकारक आहे. त्यांना आता पोलिसांकडून दिल्या जाणाऱ्या जागेचे अथवा खेळाच्या परवान्यांची आवश्यकता नाही.

ध्वनिक्षेपक वापराचा परवाना देण्याचे अधिकार पोलिसांना देण्यात आले आहेत.

### सभा, मिरवणुकांकरिता परवानगी

सेवेबाबत परवानगी देण्याची कार्यवाही विविध पोलीस प्राधिकारी / पोलीस ठाणे अधिकारी यांचेकडून केली जाते.

### ऑनलाइन सेवा

- **विदेशी कलाकारांच्या सहभागास परवानगी.**
- **कागदपत्रांचे साक्षांकन.**
- **भारतीय नागरिकांना 'नोरी' प्रमाणपत्र.**
- **पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र (परदेशी नागरिकांसाठी).**
- **विदेशी नागरिकांचे नागरिकत्वाचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठवणे.**
- **तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (एफआयआर) प्रत पुरवणे.**
- **ध्वनिक्षेपक वापराचा परवाना**
- **मनोरंजनाच्या कार्यक्रमांना परवाना देणे.**
- **सभा / मिरवणुका / शोभायात्रेकरिता परवानगी देणे.**
- **शस्त्र परवान्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे.**
- **निमशासकीय, खाजगी संस्था इत्यादींमध्ये नोकरीकरिता वर्तणूक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देणे.**

**अधिक माहिती या संकेतस्थळावर**
aaplesarkar.maharashtra.gov.in
**उपलब्ध आहेत.**

### पेट्रोल पंप, गॅस एजन्सी यांना परवाना

पेट्रोल पंप येथे हायस्पीड डिझेल ठेवण्याकरिता भूमिगत टँक बसविण्याकरिता पेट्रालियम क्ट, १९३४ व पेट्रोलियम रूल्स, २००२ नुसार नियम १४४ अन्वये पेट्रालियम क्लास-बी अंतर्गत २५००० लि. पेक्षा जास्त क्षमतेकरीता ना-हरकत प्रमाणपत्रे दिली जातात. तसेच गॅस एजन्सी परवान्यासाठी सुद्धा ना-हरकत प्रमाणपत्र दिली जातात.

### शस्त्र परवान्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र

जिल्हादंडाधिकारी / पोलीस आयुक्त यांच्याकडून १९५९च्या शस्त्र अधिनियमानुसार, स्वसंरक्षण / खेळ/ प्रदर्शन या प्रयोजनासाठी शस्त्र परवाने दिले जातात. याशिवाय रायफल शूटिंग क्लब / संघ/ असोसिएशन यांना नेमबाजीच्या सरावाकरिता शस्त्र परवाने दिले जातात. हे परवाने देण्यापूर्वी परवाना प्राधिकारी हे संबधित पोलीस प्राधिकारी यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र मागवतात. त्यानुसार पोलीस प्राधिकाऱ्यांकडून योग्य तपासणी करून ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाते.

### नोकरीकरिता वर्तणूक प्रमाणपत्र

या सेवा आपले सरकार या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या असून उमेदवारास वैयक्तिक कागदपत्रे, पडताळणीसाठीचे शुल्क ऑनलाइन भरता येते. या सेवा थेट पोलीस ठाण्यांना संलग्न असल्यामुळे चारित्र्य पडताळणीचे अर्ज थेट पोलीस ठाण्यांना जातात. अर्जदारांना ऑनलाइन पद्धतीने चारित्र्य पडताळणी फॉर्म भरणे, स्थानिक पोलीस ठाण्याची पडताळणी झाल्याची माहिती, त्यांचे प्रमाणपत्र मुख्यालयामार्फत तयार झाल्याची माहिती या संदर्भात अवगत करण्याकरिता एसएमएस सुविधा उपलब्ध झाली आहे.

## परवाने रद्द

**आदरातिथ्य उद्योगांना चालना मिळावी, याकरिता पोलिसांकडून दिले जाणारे खालील परवाने रद्द करण्यात आले आहेत.**

- **बृहन्मुंबई खाद्यगृह नोंदणी प्रमाणपत्र नियम, १९६९ -**
- **बृहन्मुंबई जलतरण तलाव (परवाना देणे व नियंत्रण ठेवणे) नियम, १९७२.**
- **परमिट रूम परवाना व लॉजिंग लायसन्स.**

**याशिवाय हॉटेल्स आणि परमिट रूम यासाठी आता ना-हरकत प्रमाणपत्र राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दिले जाते.**

# नक्षलींवर नियंत्रण...

**राज्याच्या पोलीस दलास नक्षली कारवायांवर नियंत्रण ठेवण्यात यश आले आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरण आणि शस्त्रसज्जता यामुळे हे यश मिळाले आहे. पोलिसांनी नक्षलग्रस्त भागात केलेल्या सामाजिक उपक्रमाचे देशभर कौतुक केले जात आहे.**




नक्षलग्रस्त भागातील आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना रोजगारासाठी उपयुक्त ठरतील अशी साधने व जीवनावश्यक वस्तू पोलीस दलामार्फत देण्यात येतात.

अंतर्गत सुरक्षेला सर्वात मोठे आव्हान असलेल्या नक्षल चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात १९८० च्या दशकात झाली. तत्कालीन आंध्रप्रदेश (सध्याचा तेलंगणा) मधून, या चळवळीने तेव्हा चंद्रपूर जिल्ह्याचा भाग असलेल्या सिरोंचा या भागात सर्वप्रथम शिरकाव केला. सुरुवातीला राज्याच्या गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ आणि नांदेड या ६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेली ही चळवळ आता संपूर्ण गडचिरोली जिल्हा आणि गोंदिया जिल्ह्याच्या काही भागात सशस्त्र स्वरूपात अस्तित्वात आहे. पोलीस दलाच्या बळकटीकरणासोबतच सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून त्यात बदल घडत आहे.

### पोलिसांच्या उपाययोजना

जिल्हा पोलिसांना नक्षलविरोधी अभियान राबवण्याकरिता पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, याकरिता केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या पाच बटालियन राज्य् राखीव दलाच्या नऊ कंपन्या तसेच भारत राखीव दलाच्या तीन कंपन्यांची तैनात करण्यात आली आहे. या अंतर्गत सर्वांच्या समन्वयातून कमी पल्ल्याचे तसेच लांब पल्ल्याचे अभियान, नक्षलविरोधी नाकाबंदी, नक्षलप्रतिबंधक कारवाई, संयुक्त आंतरराज्यीय अभियान, गुप्त वार्तांवर आधारित अभियान, एरिया डॉमिनेशन करण्याव्यतिरिक्त विशेष अभियान पथक सातत्याने राबवली जातात.

### विकासात्मक योजना

नक्षलवाद्यांचा मुक्त संचार आणि हिंसाचार थांबवण्यासाठी पोलिसांनी आक्रमक रणनीती

**राजेश येसनकर**

अवलंबिली आहे. तसेच शहरी भागात दर्शनी संघटनांची गुप्त माहिती मिळवणे, त्यांच्याकडे तरुण-तरुणींना आकर्षित होऊ न देणे, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत असलेल्या नक्षलविरोधी कक्षाच्या माध्यमातून लक्ष ठेवले जाते. सोबतच राज्य गुप्तवार्ता विभागाची (एसआयडी) एक विशेष चमू, अशा दर्शनी संघटनांची माहिती गोळा करण्याचे काम सातत्याने करीत आहे. तर जंगलात गोळीला गोळीनेच आक्रमकपणे उत्तर देण्यासाठी आणि नक्षलवाद्यांच्या दीर्घकालीन सशस्त्र रणनीतीचा प्रभावीपणे मुकाबला करता यावा, म्हणून, पोलिसांनी सी-६० हे विशेष कमांडो दल निर्माण केले आहे. यांना विविध ठिकाणी प्रशिक्षण दिले जाते. पोलिसांनी आक्रमक रणनीतींतर्गत एकूण ८८७ संयुक्त मोहिमा राबवल्या. त्यात नक्षलवाद्यांसोबत झालेल्या १९४ चकमकीत ५९ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले व ३८६ नक्षलवाद्यांना अटक केली आहे.

### काही प्रमुख योजना

- **ग्रामभेट :** पोलीस दलामार्फत नियमितपणे ग्रामभेटी होत असतात. गावागावांत जाऊन नागरिकांसोबत संवाद साधणे,

त्यांच्या तक्रारींची नोंद घेणे आणि सदर तक्रारी ज्या शासकीय विभागाशी संबंधित असतील. त्यांना कळवून; तक्रारींची पूर्तता झाली किंवा नाही, याबाबत खात्री करण्याचे काम पोलीस करीत असतात. गत पाच वर्षांत आतापर्यंत पोलिसांनी ३१ हजार ७४८ ग्रामभेटी केल्या आहेत.

- **जनजागरण मेळावे** : विविध शासकीय योजनांची माहिती एकाच ठिकाणी नागरिकांना मिळावी, या उद्देशाने पोलीस विभागाच्या वतीने जनजागरण मेळाव्यांचे आयोजन नियमितपणे केले जाते. आतापर्यंत ८०७ जनजागरण मेळावे पोलिसांनी घेतले आहेत. यादरम्यान नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडास्पर्धा आयोजित करण्यात येतात.
- **गती प्रकल्प** : आदिवासी युवक-युवतींना प्रशिक्षण व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने वाहनांकरिता बँकेमार्फत तत्काळ कर्जसुविधा, चालक परवाने, चालक प्रशिक्षण आदी उपलब्ध करून दिले जाते. आतापर्यंत या प्रकल्पांतर्गत ५६ जणांना गाड्यांचे वाटप करण्यात आले आहे.
- **नवजीवन योजना** : या योजनेंतर्गत पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी, चळवळीत कार्यरत असलेल्या नक्षलवाद्यांच्या कुटुंबीयांची गावोगावी जाऊन भेट घेतात. त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या घरातील नक्षल चळवळीत गेलेल्या सदस्याला शांततेचा मार्ग स्वीकारण्यासाठी परावृत्त करण्याचे आवाहन करतात. तसेच शासनाच्या आत्मसमर्पण योजनेंतर्गत मिळणारे लाभ व इतर सुविधांची माहिती देतात.

## आत्मसमर्पण योजना

**२९ ऑगस्ट २००५ पासून शासनाने चळवळीत भरकटलेल्या तरुण - तरुणींनी मुख्य प्रवाहात सामील व्हावे, या उद्देशाने आत्मसर्पण योजना सुरू केली. आत्मसमर्पण केलेल्यांचे अल्पावधीत शासनाकडून होणारे पुनर्वसन, त्यांना मिळणारी रक्कम, रोजगार आदी सुविधांमुळे गत काही वर्षांपासून चळवळीतील नक्षलवाद्यांचा आत्मसमर्पण करण्याचा कल वाढला आहे. २०१३ मध्ये ४९, २०१४ मध्ये ४०, २०१५ मध्ये ५६ आणि जुलै २०१६ अखेरपर्यंत ३१ असे साडेतीन वर्षांच्या कालावधीत तब्बल १७६ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. २००५ पासून आतापर्यंत हा आकडा एकूण ५६४ आहे. यात गडचिरोलीतील ५४५ नक्षलवाद्यांचा समावेश आहे. यामध्ये स्टेट झोनल कमिटी सदस्य, डिव्हीजनल कमिटी सदस्य, कमांडर, उपकमांडर, दल सदस्य, क्षेत्रीय/ग्रामरक्षक दल सदस्य, संगम सदस्य यांचा समावेश आहे.**

### नक्षलविरोधी प्रचार-प्रसार तंत्र

स्थानिक जनमानसांमध्ये असलेल्या प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधाला सशस्त्र प्रतिकारासाठी संघटित करण्यासाठी अतिरंजित आणि धांदात खोटा प्रचार करण्याच्या मनोयुद्ध तंत्रात; नक्षलवादी आणि त्यांच्या दर्शनी संघटना पारंगत आहेत. त्यांच्या या मनोयुद्धाचा प्रभावीपणे प्रतिकार करता यावा म्हणून प्रतिप्रचार तंत्र (काऊंटर प्रपोगंडा) विशेष माहिती व जनसंपर्क कक्ष, नक्षलविरोधी अभियानच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. नक्षलवाद्यांकडून सामान्य नागरिकांवर होणारा अत्याचार व मारहाण याबाबतची माहिती नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येत आहे. यासाठी परंपरागत माध्यमांसोबतच नव्या माध्यमांचा वापर केला जात आहे. जंगलात नक्षलवाद्यांचा प्रभावीपणे प्रतिकार करतानाच पोलीस विभागाच्यावतीने पोस्टर्सच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती स्थानिकांना मिळत आहे.

(लेखक हे नागपूर येथे नक्षलविरोधी अभियान, विशेष माहिती कक्षात साहाय्यक संचालक आहेत.)
संपर्क : ०९३२५०६९७१३

## महाराष्ट्र दर्शन सहल

**पोलीस विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्यावतीने आपला महाराष्ट्र सुवर्ण जयंती सहल योजना (महाराष्ट्र दर्शन) २०१३ पासून राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नक्षलग्रस्त आदिवासी दुर्गम भागातील शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या हेतूने व राज्याची झालेली आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगती याशिवाय शहरांची व तेथील जनजीवन, राहणीमान आदींची ओळख व्हावी, या उद्देशाने आतापर्यंत एकूण १२ सहली आयोजित करण्यात आल्या. यात आतापर्यंत एकूण ९७२ मुला-मुलींनी सहभाग घेतला असून नक्षलपीडित व नक्षल कुटुंबातील सदस्य यांनासुद्धा महाराष्ट्र दर्शन घडवण्यात आले आहे.**



# सुरक्षा महिलांची

**पुरोगामी महाराष्ट्रामध्ये पोलीस विभागाने कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसोबतच संवेदनशीलता जपत महिलांना सुरक्षाव्यवस्था पुरवली आहे. त्यामुळेच महानगरातील महिला रात्री उशिरापर्यंत निर्धास्तपणे कामे करू शकतात. विविध कायद्यांच्या माध्यमातून महिलांच्या न्याय्य हक्काचे रक्षण करणारे महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य ठरले आहे..**




महिलांवरील अत्याचार थांबवण्यासाठी शासनाकडून करण्यात आलेल्या विविध उपाययोजना करण्यात येतात.

महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचा निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्ह्यांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला साहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. हे महिला साहाय्य कक्ष महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी, त्या विभागातील अशासकीय संस्थांचीसुद्धा मदत घेतात.

## महिला सुरक्षा समिती (जिल्हा स्तरावर)

जिल्हा/आयुक्तालय पातळीवर तसेच पोलीस ठाणे पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हा/आयुक्तालय पातळीवर समिती, जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त/पोलीस उपआयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असून समितीत महिला डॉक्टर्स, महिला वकील, प्राध्यापिका तसेच सामाजिक कार्यकर्त्या यांचा समावेश करण्यात आला आहे. त्याच प्रकारे पोलीस ठाणे पातळीवर समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

## गंभीर गुन्ह्यांचा तपास

बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांचा तपास गतीने व्हावा तसेच या गुन्ह्यांना आळा बसावा याकरिता सर्व घटक प्रमुखांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने विविध गुन्ह्यांच्या तपासाची कार्यपद्धती तयार केली असून त्यामध्ये बलात्काराच्या गुन्ह्यांच्या प्रभावी तपासाबाबत मार्गदर्शक सूचना नमूद केल्या आहेत.

या सूचना सर्व पोलीस घटकांना वितरित करण्यात आलेल्या आहेत.

## हुंडाबळी प्रतिबंध

हुंडा पद्धत नष्ट करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात दक्षता समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. महिला व बाल विकास विभागाने प्रत्येक जिल्ह्यामध्ये हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. जिल्हा दक्षता समितीचे सदस्य असलेले पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक हे जिल्हा पातळीवर आणि महिला दक्षता (सुरक्षा) समितीचे सदस्य असलेले पोलीस निरीक्षक/ पोलीस अधीक्षक हे पोलीस ठाणे पातळीवर हुंडा प्रतिबंधक अधिकारी म्हणून नेमलेले आहेत.

## विशेष जलदगती न्यायालये

महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये विधी व न्याय विभागाने स्थापन केली आहेत.

महिलांवरील अत्याचाराबाबत प्रलंबित खटले तातडीने निकाली काढण्याच्या दृष्टीने २२ जलदगती न्यायालये चालवण्यास मुंबई उच्च न्यायालयाने मान्यता दिली आहे.

### छेडछाड व विनयभंग

छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग,शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना, नाकाबंदी, शाळा कॉलेजेसमध्ये कायद्यातील तरतुदींबाबत मार्गदर्शन या व यासारख्या अनेक उपाययोजना करण्यात येत असतात.

### कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण

पोलीस विभागामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळवादास प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सर्व पोलीस घटकांमध्ये तक्रार समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. याबाबत कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा-२०१३ देखील अमलात आला आहे.

### बालगुन्हेगारी रोखणे

सर्व घटक प्रमुखांना बालगुन्हेगारी रोखण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. विधिसंघर्ष बालकांसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक असे एकूण ३५ बाल न्याय मंडळे गठित करण्यात आली आहेत. एकूण १०५४ पोलीस ठाण्यांमध्ये एक पोलीस अधिकारी हा बाल कल्याण अधिकारी म्हणून नेमण्यात आला आहे. विधिसंघर्षग्रस्त बालके तसेच काळजी व संरक्षण आवश्यक असलेली बालके यांच्यासाठी महिला व बालविकास कार्यालयाकडून राज्य समन्वय समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.



सौजन्य: दक्षता

सर्व पोलीस घटकांच्या मुख्यालयात विशेष बाल पोलीस पथक स्थापन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये बालकल्याण समिती व विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी बालन्याय मंडळे गठित करण्यात आली आहेत.



## महिलांवरील अत्याचार प्रतिबंधात्मक टोल फ्री हेल्पलाइन

**संकटात सापडलेल्या महिलांच्या मदतीकरिता टोल फ्री हेल्पलाईन क्र. १०३ मुंबई, ठाणे व नवी मुंबई यांच्याकरिता व उर्वरित महाराष्ट्र राज्याकरिता १०९१ सुरू करण्यात आली आहे. २०१५ मध्ये या हेल्पलाइनवर ६,६७९ तक्रारी नोंदवण्यात आल्या. जानेवारी २०१६ अखेरपर्यंत ५०२ तक्रारी नोंदवण्यात आल्या.**

### बालकांच्या लैंगिक छळास प्रतिबंधक

या अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता सर्व पोलीस घटकांमध्ये मे २०१५ पर्यंत एकूण १५२ कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या असून १७०५ पोलीस अधिकारी व ४५४८ पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

### महिला विशेष समुपदेशन केंद्र

पीडित महिलांच्या साहाय्यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत जिल्हास्तरावर ३९ त ७२ तालुकास्तरावर याप्रमाणे १११ समुपदेशन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

### मोबाइल ॲप

संकटग्रस्त महिला व मुलींच्या सुरक्षिततेकरिता अकोला, बीड, उस्मानाबाद, परभणी, नागपूर ग्रामीण, वर्धा, अहमदनगर, रत्नागिरी, ठाणे ग्रामीण, नागपूर शहर, ठाणे शहर, औरंगाबाद शहर, सोलापूर शहर, नवी मुंबई व अमरावती शहर आदी शहरांमध्ये मोबाइल ॲप चालू केले आहेत.

या ॲपद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रारीनुसार मदत दिली जाते.

# अनैतिक व्यापारास प्रतिबंध

**अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध या विषयाबाबत प्रभावी व परिणामकारक कार्यवाही होण्यासाठी राज्य गुन्हे अन्वेषण विभागात अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात १२ घटकांमध्ये केंद्र शासन व राज्य शासनाच्या आधिपत्याखाली स्वतंत्र अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आला आहे.**



सौजन्य: दक्षता

## महिला पोलीस कक्ष

महिला व मुलींसंबंधात येणाऱ्या सर्व प्रकारचे गुन्हे नोंदवणे, त्यांचा तपास करणे, निर्गती करणे, महिलांच्या संबंधित येणाऱ्या सर्व अर्ज चौकशी करणे व या अनुषंगाने आवश्यक ठिकाणी प्रतिबंधक कार्यवाही करणे, समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करणे या प्रकारच्या समस्यांवर संवेदनशीलपणे व तत्काळ कार्यवाही करण्याकरिता सर्व पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आले आहे.



## एस.टी. स्टॅण्ड – महिला मदत केंद्रे

मानवी वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी महिला व मुलींच्या मदतीकरिता रेल्वे स्टेशन व एस.टी. बसस्थानकामध्ये महिला मदत केंद्र सुरू करण्यात आली आहेत. महिलांची छेडछाड, विनयभंग, बॅग चोरी इत्यादी गुन्हे रोखण्याकरिता महत्त्वाची बसस्थानके तसेच महत्त्वाच्या रस्त्यांवरील बसेस मध्ये सी.सी.टी.व्ही. बसवण्यात येत आहे.

## स्त्री भ्रूणहत्या रोखण्याकरिता

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र प्रतिबंधक अधिनियम-१९९४ आणि वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ या कायद्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरिता उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

## हरविलेल्या मुलांचा शोध

१८ वर्षांखालील हरविलेल्या मुलांची नोंदवहीत नोंद न घेता या प्रकरणी थेट अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात यावा व हा गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याच्या तपासाबाबत योग्य कार्यवाही तत्काळ करावी. हरवलेल्या बालकांसंबधी तपासाचा कालावधी ४ महिन्यांपेक्षा अधिक झाला असेल व शोधण्यास यश मिळत नसल्याने अशा तक्रारी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे पुढील तपासाकरिता सुपुर्द करण्यात याव्यात.

हरवलेल्या बालकांच्या तपासाकरिता सुधारित कार्यप्रणाली तयार करण्यात आलेली आहे.

## फौजदारी कायद्यात दुरुस्ती

**महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलित कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे. शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र.१३ पारित केला आहे.) त्यानुसार कलम ३५४ मध्ये सुधारणा केली आहे. त्याऐवजी कलम ३५४-अ,३५४-ब,३५४-क व कलम ३५४-ड, कलम ३७६ मध्ये सुधारणा केली आहे. कलम ३७५, ३७६,३७६-अ,३७६-ब,३७६-क व ३७६-ड अशी, कलम ३२६ मध्ये सुधारणा करून त्याऐवजी कलम ३२६-अ,३२६-ब तसेच ५०९ मध्ये सुधारणा करण्यात येऊन गुन्ह्यांच्या शिक्षेत वाढ करण्यात आलेली आहे.**

## कौटुंबिक हिंसाचार कायदा

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण करण्याकरिता कौटुंबिक हिंसाचार कायदा-२००५ अमलात आणला असून महिला व बालविकास विभागामार्फत या कायद्याची अंमलबजावणी केली जाते. याकरिता सर्व जिल्ह्यांमध्ये संरक्षण अधिकाऱ्यांची नेमणूक महिला व बालविकास विभागामार्फत करण्यात आली आहे.

## संवेदनशीलता

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची महिला व बालकांच्या तक्रारींप्रती संवेदनशीलता वाढावी याकरिता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या मूलभूत प्रशिक्षणामधील अभ्यासक्रमामध्ये सदर विषयाचा समावेश करण्यात आला आहे. तसेच केंद्र शासनाने इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठतर्फे, अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध संदर्भात ऑनलाइन कोर्स चालू करण्यात आला आहे.

**टीम लोकराज्य**

# दामिनी

**महिलांवरील अत्याचार कमी व्हावेत म्हणून सर्व पोलीस ठाण्यात दामिनी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. या पथकातील महिला पोलीस अंमलदार आपआपल्या हद्दीत महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी दुचाकीवरून किंवा चारचाकीमधून नियमित गस्त घालत असतात. राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस उपलब्ध आहेत.**

महिलांवरील अत्याचार थांबवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. महिलांच्या मदतीसाठी पोलीस ठाणे पातळीवर महिला सुरक्षा समिती, जिल्हा स्तरावर महिला साहाय्य कक्ष आणि राज्य पातळीवर महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. मनोधैर्य योजनेंतर्गत अन्यायग्रस्त महिलांना साहाय्य केले जाते.

जिल्हा पातळीवर हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी २७ विशेष न्यायालयांची स्थापना करण्यात आली आहे. महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी, बालकल्याण अधिकारी म्हणून नामनिर्देशन करण्यात आले आहे. पिडीत महिलांच्या साहाय्यासाठी १११ समुपदेशन केंद्रांची स्थापना करण्यात आली. प्रलंबित खटले तातडीने निकाली काढण्यासाठी २२ जलद गती न्यायालयास मान्यता दिली आहे.




### दामिनी पथक

महिलांवरील अत्याचार कमी व्हावेत म्हणून सर्व पोलीस ठाण्यात दामिनी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. या पथकातील महिला पोलीस अंमलदार आपआपल्या हद्दीत महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी दुचाकी किंवा चारचाकीमधून नियमित गस्त घालत असतात. राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस उपलब्ध आहेत.

### मोबाइल ॲप

महिलांच्या सुरक्षेसाठी प्रतिसाद मोबाइल ॲप तयार केले असून डाऊनलोड करण्यासाठी मदत करण्यात येत आहे. जून २०१६ अखेर ४१ हजारांपेक्षा जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे.

विनयभंगाच्या गुन्ह्यात दोषारोपपत्र २४ तासांच्या आत दाखल करण्यात येते. सिंधुदुर्ग, पुणे ग्रामीण, यवतमाळ, सोलापूर ग्रामीण व मुंबई रेल्वे या पोलीस घटकांनी २४ तासांच्या आत दोषारोपपत्र दाखल केल्याने संबंधित प्रकरणात आरोपीला शिक्षा झाली आहे. परिवहन विभागामार्फत बस व बसस्थानकांवर सी.सी.टी.व्ही. बसवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने राज्यात एकूण ४८ बस स्थानकांवर सी.सी.टी.व्ही. बसवण्याचे कामकाज सुरू आहे.

महिलांवरील अत्याचाराबाबत जागरुकतेसाठी विशेष शिबिरांचे आयोजन केले जाते. बचतगटातील महिलांना दुपारी १ ते ३ च्या सुमारास कायदेविषयक माहिती देण्यात येते. महिलांचे शेल्टर होम्स्, सुधारगृहे व महिलांची वसतिगृहे यांना पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी वरचेवर भेटी देत आहेत. विवाहपूर्व संबंधांमुळे होणाऱ्या फसवणुकीसंदर्भात प्रतिष्ठित लोक, धर्मगुरू, सामाजिक जाणीव असलेले नेते मंडळी यांच्याद्वारे समाज प्रबोधन करण्यात येत आहे. नोव्हेंबर २०१४ ते जून २०१६ या कालावधीत (एकूण २० महिने) साखळी चोरीचे ५७९३ गुन्हे दाखल आहे. या कालावधीची तुलना मार्च २०१३ ते ऑक्टोबर २०१४ (एकूण २० महिने) या कालावधीशी केली असता सोनसाखळी चोरीमध्ये ३४.४७% ने घट झाली आहे.

**खास महिलांकरीता टोल फ्री हेल्पलाईन नं.१०३ व १०९०**

सोनसाखळीचोरी करणाऱ्या आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी भारतीय दंड संहिता कलम-३७९ (अ/ब)ला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. भारत सरकारच्या मान्यतेसाठी ही अधिसूचना पाठवण्यात आली आहे.

# सुधारणा व पुनर्वसन

**'सुधारणा व पुनर्वसन' हे महाराष्ट्र कारागृहाचे उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी कैद्यांना वस्त्रोद्योग, सुतारकाम, शिवणकाम, लोहारकाम, चर्मकला, बेकरी, धोबीकाम, रंगकाम, कागद कारखाना अशा विविध उद्योगात रोजगार देण्यात येतो. यामुळे कैद्यांचे कौशल्य विकसित होऊन मुक्ततेनंतर पुनर्वसन होण्यास मदत होते..**



**नागपूर मध्यवर्ती कारागृहातील कैदी योगमुद्रा शिकताना.**

राज्यातील सर्व कारागृहात कैद्याचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने २१ जून २०१५ पासून योग शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या योग शिबिरात कैदी स्वेच्छेने आपला सहभाग नोंदवत असून नियमित योग करीत आहेत. ऑगस्ट-२०१५ पासून मे-२०१६ पर्यंत राज्यातील कारागृहातील ४०१५७ कैद्यांनी नियमितपणे योग शिबिरात सहभाग नोंदवला आहे.

नियमितपणे योग करणाऱ्या कैद्यांची या वर्षापासून दरवर्षी मे व ऑक्टोबर या महिन्यात स्थानिक योग विद्यापीठ किंवा योग समितीच्या सहकार्याने योगासनाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येत आहे.

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, यांनी मे व ऑक्टोबर या महिन्यात होणाऱ्या दोन्ही योगा परीक्षेत सहभाग घेऊन उत्कृष्ट गुण प्राप्त करणाऱ्या व नियमित योगा करणाऱ्या कैद्यांना त्यांच्या शिक्षेत ९० दिवसांपर्यंत माफी देण्याचे जाहीर केले आहे.

त्यानुसार मे-२०१६ मध्ये राज्यातील सर्व कारागृहात बंद्यांसाठी योगाच्या पहिल्या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेत भाग घेतलेल्या, परंतु ऑक्टोबर-२०१६ च्या दुसरी परीक्षा देण्याअगोदर कारागृहातून शिक्षा भोगून सुटणाऱ्या एकूण ८ कैद्यांना ३० ते ५० दिवस विशेष माफी देण्यात आली असून, त्यापैकी दोन कैद्यांना विशेष माफीचा फायदा मिळाल्यामुळे ते जुलै-२०१६ मध्ये कारागृहातून शिक्षा भोगून सुटले आहेत.

### टाटा ट्रस्ट सोबत सामंजस्य करार

कैद्यांचे पुनर्वसन/कल्याण, कायदेशीर मदत , आरोग्य इ. बाबींच्या अनुषंगाने कार्यवाहीकरिता राज्य शासन व टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर करारानुसार अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी व संनियंत्रण समिती गठित करण्यात आली आहे.

**समितीची कार्यकक्षाः** प्रकल्प अंमलबजावणीची सविस्तर व सर्वसमावेशक योजना तयार करून योजनेचा त्रैमासिक आढावा, प्रगती व अडचणी याबाबत देवाणघेवाण व उपाययोजना.

**समितीची जबाबदारी**

- पथदर्शी कार्यक्रमाचे कामकाज सुलभरीत्या राबवण्यात येत आहे. याबाबत खात्री करणे.
- शासनाच्या इतर विभागांबरोबर, तसेच बाह्य संस्थेबरोबर आवश्यक तेथे सहयोग करार करणे, प्रकल्प राबवताना वित्तीय, विधी आणि नैतिक मूल्यांची पूर्तता होत आहे, याबाबत खात्री करणे.
- संबंधित क्षेत्रातील प्रकल्प टीमला बैठकांबाबतची सूचना देणे.
- समाजसेवक व प्रकल्प कर्मचारी यांची पथकाला कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करणे, यामध्ये कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाच्या गरजा निश्चित करणे.
- समितीने तिचा वार्षिक अहवाल आढावा मूल्यमापन समितीस सादर करणे.

### शासन व टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये करार

- अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा,

यांच्यामार्फत शासनाची जबाबदारी

- न्यायाधीन व शिक्षाधीन बंद्यांना कारागृहात सुरक्षित ठेवण्यासाठी द प्रिझन्स क्ट १८९४, द प्रिझनर्स ॲक्ट १९००, ट्रान्स्फर ऑफ प्रिझनर्स ॲक्ट १९५०, द प्रिझनर्स टेंडन्स इन कोर्ट ॲक्ट १९५५, द सिव्हील जेल्स ॲक्ट १८७४ आणि बोर्स्टल स्कूल ॲक्ट १९२९ यांचा वापर केला जातो.
- कैद्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची काळजी घेणे व खात्री करणे.
- कैद्यांना त्याच्या खटल्याच्या सुनावणीसाठी संबंधित न्यायालयात हजर करणे.
- कैद्यांच्या पुनर्वसनाच्या संधी, सुधारण्यासाठी चालना व कौशल्य वृद्धिंगतासाठी कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.
- योग्य हस्तकला आणि ट्रेड यांचे प्रशिक्षण व संधी पुरवणे.
- कैद्यांसाठी सुटकेपूर्वी पुनर्वसन योजना राबवणे.
- कारागृहातील कैद्यांसाठी कल्याण, शिस्तबद्ध प्रशिक्षण, सुधारणा, पुनर्वसन इ. प्रकल्प राबवणे.
- शासन व टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार कैद्यांचे पुनर्वसन आणि सुधारणा करण्यासाठी, विशेष प्रकल्प राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी ५ मध्यवर्ती कारागृह (नागपूर/तळोजा/येरवडा/नाशिकरोड व औरंगाबाद) व किशोर सुधारालय, नाशिक येथे सुरू करण्यात आली आहे.
- हा प्रकल्प कल्याणकारी असून प्रायोगिक तत्त्वावर पुढील तीन वर्षे राबवण्यात येईल.

### बंदिवान कला रजनी 'तिमिरातून तेजाकडे'

कारागृह विभागाच्या वतीने हिवाळी अधिवेशनादरम्यान बंदिवान कला रजनी सन २०१५ 'तिमिरातून तेजाकडे' हा कार्यक्रम वसंतराव देशपांडे सभागृह, नागपूर येथे पार पडला.

या कार्यक्रमात नागपूर मध्यवर्ती कारागृह, अमरावती मध्यवर्ती कारागृह, मोर्शी खुले कारागृह, येरवडा मध्यवर्ती कारागृह कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह व नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह या कारागृहांमधील ९६ पुरुष व १२ महिला अशा एकूण १०८ बंद्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला. बंदी कलाकारांनी कार्यक्रम उत्कृष्टरीत्या प्रेक्षकांसमोर सादर केला. 'बाहेरील व्यावसायिक कार्यक्रमांपेक्षाही अतिशय सुंदर कार्यक्रम बंद्यांनी सादर केला' अशा शब्दात मा. मुख्यमंत्री यांनी या कार्यक्रमाचे व सर्व बंद्यांचे खूप कौतुक केले.



कारागृहातील कैद्यांनी तयार केलेल्या वस्तू.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या व पात्र असलेल्या बंद्यांना त्यांच्या शिक्षेत ९० दिवस विशेष सूट देण्यात आली आहे.

### गडचिरोली जिल्हा खुले कारागृह

७५ बंदीक्षमता असलेले गडचिरोली जिल्हा खुले कारागृह डिसेंबर २०१५ मध्ये कार्यान्वित करण्यात आले आहे. खुले कारागृहाच्या जेष्ठता सूचीनुसार बंदी वर्ग करण्यात आले आहेत.

कैद्यांना खुल्या कारागृहात वर्ग केल्याने जास्त माफीचा फायदा होऊन त्यांची कारागृहातून लवकर मुक्तता होण्यास मदत होईल.

### टेलीमेडीसीन

आजारी कैद्यांवर कारागृहातील वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्यानुसार उपचार करण्यात येतात. ज्या कैद्यांना शासकीय रुग्णालयात पुढील वैद्यकीय तपासणी व उपचारासाठी पाठविणे आवश्यक आहे परंतु, अल्प पोलीस पथकाअभावी त्यांना पाठविणे शक्य होत नाही; यास्तव नाशिक, येरवडा, मुंबई येथे प्रायोगिक तत्वावर टेली मेडिसिन सुविधा सुरू करण्यात येणार आहे. त्यायोगे सुरक्षा व्यवस्था अबाधित राहण्यास मदत होईल. मुंबई/नाशिक रोड/येरवडा कारागृह येथे प्रायोगिक तत्त्वावर टेलीमेडिसिन राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत सुविधा सुरू करण्याबाबत चाचणी करून, त्या अंतर्गत अनुदान प्राप्त करून घेण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

### आरोग्य योजना

पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची शारीरिक कार्यक्षमता चांगली राहण्यासाठी काहीही रोख रक्कम न भरता खाजगी रुग्णालयात त्वरित आरोग्य सेवा सुविधा मिळण्यासाठी 'पोलीस कुटुंब आरोग्य' योजनेच्या धर्तीवर कारागृह व सुधारसेवेतील गणवेशधारी अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता 'महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा बल कुटूंब आरोग्य योजना' राबवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा बल कुटुंब आरोग्य योजनेसाठी मेडी असिस्टंट हेल्थ



नागपूर मध्यवर्ती कारागृह परिसरात कैद्यांनी बनवलेल्या वस्तूंची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**'सुधारणा व पुनर्वसन' हे महाराष्ट्र कारागृहाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कैद्यांना वस्त्रोद्योग, सुतारकाम, शिवणकाम, लोहारकाम, चर्मकला, बेकरी, धोबीकाम, रंगकाम, कागद कारखाना अशा विविध उद्योगात रोजगार देण्यात येतो. कैद्यांना कार्यमग्न ठेवून विविध उद्योगांतून कैद्यांना प्रशिक्षण देण्यात येते. यामुळे त्याचे कौशल्य विकसित होऊन मुक्ततेनंतर पुनर्वसन होण्यास मदत होते.**

**मॉड्युलर एम्प्लॉयेबल स्किल्स (एमईएस) अंतर्गत महाराष्ट्र कैद्यांना प्रमाणपत्र देण्याची योजना राबवण्यात येत आहे. जेणेकरून बंदी कारागृहातून मुक्त झाल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी फायदा होईल.**

**एलईडी लाईट्सचे उत्पादन हा नावीन्यपूर्ण प्रकल्प भारत सरकारच्या महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकरण संघटन (एमगिरी) वर्धा यांच्या मदतीने अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे सुरू करण्यात आला आहे. अशाच प्रकारे इतर कारागृहातही लवकरच एलईडी लाईट्सचे उत्पादन करण्यात येईल. ज्याद्वारे कैद्यांचे कौशल्य विकसित होऊन मुक्ततेनंतर पुनर्वसन होण्यास मदत होईल.**

केअर या संस्थेबरोबर करार आहे.

### मेडीकल कॅम्प

कारागृहातील कैद्यांना वैद्यकीय तपासणीकरिता (त्वचारोग, टी.बी., हृदयरोग, कर्करोग, मलेरिया, कान, नाक, डोळा, इ. आजाराकरिता) बाहेरील शासकीय रुग्णालय येथे पोलीस पथकामार्फत पाठवणे जरुरीचे असते परंतु, पोलीस पथकाअभावी त्यांच्या आवश्यक तपासण्या होत नाहीत. त्यामुळे कैदी प्रशासनाविरुद्ध न्यायालयात/विविध वरिष्ठ कार्यालयास तक्रार करतात. यास्तव कारागृहांतच शासकीय रुग्णालय व अशासकीय संस्थेच्या मदतीने कैद्यांसाठी वेगवेगळ्या आजारावरील वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात येतात. कैद्यांना कारागृहाबाहेर पाठवल्यामुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत नाही. तसेच कारागृहांत अवैध वस्तूदेखील दाखल होण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक उपाय होऊ शकतो. ऑगस्ट-२०१५ ते मे-२०१६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय शिबिरांमध्ये एकूण ६४,१०५ कैद्यांनी या सोयीचा लाभ घेतला.

# नागरी हक्कांचे संरक्षण

**अनुसूचित जाती-जमाती या संवर्गातील नागरिकांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी नागरी हक्क संरक्षण विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या विभागामार्फत असे अत्याचार रोखण्यासाठी विविध उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या जातात.**


राज्यातील अनुसूचित जाती-जमाती या समाजातील घटकांवर होणाऱ्या अत्याचारासबंधीच्या प्रकरणाची, स्थानिक पोलिसांकडून प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी नागरी हक्क संरक्षण विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

### रचना

या विभागाचे प्रमुख विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी असून त्यांच्या आधिपत्याखली राज्याच्या पोलीस विभागाच्या परिक्षेत्राच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस निरीक्षक अथवा साहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस हवालदार/ पोलीस शिपाई यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत.

### तपास

अनुसूचित जाती/ जमातीच्या सदस्यांवर अत्याचार झाल्याबाबत तोंडी अगर लेखी तक्रार प्राप्त झाल्यावर, पोलीस ठाण्यात नागरी हक्क संरक्षण कायद्यांतर्गत, पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधीक्षक व तत्सम दर्जाचे परिवेक्षकीय अधिकारी हे घडलेल्या गुन्ह्याची योग्यरीत्या नोंदणी झाली किंवा नाही याची खात्री करतात. गुन्ह्याच्या तपासासाठी उप विभागीय पोलीस अधिकारी /साहाय्यक पोलीस आयुक्त यांची नेमणूक करून खटला मुदतीत न्यायप्रविष्ट करण्याची कारवाई करतात.



संबंधित अधिकारी गुन्हा दाखल झाल्यावर गुन्हास्थळी भेट देतात. स्थानिक पोलीस विभागाच्या तपासी अधिकाऱ्यांना गुन्ह्याच्या तपासाबाबत मार्गदर्शन करतात व राहिलेल्या त्रुटींबाबत सूचना देतात व मुदतीत दोषारोपपत्र सादर होण्याबाबत समन्वय साधून पाठपुरावा करतात.

### शांतता समिती बैठक

घटनास्थळी शांतता राखण्यासाठी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमून स्थानिक शांतता समितीच्या बैठका घेऊन, दलितांवरील अत्याचारांच्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत आवश्यक ती उपाययोजना करतात.



सौजन्य: दक्षता

### बैठका, कार्यशाळा सभा

नागरी हक्क संरक्षण कायद्याच्या जागृतीसाठी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या पुढाकाराने जिल्हा समाज कल्याण अधिकारी व जिल्हा आदिवासी विकास अधिकारी, महसूल अधिकारी व स्थानिक पोलीस अधिकारी यांच्यासह निवडक ठिकाणी तसेच संवेदनशील गावांमध्ये बैठका, कार्यशाळा, सभा घेतल्या जातात. नागरी हक्क संरक्षण विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या कार्यालयातून, या प्रकारातील गुन्ह्यांचा शोध प्रभावीपणे घेण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी माहितीपुस्तिका, पत्रके सर्व संबंधितांना नियमितपणे पाठवली जातात. समाज कल्याण विभागाकडून प्रसिद्धी व जनजागृतीसाठी प्राप्त झालेली भित्तिपत्रके महाराष्ट्रातील सर्व पोलीस ठाण्यात व जनतेच्या नजरेस पडतील अशा ठिकाणी लावण्यात येतात.

### प्रशिक्षण

महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक व राज्यातील इतर पोलीस प्रशिक्षण शाळांमध्ये येथील प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना या कायद्याच्या तरतुदी व अंमलबजावणीबाबतचे प्रशिक्षण दिले जाते.

# सामाजिक बहिष्कारमुक्ती

**फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांवर वाटचाल करणाऱ्या महाराष्ट्रामध्ये कोणत्याही पद्धतीचा सामाजिक बहिष्कार चालणार नाही, अशी ठाम भूमिका राज्य शासनाने घेतली असून, राज्यातील सर्व लोकसमूहाच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी कटिबद्धता व्यक्त केली आहे. एखाद्या व्यक्तींवर किंवा व्यक्तींच्या समूहावर तसेच, त्यांच्या कुटुंबातील सदस्यावर सामाजिक बहिष्कार घालण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) अधिनियम, २०१६ लागू करण्यात आला आहे.**

एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह यांच्यावरील सामाजिक बहिष्कार हा, संविधानाच्या भाग तीनमध्ये समावेश केलेल्या व्यक्तीच्या मूलभूत गरजा, हक्काचा भंग आहे.



सामाजिक बहिष्कार घालण्याची अमानुष प्रथा राज्याच्या विविध भागांमध्ये अजूनही प्रचलित असल्याचे निदर्शनास आले असून, या दुष्ट प्रथेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विद्यमान कायदे परिणामकारक नसल्याचे सिद्ध झाले आहे. लोककल्याणाच्या हितासाठी सामाजिक सुधारणेची एक बाब म्हणून सामाजिक बहिष्कारावर बंदी घालणे आवश्यक होते.

### प्रतिबंध

राज्यातील लोक आपल्या मानवी हक्कांसह सलोख्याने राहतात याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने एखाद्या व्यक्तीवर किंवा व्यक्तींच्या समूहावर तसेच, त्यांच्या कुटुंबातील सदस्यावर सामाजिक बहिष्कार घालण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तींचे संरक्षण (प्रतिबंध, बंदी व निवारण) अधिनियम, २०१६ लागू करण्यात आला आहे.

### अधिनियम

या अधिनियमामध्ये, जो कोणताही सदस्य किंवा सदस्यांचा समूह पुढीलपैकी कोणतेही कृत्य किंवा कृत्ये करील अशा कोणत्याही सदस्याने किंवा सदस्यांच्या समूहाने समाजातील सदस्यावर किंवा सदस्यावर सामाजिक बहिष्कार घातला असल्याचे मानण्यात येईल.

- जर तो आपल्या समाजातील कोणत्याही सदस्यास कोणत्याही सामाजिक वा धार्मिक रूढी, रीतीरिवाज वा विधी यांचे पालन करण्यास अथवा सामाजिक, धार्मिक वा सामूहिक कार्यक्रम, प्रार्थना सभा, समाजमेळावा, सभा किंवा मिरवणूक यांमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध करील किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील.
- जर तो त्याच्या स्वत:च्या समाजातील सदस्य बहुतकरून व सर्वसाधारणपणे पार पाडतात असे विवाह, अंत्यविधी किंवा इतर धार्मिक समारंभ आणि संस्कार पार पाडण्याचा त्याच्या समाजातील कोणत्याही सदस्याचा हक्क नाकारील किंवा तो नाकबूल करील अथवा तो नाकारण्याची किंवा नाकबूल करण्याची व्यवस्था करील.
- जर तो, कोणत्याही कारणांवरून वाळीत टाकणे किंवा टाकण्याची व्यवस्था करील.
- जर तो आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याचे जगणे दु:खीकष्टी होईल अशा तऱ्हेने त्या सदस्याला त्या समाजामध्ये सहभागी करून घेण्यास टाळाटाळ करील अथवा नकार देईल किंवा अशा सदस्याशी

असलेले सामाजिक किंवा व्यावसायिक संबंध तोडील.

- जर तो, जे ठिकाण त्याच्या स्वत: च्या समाजाच्या निधीतून त्या समाजासाठी आणि त्या समाजाच्या वतीने स्थापन केलेले असेल अथवा जे त्याच्या समाजाकडून पूर्णत: किंवा चालविले जात असेल आणि जे त्याच्या स्वत:च्या समाजातील इतर कोणत्याही सदस्याला किंवा सदस्याच्या वापरासाठी सामान्यत: उपलब्ध असेल अशा, धर्मादाय व धार्मिक किंवा सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही सदस्याला प्रतिबंध किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील.
- जर तो, आपल्या समाजाकडून वापरण्यात येणारी, किंवा वापरण्याचा उद्देश असलेली, अथवा त्याच्या समाजाच्या लाभाकरिता असलेली, कोणतीही शाळा, शिक्षणसंस्था, वैद्यकीय संस्था, समाजमंदिर विहार दालन (क्लब हॉल), स्मशानभूमी, दफनभूमी, किंवा इतर कोणत्याही ठिकाणी आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याला प्रवेश करण्यास अथवा त्यांच्या सुविधांचा वापर करण्यास प्रतिबंध किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील.
- जर तो, त्याच्या समाजाच्या लाभाकरिता निर्माण केलेल्या धर्मादाय विश्वस्त व्यवस्थेंतर्गत कोणताही लाभ मिळण्यापासून त्याच्या समाजातील कोणत्याही सदस्यास प्रतिबंध किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील.
- जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही सदस्यास आपल्या समाजातील सदस्याशी अथवा सदस्यांशी सामाजिक, धार्मिक, व्यावसायिक किंवा व्यापारविषयक संबंध तोडण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे चिथावणी देईल किंवा त्याला प्रक्षोभित करील किंवा प्रोत्साहन देईल.
- जर तो, सामान्यपणे त्याच्या समाजाच्या सदस्यांसाठी खुले असलेल्या कोणत्याही उपासना स्थळी किंवा तीर्थस्थळी प्रवेश करण्यास, तेथे राहण्यास किंवा अन्यथा त्याचा वापर करण्यास त्याच्या समाजातील कोणत्याही सदस्याला प्रतिबंध किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील.
- जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याला त्याच्या समाजातील इतर सदस्यांबरोबर तो सामान्यप्रणे प्रस्थापित करू शकेल किंवा ठेवू शकेल असे सामाजिक, व्यावसायिक किंवा व्यापारविषयक संबंध प्रस्थापित करण्यास किंवा ठेवण्यास प्रतिबंध किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील.
- जर तो, आपल्या समाजातील कोणताही मुलांना समाजातील विशिष्ट कुटुंब किंवा कुटुंबे यातील मुलांबरोबर एकत्रित खेळण्यास प्रतिबंध किंवा अडथळा करील अथवा प्रतिबंध किंवा अडथळा करण्याची व्यवस्था करील.
- आपल्या समाजातील कोणत्याही मानवी हक्क उपभोगण्यास अडथळा करील किंवा त्याबाबत नकार देईल अथवा अडथळा किंवा नकार देण्याची व्यवस्था करील.
- जर तो, नीतिमत्ता, सामाजिक स्वीकृती, राजकीय कल, लैंगिकता यांच्या आधारे किंवा इतर कोणत्याही करण्याच्या आधारे समाजातील सदस्यांमध्ये भेदभाव करील किंवा भेदभाव करण्याची व्यवस्था करील.
- जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याला कोणतेही विशिष्ट प्रकारचे कपडे परिधान करण्यास किंवा कोणत्याही विशिष्ट भाषेचा वापर करण्यास भाग पाडून सांस्कृतिक अडथळा निर्माण करील किंवा निर्माण करण्याची व्यवस्था करील.

**संकलन: मीनल जोगळेकर**

## काय होऊ शकते शिक्षा?

- **एखादी व्यक्ती आपल्या समाजातून कोणत्याही सदस्याला काढून टाकील किंवा काढून टाकण्याची व्यवस्था करील आणि जर तो, जे सामाजिक बहिष्कार ठरेल यांसारखी इतर कोणतीही कृत्ये करील त्या व्यक्तीस अपराध सिद्ध झाल्यानंतर एकतर तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कोणत्याही स्वरूपाची कारावासाची किंवा एक लाख रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा, त्या दोन्ही शिक्षा होतील.**
- **जी कोणी व्यक्ती, कलम ४ खालील अपराध करण्यास साहाय्य करील किंवा अपराध करण्यास प्रेरणा देईल अशा प्रत्येक व्यक्तीस, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक लाख रुपयापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, किंवा त्या दोन्ही शिक्षा होतील.**
- **जी कोणतीही जातपंचायत, सामाजिक बहिष्कार टाकील किंवा टाकण्याची व्यवस्था करील अशा कोणत्याही जात पंचायतीने या अधिनियमाच्या कलम ४ खाली अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि कलम ५ खाली शिक्षेस पात्र होईल.कोणताही अपराध हा, दखलपात्र व जामीनपात्र असेल आणि तो, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, यांच्याकडून न्यायचौकशीयोग्य असेल.**
- **बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकाऱ्याकडे एकतर पोलिसांमार्फत किंवा थेट, तक्रार दाखल करता येईल.त्या दंडाधिकाऱ्यास, पोलिसांना अन्वेषण करण्याचे निर्देश देता येतील.दंडाधिकाऱ्यास, बळी पडलेल्या व्यक्तीला व तिच्या कुटुंबाला न्यायचौकशीचा निर्णय होईपर्यंत त्यास आवश्यक वाटेल असे कोणत्याही प्रकारचे साहाय्य किंवा मदत करण्यास पोलिसांना व इतर संबंधित प्राधिकाऱ्यांनाही निर्देश देता येईल. राज्य शासनास, शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला सामाजिक बहिष्कार बंदी अधिकारी म्हणून पदनिर्देशित करता येईल.**

# उत्तम निवारा, उत्कृष्ट निवास

**पोलीस दलाच्या कर्मचाऱ्यांना २४तास कार्यरत असावे लागते. या कर्मचाऱ्यांसाठी कर्तव्यस्थळांच्या जवळ निवासाची उत्तम व्यवस्था असावी, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. किमान ८० टक्के पोलिसांना घरे मिळावीत, यासाठी गृहविभागाने लक्ष केंद्रित केले आहे. त्याअनुषंगाने सध्या पोलिसांच्या निवासस्थानांसाठी अनेक प्रकल्प राबवले जात आहेत.**

राज्यातील पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थाने उपलब्ध करून देण्यासाठी १ लाख घरे बांधण्याचा शासनाचा मानस आहे. राज्यात पोलीस अधिकारी व कर्मचारी मिळून २,२१,६८७ असे संख्याबळ आहे. या तुलनेत सद्य:स्थितीत उपलब्ध सेवा निवासस्थानांची संख्या ८६,५१५ इतकी आहे. मंजूर संख्याबळाच्या तुलनेत हे प्रमाण ३९.०२ टक्के एवढे आहे.

सेवानिवृत्ती तसेच भरती प्रक्रिया इत्यादींमुळे १०० टक्के पदे भरलेली नसतात त्यामुळे १०० टक्के ऐवजी निवासस्थानासाठी ८० टक्के उद्दिष्ट गृहीत धरल्यास एकूण १,७७,३४९ अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा निवासस्थाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

ही बाब विचारात घेतल्यास जवळपास ९०,८३४ एवढी सेवा निवासस्थाने कमी आहेत. त्यामुळे येत्या काही वर्षात जवळपास १ लाख सेवा निवासस्थाने बांधण्याचे उद्दिष्ट मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

### घरबांधणीला वेग

२०१४ पर्यंत पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने १२६१९ व सार्वजनिक बांधकाम विभागाने १३२१० एवढी घरे बांधलेली आहेत. याशिवाय म्हाडा व इतर संस्थांकडून ४०३९ इतकी तयार घरे विकत



वरळी येथील पोलीस निवासस्थाने.

घेतलेली आहेत. याप्रमाणे एकूण २९८६८ घरे उपलब्ध झाली आहेत. तथापि, मागणीच्या प्रमाणात ही घरे अल्प प्रमाणात असल्याने जास्तीत जास्त घरे बांधण्याची गरज निर्माण झालेली आहे.

ही गरज भागवण्यासाठी आगामी कालावधीमध्ये १ लाख सेवा निवासस्थाने बांधण्याचे उद्दीष्ट्य निर्धारित करण्यात आले आहे. हे उद्दिष्ट्ये पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या माध्यमातून तसेच इतर माध्यमातून पूर्ण करण्यात येतील.

८० टक्के पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना निवासस्थाने उपलब्ध करून द्यावयाचे उद्दीष्ट पूर्ण करावयाचे असल्यास त्यासाठी अंदाजे रुपये १२,६३७ कोटी इतक्या गुंतवणुकीची आवश्यकता भासेल. ही रक्कम उपलब्ध होण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रयत्न केले जाणार आहेत.

- सध्या प्राप्त होणाऱ्या नियमित अर्थसंकल्पीय तरतुदीतून जास्तीत जास्त निवासस्थाने बांधली जातील.
- पोलीस गृहनिर्माणासाठी सप्टेंबर २०१५ मध्ये नगररचना अधिनियमात दुरुस्ती करून ४ पर्यंत वाढीव चटईक्षेत्र मंजूर केले आहे. यामध्ये सार्वजनिक-खाजगी सहभागावर घरे बांधण्याची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीचा उपयोग करून मोठ्या प्रमाणात सेवा निवासस्थाने उपलब्ध केली जातील.
- हुडको किंवा अन्य वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन त्याचा उपयोग निवासस्थान बांधण्यासाठी केला जाईल.
- पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची पत क्रमवारी करून घेण्यात येईल आणि बॉन्ड्सद्वारे पतनिर्मिती केली जाईल.
- पोलीस कर्मचाऱ्यांच्या खाजगी सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल.
- म्हाडा, सिडको, झोपडपट्टी सुधारणा मंडळाकडून तयार घरे विकत घेतली जातील.

### उपलब्ध इमारती

माहूल येथील रिफायनरी परिसरात बांधलेली २४७६ घरे ताब्यात घेण्यात आली आहेत. किरकोळ दुरुस्त्या करून त्यांचे वाटप करण्यात येत आहे.

पोलीस निवासस्थानाच्या बहुसंख्य इमारती ब्रिटिश काळात किंवा ३० ते ४० वर्षापूर्वी बांधलेल्या आहेत. यातील बहुसंख्य इमारतीमधील सदनिकांचे क्षेत्रफळ १८० चौ.फूट. ते २२५ चौ.फूट. इतके अत्यल्प आहे. सद्य:स्थितीत मोठ्या आकारमानाच्या, कमीत-कमी ४०९ चौ.फूट. क्षेत्रफळाच्या सदनिका बांधण्यात येत आहेत.




## निवासस्थानांचा कायापालट...

**कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलिसांना सदैव तत्पर राहावे लागते. निकडीच्या प्रसंगी कार्यालयात किंवा आवश्यक जागी त्वरेने उपस्थित राहण्याकरिता त्यांचे निवासस्थान हे कार्यालयानजीकच असणे आवश्यक आहे. ब्रिटिश काळातही पोलीस कर्मचाऱ्यांसाठी तळमजल्याच्या दगडाच्या चाळी बांधल्या होत्या. सध्या काही जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या ब्रिटिशकालीन चाळी पाहायला मिळतात.**

**राज्य शासनाने पोलीस कर्मचाऱ्यांना कार्यालयाजवळ चांगली घरे कशी उपलब्ध करून देता येईल याचा सदैव विचार केला आहे. पोलीस कर्मचाऱ्यांच्या सोयीची घरे बांधण्यासाठी राज्याने १९७४ मध्ये 'महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई'ची स्थापना केली. हे महामंडळ १९९३ पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घरे बांधून घेत होते. मात्र पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी निवास्थानांची निकड बघता स्वबळावर प्रकल्पाचे बांधकाम करण्याचा निर्णय घेतला गेला. त्याचबरोबर अत्यंत निकड असल्याने ४०३९ तयारे घरे म्हाडा, सिडको व खाजगी संस्थांकडून विकत घेण्यात आली. २००१ पासून महामंडळाने पोलीस विभागांकरिता कार्यालये बांधण्याचे प्रकल्प हाती घेतले. महामंडळाने आजपर्यंत २९,९२४ निवास्थाने हस्तांतरित केली आहेत. पुढील पाच वर्षांत २५,००० घरे व प्रशासकीय इमारतीचे प्रकल्प पूर्ण केले जातील.**





# शांततेतून समृध्दीकडे

लोकाभिमुख शासनाचा अभिनव उपक्रम...

## महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम

**गावातील तंटे मिटवण्याकरिता लोकन्यायालये, पर्यायी तंटे मिटवण्याची व्यवस्था यासारख्या पर्यायी व्यवस्था उपलब्ध आहेत. तथापि, असे तंटे निर्माण होऊ नयेत, निर्माण झालेले तंटे गावपातळीवरच मिटवले जावेत, याकरिता 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम' लोकसहभागाद्वारे राबवण्यात येत आहे. माजी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री दिवंगत आर. आर. पाटील यांच्या प्रेरणेतून प्रारंभ झालेल्या या मोहिमेस अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला आहे.**

महाराष्ट्रात भक्ती संप्रदायाची सुरुवात तेराव्या शतकात झाली. या संत परंपरेमधून संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज अशा संतांनी महाराष्ट्राच्या जनतेला वैचारिक व मानसिक दिशा दिली. संतांच्या शिकवणुकीतील सलोखा व बंधुभावाचा प्रवाह गेल्या ७०० वर्षांपासून आजही अव्याहतपणे प्रवाहित होत आहे. महाराष्ट्राला लाभलेली ही वैचारिक पार्श्वभूमी तंटामुक्तीसारखी लोकचळवळ निर्माण होण्यास पोषक अशीच आहे. म्हणून भक्ती संप्रदायाने महाराष्ट्रात निर्माण केलेली आणि जनजागृतीच्या आधारे पूर्वापार खेड्यांमध्ये मान्यता पावलेल्या पंच पद्धतीसारखी पद्धती लोकसहभागातून आधारे उभी केली जावी

### उद्दिष्टे

- **अनिष्ट प्रथा व चालीरिती नष्ट करण्यासाठी लोकांमध्ये जागृती**
- **गावपातळीवर तंटे निर्माण होऊ नयेत म्हणून उपक्रम**
- **भ्रष्टाचार व भ्रष्टाचारी प्रवृत्ती कमी करण्यासाठी गावपातळीवर प्रयत्न**
- **दाखल असलेल्या व नव्याने निर्माण होणाऱ्या तंट्यांचे निराकरण**
- **लोकांच्या सहकार्याने अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्याचे निर्मूलन**

आणि या मोहिमेंतर्गत पात्र ग्रामपंचायतींना पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे, यासाठी १५ ऑगस्ट २००७ पासून राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुरू करण्यात आली आहे.

गावपातळीवर छोट्या-छोट्या कारणांवरून तंट्याची सुरुवात होते. या कारणांवरून निर्माण झालेला तंटा मोठा होऊन पुढे फौजदारी तंटा बनतो व त्यातून कुटुंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येते. पर्यायाने असे तंटे मिटविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेवरील व न्यायिक यंत्रणवेरील ताण वाढतो. तंटे मिटविण्याकरिता लोकन्यायालये, पर्यायी तंटें मिटवण्याची व्यवस्था यासारख्या पर्यायी व्यवस्था उपलब्ध असल्या, तरीही तंटे निर्माणच होऊ नयेत व निर्माण झालेले तंटे गावपातळीवरच मिटवले जावेत, याकरिता लोकसहभागातून व्यापक मोहीम राबवणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या पुरस्कारासाठी ग्रामपंचायत हा घटक निश्चित केला आहे.

### पुरस्कार

तंटामुक्त गावांना सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या आधारावर १ लाख रुपये ते१० लाख रुपयांपर्यंत रोख रक्कम आणि सन्मानचिन्हासह पुरस्कार देण्यात येतो. पुरस्कार जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर प्रत्येकी ३ प्रमाणे देण्यात येतात. त्याचप्रमाणे या योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास मोलाचे सहकार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी



यांनादेखील सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली आहे. या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी गाव, पोलीस ठाणे, तालुका व जिल्हा पातळीवर समित्या स्थापन करण्यात येतात. दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी गावपातळीवर ग्रामसभेद्वारे हे गाव महात्मा गांधी तंटामुक्त गावमोहिमेत सहभागी होत असल्याची घोषणा करण्यात येते.

### समोपचाराचा आधार

या मोहिमेंतर्गत गावातील फौजदारी, दिवाणी, महसुली व इतर तंटे सामोपचाराने तंटामुक्त गाव समितीमध्ये मिटवण्यासाठी प्रयत्न केले जातात. तंटामुक्त गाव घोषित करण्यासाठी गावातील या तंट्यांपैकी मिटविलेल्या तंट्यांसाठी एकूण २०० गुण ठरविण्यात आले आहेत. यापैकी १५० गुण तंटामुक्त गाव पुरस्कार प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे १९० पेक्षा अधिक गुण मिळविलेल्या गावांना विशेष पुरस्कार देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

### तंट्यात घट

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम राबवल्यामुळे गावातील फौजदारी, दिवाणी, महसुली व इतर तंटे फार मोठ्या प्रमाणात गावपातळीवरच मिटविण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील न्यायव्यवस्थेवरील कामाचा ताण कमी होण्यास तसेच गावात शांतता व सामाजिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली आहे. या सर्व कारणांमुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास अप्रत्यक्षपणे मदत होत आहे.

**या योजनेंतर्गत २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीत एकूण १८४६२ इतकी गावे तंटामुक्त झाल्याने त्या गावांना त्या वर्षामध्ये तंटामुक्त पुरस्कार देण्यात आला आहे. आतापर्यंत भंडारा, गोंदिया व लातूर हे जिल्हे १०० टक्के तंटामुक्त झाले आहेत. या कालावधीत या योजनेवर एकूण रु. ४४७.३० कोटी इतका खर्च झाला आहे. या योजनेमधून उपरोक्त कालावधीत एकूण १५६४५९९ इतके तंटे सामोपचाराने मिटवण्यात आले आहेत.**


ग्रामसभा

# इथे कर माझे जुळती...

**जवानांनी दाखवलेल्या शौर्यापासून इतरांना स्फूर्ती मिळावी, आपल्या कर्तव्यांची व राष्ट्रनिष्ठेची जाण प्रत्येकाच्या मनात तेवत राहावी, म्हणून शहीद जवानांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिनांक २१ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण भारतभर 'पोलीस स्मृतिदिन' या नावाने पाळला जातो.**

**देवेंद्र भुजबळ**



मुंबईतील मरिन ड्राइव्ह येथे असणारे शहीद पोलिसांचे स्मारक

देशाबाहेरील शत्रुंपासून राष्ट्राचे, राष्ट्रातील नागरिक, त्यांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी भारतीय संरक्षण दलाच्या लष्कर, वायु सेना आणि नौदलातर्फे अहोरात्र पार पाडण्यात येत असते. तर देशांतर्गत शत्रुंपासून, समाजविघातक कंटकांपासून नागरिकांच्या जीविताचे, मालमत्तेचे, कायदा व सुव्यवस्था पाळण्याचे कर्तव्य संबंधित राज्याच्या पोलीस दलांकडून करण्यात येते.

आपले कर्तव्य बजावताना काही वेळा पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचारी यांना वीरमरणदेखील पत्करावे लागते. अशा प्रकारे कर्तव्य बजावताना हौतात्म्य पत्करलेले पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण भारतभर 'पोलीस स्मृतिदिन' म्हणून पाळला जातो. त्याशिवाय भारतातील सर्व पोलीस दलांकडून कवायतींचे आयोजन करून १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट या कालावधीत कर्तव्य बजावताना वीरमरण आलेले पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आदरांजली वाहिली जाते. २१ ऑक्टोबर हा पोलीस स्मृतिदिन म्हणून पाळण्याचे मुख्य कारण म्हणजे २१ ऑक्टोबर १९५९ या दिवशी लडाख मधील भारतीय सीमेवरील बर्फाच्छादित व निर्जन अशा हॉटस्प्रिंग या ठिकाणी पोलीस दलातील १० जवान गस्तीवर असताना, दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांनी त्यांच्यावर अचानक केलेल्या हल्ल्याला कडवे आव्हान देत त्या १० जवानांनी शेवटच्या क्षणापर्यंत झुंज दिली, आणि ते वीरगतीला प्राप्त झाले होते. त्या



घटनेमुळे संपूर्ण भारतभर दुःखाची छाया पसरली होती. सदर वीरजवानांनी कर्तव्यें बजावत असताना अतिशय उच्च कोटीचे शौर्य दाखवले होते. जवानांनी दाखविलेल्या त्या शौर्यापासून इतरांना स्फूर्ती मिळावी, तसेच आपल्या कर्तव्याची व राष्ट्रनिष्ठेची जाण प्रत्येकाच्या मनात तेवत राहावी, म्हणून शहीद जवानांच्या स्मृतीप्रीत्यर्थ २१ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण भारतभर 'पोलीस स्मृतिदिन' या नावाने पाळला जातो.

महाराष्ट्रातील पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचारी हेदेखील वेळप्रसंगी आपल्या जिवाची बाजी लावून नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण करण्यात तसूभरही कमी नाहीत. मुंबईवर झालेल्या २६ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या हल्ल्यात शहीद झालेले सहपोलीस आयुक्त श्री. हेमंत करकरे, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री. अशोक कामटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय साळसकर, पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रकाश मोरे, पोलीस निरीक्षक श्री. बापूराव धुरगूडे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. बाळासाहेब भोसले, वाहनचालक श्री. अरुण चित्ते, सहायक पोलीस निरीक्षक श्री. तुकाराम ओंबळे, पोलीस कॉन्स्टेबल सर्वश्री विजय खांडेकर, श्री. जयवंत पाटील, श्री. अंबादास पवार, श्री. योगेश पाटील आदींची शौर्यगाथा तर आपल्या मनावर कायमची कोरली गेली आहे. आजपर्यंत महाराष्ट्र पोलीस दलातील २३१ अधिकारी आणि कर्मचारी आपले कर्तव्य बजावताना शहीद झाले आहेत.

(लेखक हे माहिती संचालक आहेत.)

# ‘मुस्कान’चा आनंद

**हरवलेल्या व बेवारस मुलांना त्यांच्या घरी नेऊन पालकांच्या स्वाधीन करण्यासाठी राज्यात प्रभावीपणे ऑपरेशन मुस्कान राबवले जात आहे. त्यामुळे ही मुले पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात येत असून त्यांचे भविष्य सुरक्षित व उज्ज्वल होण्यास मदत होत आहे.**



दिशाहीन झालेल्या बालकांना योग्य वळणावर आणून त्यांना सावरण्यास ऑपरेशन मुस्कानमुळे मदत झालेली आहे. या ऑपरेशनमुळे हरवलेल्या व पळवलेल्या बालकांना शोधण्याच्या प्रमाणात निश्चित वाढ झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयात श्री. कैलाश सत्यार्थी यांच्या बचपन बचाओ आंदोलन या संस्थेने बालकांच्या सुरक्षिततेचा व बालहक्कांचा प्रश्न या विषयाच्या अनुषंगाने एक याचिका दाखल केली होती. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यात ‘मुस्कान ऑपरेशन’ जुलै २०१५ ते जून २०१६ दरम्यान ४ वेळा राबवण्यात आले. या मोहिमेंतर्गत १२,९१२ लहान मुलामुलींना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले.

घरातील वातावरणास कंटाळून, बालमजुरी, प्रेमकरणे, शहरातील आकर्षण इ. कारणांमुळे पालकांपासून दुरावलेल्या सर्व बालकांचा शोध घेतला जातो. त्यांना पुन्हा त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले जाते. उर्वरित बालके बालकल्याण समितीकडे सोपवली जातात.

### ऑपरेशन मुस्कानची गरज

पोलिसांवरील वाढत्या कामाच्या ताणतणावामुळे हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुरेसा वेळ दिला जाऊ शकत नाही. यामुळे हरवलेल्या बालकांच्या आकडेवारीमध्येही दिवसेंदिवस वाढ होत गेली. हरवलेल्या बालकांचा शोध न लागल्याने त्यांच्या पालकांना मानसिक धक्का बसतो. ते वारंवार पोलीस स्टेशनला येऊन चौकशी करतात.

हरवलेली बालके ही वाईट वृत्तींच्या लोकांच्या सान्निध्यात आल्यास त्यांची पिळवणूक होऊ शकते. त्यांची अनैतिक मानवी वाहतूक, भीक मागणे, अमानवी परिस्थितीत काम करण्यास भाग पाडणे, या सारख्या घटना घडण्याची दाट शक्यता असते. भविष्यात गुन्हेगार निर्माण होऊ शकतात. या सर्व बाबींचा विचार करता ऑपरेशन मुस्कान ही मोहीम संवेदनशीलपणे आणि प्रभावीपणे राबवण्याची आवश्यकता होती. भविष्यात चांगली सुसंस्कृत पिढी घडवण्यासाठी या मोहिमेद्वारे हातभार लागणार होता. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील ४६ पोलीस घटकांमध्ये हे अभियान प्रभावीपणे राबवण्यात आले.

या मोहिमेंतर्गत घरातील वातावरणाने वैतागून घर सोडून गेलेली मुले, अपहरण झालेली मुले, घरातील बंधने आवडत नसल्यामुळे घरच्यांना वैतागून बाहेर पडलेल्या मुलांचा शोध घेण्यात आला. बालमजुरी, प्रेम प्रकरणे, शहरातील आकर्षण इत्यादी कारणांमुळे पालकांपासून दुरावलेल्या सर्व बालकांना शोधून काढण्यात आले. त्यांची व त्यांच्या पालकांची ओळख पटवली जाते. भेट घडवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी साहाय्य करण्यात येते. ही मोहीम राबवण्यासाठी पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

पोलीस ठाण्यामधील अभिलेखावरील सर्व हरविलेल्या बालकांची यादी करण्यात आली. संबंधितांच्या घरी जाऊन त्यांच्या पालकांना भेटून बालकांबद्दल सखोल चौकशी करण्यात आली. अशा मुलांचे पालक शोधण्यासाठी स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमे यांची मदत घेण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स मीडिया, मोबाइल, फेसबूक, व्हॉट्सॲपच्या मदतीने देखील मुलांचे पालक शोधण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे सापडलेल्या बालकांना त्यांच्या पालकांकडे सुपुर्द करून त्यांचे पुनर्वसन करण्यात आले.

### मोहिमेचे यश

- **राज्यात मिळालेली बालके – ४२९६**
- **मिळालेल्या बालकांपैकी पालकांकडे सोपवण्यात आलेली बालके – ३८९१**
- **बाल कल्याण समितीकडे सोपवण्यात आलेली बालके – ४०५**
- **परराज्यातील मिळालेली बालके – ३९**

**येथे शोधा हरवलेली बालके : www.trackthemissingchild.gov.in**

# येथे घडतात अधिकारी

**देशामध्ये प्रथमच 'महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक' या संस्थेस स्वायतत्ता प्रदान करण्यात आली आहे. यामुळे नवे अभ्यासक्रम तयार करण्यासाठी आणि आधुनिक व सुटसुटीत अशा पद्धती अवलंबिण्यासाठी सुलभता येईल. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्यातील व्यावसायिकता व गुणवत्ता उच्च दर्जाची ठेवण्यासाठी याठिकाणी स्मार्ट प्रशिक्षणावर विशेष भर दिला जातो.**





महाराष्ट्र पोलीस दलात २.२० लाख अधिकारी व कर्मचारी आहेत. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी व गुन्हेगारी नियंत्रणात राहावी, याकरीता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्यातील व्यावसायिकता व गुणवत्ता उच्च दर्जाची राखण्यासाठी महाराष्ट्र प्रशिक्षणावर विशेष भर दिला जातो.

प्रशिक्षणासाठी १०५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील १० पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये अत्याधुनिक सोयीसुविधा आहेत. अधिकाऱ्यांना प्रत्येक वर्षी कमीत कमी ६ दिवस उजळणी व तज्ज्ञ प्रशिक्षण देण्यात येते. महिला व पीडित वर्गावर होणाऱ्या गुन्ह्यांचे नियंत्रण, सायबर गुन्हेगारी, आर्थिक गुन्हेगारी या विषयांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. मागील दोन वर्षात १२४५ कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. याचा २५,९०६ पोलीस अधिकारी यांनी लाभ घेतला.

प्रशिक्षणाचा दर्जा उत्तम राखण्यासाठी २२५ डिजिटल क्लासरूम बनवण्यात आले आहेत. यामध्ये सर्व अत्याधुनिक शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे.



**महाराष्ट्र पोलीस अकादमी**

स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९०६ साली प्रथम फ्रेझर कमिशन यांच्या शिफारशीनुसार पुणे शहराबाहेर भांबुर्डा या ठिकाणी महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली. जून १९०९ मध्ये पोलीस प्रशिक्षण शाळा म्हणून, पुण्याहून नाशिक येथील त्र्यंबकरोडवर आरक्षित जागेवर प्रबोधिनीचे स्थलांतर झाले.

इंग्रज राजवटीपासून ते सन १९६० या कालावधीत भारतातील या एक अग्रणी पोलीस प्रशिक्षण संस्थेला; 'सेंट्रल पोलीस ट्रेनिंग स्कूल'

**किरण मोघे**

म्हणून संबोधले जाऊ लागले. महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, कर्नाटक, गोवा, सीपी ॲण्ड बेरार आणि पाँडेचेरी, दादरा व नागर हवेलीसह सध्याच्या पाकिस्तान देशातील सिंध प्रांतातील पोलीस अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण या ठिकाणी होत असे.

स्वातंत्र्योत्तर काळात सन १९६० मध्ये

पोलीस प्रशिक्षण शाळेचे उन्नत महाविद्यालयात परीवर्तन झाले. सुमारे २६७ एकर परिसरात ऐतिहासिक वारसा लाभलेल्या ५ इमारती, कवायत मैदाने, निवासालये व आंतरवर्ग इमारती विकसित झाल्या. या प्रशिक्षण महाविद्यालयाने महाराष्ट्र पोलीस दलास कर्तव्यदक्ष व कायद्याचे सखोल ज्ञान संपादन केलेले दर्जेदार पुरुष व महिला पोलीस अधिकारी दिले आहेत.

या महाविद्यालयाचा लौकिक लक्षात घेऊन




शासनाने सन १९८९ मध्ये या महाविद्यालयाला 'महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी' असा दर्जा बहाल केला. भारतीय दंड संहिता, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, भारतीय पुरावा कायदा या प्रमुख कायद्यासह केंद्र तथा राज्यांद्वारे प्रचलित शासन व्यवस्थेने संमत केलेल्या, विविध पूरक कायद्याचे सखोल ज्ञान प्रबोधिनीमधून प्रशिक्षणार्थींना प्रदान करण्यात येते. सक्षम नेतृत्व, निर्णयक्षमता, व्यावसायिक पारंगतता व जनतेचा लोकसेवक या नात्याने पुरवावयाच्या सेवेची जाणीव; अशा गुणांनी परिपूर्ण अधिकारी घडवण्यासाठी प्रबोधिनीने विविध अभ्यासक्रम राबवले आहेत.

## आधुनिक अभ्यासक्रम

सुधारित तीन टप्प्यांतील अभ्यासक्रम, नवीन संकल्पनाची ओळख, 'सामग्री आणि वेळ' हा प्राधान्य आधारित विषय, सायबर गुन्हे अन्वेषण, आर्थिक गुन्हे अन्वेषण, बेसिक फिजिकल एज्युकेशन ट्रेनिंग, फिजिकल फिटनेस ट्रेनिंग रोड-इन अँड वॉक, स्फोटक पदार्थ परिचय, जंगल कॅम्प विशेष प्रामुख्याने भर कुपी अभ्यासक्रम (कॅप्सुल कोर्सेस, मॉड्युल्स), विशिष्ट विषयांचे प्रत्यक्ष अनुभवात्मक शिक्षण, सादरीकरण, असाइनमेंट, प्रात्याक्षिक अनुकरण, कौशल्यपुर्ण प्रशिक्षण, सकारात्मक वृत्ती जोपासणे या व अशा अभ्यासक्रमांवर प्रबोधिनीत भर देण्यात येतो.

कुशल नेतृत्व व व्यावसायिक तसेच व्यक्तिमत्त्व विकास घडवण्याच्या दृष्टीने पोलीस विश्वातील तज्ज्ञ व जाणकार तसेच विविध क्षेत्रातील वरिष्ठ मान्यवर व्यक्तींना अतिथी व्याख्याते म्हणून प्रशिक्षणार्थींना व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित करण्यात येते. आतापर्यंत सुमारे ३८९ भा.पो.से. (आयपीएस) ८४२ पोलीस उपअधीक्षक आणि २३ हजार ७४४ पोलीस उपनिरीक्षक पुरुष व महिला पोलीस अधिकारी प्रशिक्षण घेऊन सेवेत दाखल झालेले आहेत. पोलिस विभागाव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यातील वनविभाग, राज्य उत्पादन शुल्क, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, केंद्रीय उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य निर्मिती कंपनी इ. विभागातील अधिकारी तसेच गोवा पोलीस अधिकाऱ्यांनाही महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. परविक्षाधिन पोलीस उपअधीक्षक सत्र क्र. २५ अन्वये ८ पुरुष व ६ महिला परिवीक्षाधीन पोलीस उपअधीक्षक असे एकूण १४ व प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र. ११४ मध्ये १८४ पुरुष व ५३ महिला असे एकूण २३७ प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

प्रबोधिनीच्या संकेतस्थळावर सेवाअंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमातील तज्ज्ञ व्याख्यात्यांचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तसेच पोलीस दलास उपयुक्त सुमारे १८ मार्गदर्शक पुस्तके, मोफत उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

## ई-लर्निंग

ई-लर्निंगद्वारे ॲनिमेशन, व्हिडिओ, ग्राफिक्स, गेमिंग इत्यादी डिजीटल तंत्राचा वापर करून उपयुक्त कायदे व त्यांच्या कार्यपद्धती इत्यादी साहित्यांचे सादरीकरण टॅब, लॅपटॉप, कॉम्प्युटर, मोबाइल फोन्स सारख्या आधुनिक साधनांद्वारे पोलीस दलातील अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया अमलात आणण्याच्या कार्यक्रमाचा शुभारंभ नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

देशामध्ये प्रथमच 'महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक' या संस्थेस स्वायतत्ता प्रदान करण्यात आली आहे. यामुळे नवे नवे अभ्यासक्रम तयार करणे आणि आधुनिक व सुटसुटीत अशा पद्धती अवलंबिण्यासाठी सुलभता येईल. महाराष्ट्र पोलीस दलातील, सरळसेवा पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकरिता नॅशनल पोलीस अकॅडमी, हैद्राबाद या ठिकाणी आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या धर्तीवर पोलीस नेतृत्व विकास कार्यक्रम (पोलीस लिडरशीप डेव्हलपमेंट प्रोग्राम) सुरू करण्यात येत आहे.

ई-ॲकेडमी - तंत्रज्ञानातील बदलांमुळे लोकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. यासाठी ई-ॲकेडमीच्या माध्यमातून या वर्षाखेरपर्यंत अनेक अभ्यासक्रम ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. समाजाच्या बदलत्या समस्या, बदलत्या गुन्हेगारीचे स्वरूप, पोलिसाप्रती समाजाच्या वाढलेल्या अपेक्षा विचारात घेऊन, पोलीस प्रशिक्षण आणि विकास समिती स्थापन करण्यात येत आहे. या समितीत आयआयटीचे प्राध्यापक, व्यवस्थापनातील तज्ज्ञ, समाजसेवेतील तज्ज्ञ (टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स) अशा व्यक्तींचाही समावेश करण्यात येणार आहे.

**(लेखक नाशिक येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४०४६७०८८७**

# पोलीस दलात कसे याल?

**पोलीस दलास मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची गरज भासते. गुणवत्तेच्या बळावर राज्यातील तरुण-तरुणी या दलात शिपाई ते पोलीस उपअधीक्षक पदापर्यंत सामील होऊ शकतात. पोलीस भरती अतिशय पारदर्शकरीत्या केली जाते. यामुळे जिद्द व चिकाटी असेल तर भरारी मारण्यात तुम्हाला कोणी रोखू शकत नाही.**

पोलीस दलात दाखल होण्यासाठी लेखी आणि मैदानी परीक्षेत यशस्वी व्हावे लागते. या भरतीसाठी २०० गुणांची परीक्षा घेण्यात येते. यापैकी १०० गूण लेखी परीक्षेला तर १०० गुण मैदानी परिक्षेसाठी असतात. मैदानी परीक्षेत पुलअप्स, लांबउडी, गोळाफेक आणि ११.५ सेकंदात १०० मीटर धावणे तसेच चार मिनिट पाच सेकंदात १६०० मीटर धावणे, असे प्रकार असतात. प्रत्येक चाचणीला वीस गुण देण्यात आले आहेत.

पोलीस भरतीसाठी शारीरिक पात्रता सर्वसाधारण उमेदवारांसाठी उंची १६५ सेंटीमीटर तर छाती ७९ ते ८५ असावी लागते. महिला उमेदवारांना केवळ १५५ सेमी उंचीची गरज असते. महिलांना पोलीस भरतीत प्राधान्य मिळावे म्हणून मैदानी चाचणी फक्त चार प्रकारची घेण्यात येते. यामध्ये १५ सेकंदात १०० मीटर धावणे, २ मिनिट ५० सेकंदात ८०० मीटर धावणे, गोळाफेक आणि लांबउडी असे प्रकार आहेत. प्रत्येकासाठी २५ गुण निश्चित ठेवण्यात आले आहे. पोलीस भरतीसाठी उमेदवार हा बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक असून, त्याचे शिक्षण महाराष्ट्र राज्यात झालेले असावे ही अट आहे. पोलीस भरतीमधील दुसरा प्रकार म्हणजे बँडपथक आणि खेळाडू हा आहे. जास्तीत जास्त उमेदवारांना संधी मिळावी म्हणून या उमेदवारांना उंचीमध्ये १.३० इंच सूट देण्यात आली आहे. बँडपथकासाठी दहावी उत्तीर्ण उमेदवारही पात्र ठरू शकतो. समांतर आरक्षणानुसार पदसंख्येची विभागणी करण्यात येते.



महाराष्ट्र पोलीस दलात सर्वसामान्य कुटुंबातील महिला मोठ्या संख्येने दाखल होत आहेत.

### लेखी परीक्षेचे स्वरूप

पोलीस भरतीसाठी उमेदवारांना शंभर गुणांची लेखी परिक्षा असून ही परीक्षा बहुपर्यायी स्वरूपाची असते. परीक्षेमध्ये विचारण्यात येणारे सर्व प्रश्न सामान्यज्ञान, अंकगणित, बुद्धिमापन चाचणी, मराठी व्याकरण आणि चालू घडामोडी यावर आधारित असतात.

या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवारांची लेखी आणि मैदानी दोन्ही प्रकारची तयारी उत्तम असावी लागते. पोलीस बॉईजच्या स्वरूपात पोलिसांच्या मुलांना मैदानी व लेखी परीक्षेबाबत पोलीस खात्यामार्फत मार्गदर्शन करण्यात येते. लेखी परीक्षेमध्ये सर्वसाधारणपणे सामान्यज्ञान या विषयावर ४० ते ५० प्रश्न, अंकगणित २० ते २५ प्रश्न बुद्धिमापन चाचणी २० ते २५ प्रश्न आणि मराठी व्याकरण २० ते २५ प्रश्न विचारले जातात. पोलीस भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक असून व्हिडीओ कॅमेरे

**नरेंद्र बेलसरे**

आणि थेट चित्रीकरणाच्या माध्यमातून जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या तर पोलीस आयुक्तालय असलेल्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्या आधिपत्याखाली ही निवड प्रक्रिया पार पाडली जाते. लेखी आणि मैदानी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची मुलाखत घेतल्यानंतर त्यांची निवड निश्चित केली जाते.

### पीएसआयची निवडप्रक्रिया

पोलीस सब इन्स्पेक्टर म्हणजे पोलीस

उपनिरीक्षक दर्जाचे हे पद अराजपत्रित असून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत ही भरती प्रक्रिया पार पडते. परीक्षेसाठी उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे. या पदाची निवड प्रक्रिया चार टप्प्यात पूर्ण होते. पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, मैदानी चाचणी आणि मुलाखत असे हे प्रकार आहेत.

पूर्वपरीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेला बसण्याची संधी मिळते. पूर्व परिक्षा ही बहुपर्यायी स्वरूपाची असून १०० गुणांची असते. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेची तयारी करण्यासाठी वेळ मिळतो. पोलीस उपनिरीक्षकांची मुख्य परीक्षा ४०० गुणांची असते. इंग्रजी आणि मराठी विषयावर प्रत्येकी १०० गुणांचे प्रश्न विचारले जातात. सामान्य ज्ञान, बुद्धिमापन चाचणी या विषयावर १०० गुणांचे प्रश्न विचारले जातात. मैदानी चाचणी आणि मुलाखत यासाठी १०० गुण निश्चित करण्यात आले आहेत. निवडीनंतर राज्यातील फौजदार पोलीस प्रशिक्षण केंद्रामार्फत १३ महिन्याचे प्रशिक्षण दिले जाते.

### उपअधीक्षक/एसीपीची निवडप्रक्रिया

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत या पदासाठी परीक्षा घेण्यात येत असून वरील पद हे राजपत्रित अधिकारी वर्ग १ दर्जाचे आहे. या पदाचा दर्जा उपजिल्हाधिकाऱ्याच्या बरोबरीचा असतो. या पदाची पूर्व परीक्षा सी-सॅट पद्धतीने घेतली जाते. यामध्ये ८० प्रश्न विचारण्यात येत असून प्रत्येक प्रश्नांना २.५ गुण म्हणजे २५० गुणांचा हा पेपर असतो. तर सामान्य अध्ययन या विषयावर १५० गुणाचे प्रश्न विचारले जातात.

यानंतर मुख्य परीक्षा ही ८०० गुणांची असते. मुख्य परीक्षेला सामान्य अध्ययनाचे ४ पेपर असून प्रत्येक पेपरला १५० गुण देण्यात आले आहे.

या परीक्षेत इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, नागरिकशास्त्र, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, चालू घडामोडी, पंचायत राज आणि समाजसुधारक या विषयावर प्रश्न विचारले जातात. भाषेचे दोन पेपर असून यामध्ये मराठी भाषा पेपर १०० तर इंग्रजी भाषा पेपर १०० गुणांचा घेण्यात येतो. मौखिक चाचणी आणि मुलाखतीसाठी शंभर गुण निश्चित करण्यात आले आहे.

सर्वसाधारणपणे बाजारात उपलब्ध असलेली प्रतिष्ठित लेखकांची पुस्तके, दैनिकांचे वाचन, दूरचित्रवाहिन्यांवरील बातम्या, चालू घडामोडी या विषयावरील नोंदी घेणे, निवड झालेल्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेणे याबाबींचे पालन केल्यास यशाच्या जवळ पोहोचण्यास मदत होते.



## यशाचा फॉर्म्युला

**कोणत्याही स्पर्धा परीक्षेत यश संपादन करण्यासाठी परिश्रमाची जोड असणे आवश्यक असते. पोलीस, पोलीस उपनिरीक्षक आणि पोलीस उपअधीक्षक या पदावर निवड होण्यासाठी दर्जेदार वृत्तपत्रांचे वाचन, स्पर्धापरीक्षा मासिक, ताज्या घडामोडी या विषयावर विशेष लक्ष असणे गरजेचे आहे. पोलीस आणि उपनिरीक्षक या पदासाठी शारीरिक चाचणीला खूप महत्त्वे आहे. यासाठी मेहनत घ्यावी लागते. मैदानी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्यांना अपात्र ठरविले जाते. त्यामुळे या पात्रतेकडे लक्ष वेधून तयारी करावी.**

(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)
संपर्क : ०९९२२७३२२३३

## शुभांगीच्या जिद्दीला सलाम




**अकोला** जिल्ह्यातील मंगरूळ कांबे या लहान गावातील शुभांगी सुभाष वाकोडे ही गरीब घराण्यातील मुलगी, पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊन सेवेत रूजू झाली आहे. पाच एकर कोरडवाहू शेती. त्यात सततची नापिकी. घरात पाच भावंड व आईवडील असा हा परिवार.

शुभांगी ही घरातील सर्वात मोठी असल्यामुळे लहानपणापासून तिला जबाबदारीची जाणीव झाली. सातवीपासून ती शेतीत काम करत होती. मात्र शिक्षणाची गोडी तिची कमी झाली नाही. मूर्तिजापूर या तालुक्याच्या ठिकाणी पदवीपर्यंत शिक्षण घेणारी शुभांगी कबड्डीची राष्ट्रीय खेळाडू बनली. यानंतर ती २००० मध्ये बुलडाणा जिल्हा पोलीसमध्ये कॉन्स्टेबल म्हणून भरती झाली.

अधिकारी बनायची तिची जिद्द होती. २००८ मध्ये ती पोलीस विभागाची खातेनिहाय परीक्षा उत्तीर्ण झाली. परंतु याच कालावधीत प्रसूतिरजेवर जावे लागल्यामुळे तिची ही संधी हुकली. परंतु जिद्द कायम होती. खातेनिहाय परीक्षा न देता सरळसेवा भरतीची तयारी सुरू केली आणि २०११ मध्ये ती पीएसआयची परीक्षा उत्तीर्ण झाली.

# दक्षता: रंजन आणि प्रबोधन







**दक्षता हे नियतकालिक राज्य पोलीस दलाचे मुखपत्र आहे. गेल्या सुमारे ४३ वर्षांपासून ते प्रसिद्ध होत आहे. दक्षताचा वाचकवर्ग हा २ लाखांपेक्षा जास्त आहे. या मासिकाचा विशिष्ट वाचकवर्ग लक्षात घेऊन त्याची रचना व मांडणी केली जाते.**

दक्षता हे राज्य पोलीस दलाचे मुखपत्र आहे. गेल्या ४३ वर्षांपासून हे मासिक दर महिन्याला प्रसिद्ध होत असते. त्यात अनेक मान्यवर लेखकांचे लेख सातत्याने प्रसिद्ध होत असतात. यामध्ये गुन्हेविषयक लेख, गुन्हा अन्वेषण, गुन्हेगारी कथा इत्यादी साहित्याचा अंतर्भाव असतो. याशिवाय विशेष वृत्त, विशेष लेख, पोलीस तपास, हितगूज, सत्यकथा, हास्यचित्र, आरोग्य विषयक माहिती, वेध भवितव्याचा, पुस्तक परिचय, कथा, कविता, वाचकांचे व्यासपीठ यांचाही समावेश असतो.

दहशतवाद, टोळीयुद्ध, नक्षलवाद, आर्थिक घोटाळे या विषयांवर वाचकांना खिळवून ठेवणारे लिखाण हे दक्षताचे वैशिष्ट्य आहे. यात विविध प्रसंगी सावधगिरी कशी बाळगावी याविषयी मार्गदर्शन केले जाते.

एखादी घटना घडल्यानंतर त्याचे कथात्मक रूपांतर यामध्ये दिले जाते. नागरिकांना गुन्हेगारी तसेच इतर गोष्टींविषयक माहिती उपलब्ध व्हावी, तसेच पोलीस व जनता या दोघांमध्ये दुवा साधता यावा, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तसेच आजच्या तरुण पिढीला लागलेल्या पैशाच्या आमिषापासून सावध करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न दक्षतामार्फत केले जाते. आजची तरुणपिढी गुन्हेगारी जगताकडे वळू नये, त्यांची दिशाभूल होऊ नये, यासाठीही विविध लेखांद्वारे प्रयत्न केले जातात.

दक्षता हे सर्वदूर वाचले जाणारे मुखपत्र असून त्याचा वाचक वर्ग हा २ लाखांपेक्षा जास्त आहे. या मुखपत्राची रचना ही वेगळ्या स्वरूपाची असते. दक्षतातील गुन्हेविषयक रोचक कथा वाचकांना खिळवून ठेवतात.

दक्षता मासिक अधिकाधिक रंजक व्हावे, यासाठी अनेक सदरांचा समावेश केला जातो. यामध्ये विविध खाद्यपदार्थ, प्रथमोपचार, आहार यांच्या टिप्स तज्ज्ञांकडून दिल्या जातात. युवकांना स्पर्धा परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शनही केले जाते.

**भूषण दूनबळे**
**नेलसन मिनेजीस**

**अभ्यास चालू आहे ना व्यवस्थित एवढचं विचारलं तर मला उलटून कार्ट विचारतयं, 'तपास चालू आहे ना... व्यवस्थित?'**




सौजन्य: दक्षता


**दक्षता**

**संपादक:** यशवंत नामदेव व्हटकर

**वार्षिक वर्गणी:** २५० रुपये

**पत्ता:** महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१

**दूरध्वनी क्र.:** ०२२-२२८३ ४५११

**ई-मेल:** mpd.dakshata@mahapolice.gov.in

# ‘हे’ आणि ‘ते’ म्हणजे काय?

**पोलीस विभागातील अनेक शब्द सर्वसामान्यांच्या आयुष्यात नियमित वापरात येतात. या विभागाच्या कार्यपद्धतीशी सर्वसामान्यांचा कधी ना कधी संबंध येतोच. त्यामुळे या विभागाशी संबंधित काही शब्द कानावर येत असतात. कायम वापरात येणाऱ्या या शब्दांबद्दलची माहिती उपयुक्त अशी आहे.**

### गुन्ह्याची पहिली खबर ( एफआयआर)

दखलपात्र गुन्ह्याबाबत पोलिसात दाखल केलेल्या पहिल्या लेखी तक्रारीला गुन्ह्याची पहिली खबर अर्थात प्रचलित शब्दामध्ये (एफआयआर) म्हटले जाते. ही तक्रार संबंधित पोलीस ठाण्यामध्ये दाखल केल्यानंतर पोलीस अधिकारी दखलपात्र गुन्ह्याच्या संदर्भातील कायदेशीर प्रक्रिया सुरू करतात. तक्रार दाखल करणाऱ्याची स्वाक्षरी यावर आवश्यक असून याची एक प्रत विनामूल्य तक्रारकर्त्याला देणे संबंधित पोलीस अधिकाऱ्याला बंधनकारक असते.

### (एफआयआर) दाखल करण्याची पद्धत

गुन्हा ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. त्या पोलीस ठाण्यामध्ये समक्ष जाऊन दखलपात्र गुन्ह्याबद्दल लेखी तक्रार दाखल केली जाऊ शकते.

जरी दूरध्वनीवरुन माहिती दिली गेली असली तरी पोलीस ठाण्यामध्ये जाऊन पुन्हा गुन्ह्याची पहिली खबर नोंदणे आवश्यक ठरते.

### दखलपात्र घटना किंवा दखलपात्र गुन्हा

भारतीय दंड संहितेच्या (१९७३) पहिल्या परिशिष्टामध्ये व अन्य कायद्याखाली नमूद केलेल्या निर्देशाप्रमाणे पोलीस अधिकाऱ्याला (वारंट शिवाय) अटक करण्याचे अधिकार असणाऱ्या घटनेला किंवा गुन्ह्याला दखलपात्र घटना किंवा दखलपात्र गुन्हा म्हटले जाते.

### अदखल पात्र गुन्हा (एन. सी.)

भारतीय दंड संहितेच्या (१९७३) व अन्य कायद्याखाली ज्या गुन्ह्यामध्ये अटक करण्याचे अधिकार पोलिसांना नसतात त्या गुन्ह्यांना अदखलपात्र गुन्हा म्हटले जाते.

### अदखलपात्र गुन्हा (एन. सी.) नोंदवता येतो काय?

गुन्ह्याची पहिली खबर दाखल करण्याच्या पद्धतीनेच अदखलपात्र गुन्हा नोंदवता येतो. तक्रार दाखल करणाऱ्याची स्वाक्षरी यावर आवश्यक असून याची एक प्रत विनामूल्य तक्रारकर्त्याला देणे संबंधित पोलीस अधिकाऱ्याला बंधनकारक असते. मात्र यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांना तपास सुरू करण्याचे अधिकार नसतात. तथापि याबाबतचे अधिकार असणारे न्यायाधीश यांनी निर्देश दिल्यास अशा अदखलपात्र प्रकरणात पोलीस अधिकारी चौकशी करू शकतो.

### तक्रार म्हणजे काय?

दंडाधिकारी किंवा न्यायाधीशांपुढे दाखल करण्यात आलेली लेखी किंवा तोंडी आरोप म्हणजे तक्रार होय. गुन्हेगारी दंड संहितेच्या अंतर्गत अशा तक्रारी लक्षात घेऊन गुन्हा केलेल्या ज्ञात किंवा अज्ञात व्यक्तींविरुद्ध कार्यवाही केली जाऊ शकते.

**संकलन : प्रवीण टाके**

**स्माईल प्लीज**




''पैशाचं पाकीट देतो, पण मिळाल्याची पावती पाहिजे, माझ्या बायकोला दाखवावी लागेल, नाहीतर ती विश्वास ठेवणार नाही!''

सौजन्य: दक्षता

# पोलीस आपल्या सेवेत...

**संकटसमयी आठवतात ते पोलीस. अशा प्रसंगी पोलिसांशी तत्काळ संपर्क साधता यावा, यासाठी खालील दूरध्वनी, भ्रमणध्वनी तसेच व्हॉट्सअॅप क्रमांकावर आपल्याला पोलिसांशी संपर्क साधता येईल..**

| **पोलीस मुख्यालय, मुंबई** | | | | |
|---|---|---|---|---|
| **कार्यालय** | **एसटीडी** | **टेलिफोन क्रमांक** | **फॅक्स क्रमांक** | **व्हॉट्सअॅप क्रमांक** |
| पोलीस मुख्यालय, मुंबई | ०२२ | २२८२२६३१/ २२०२६६३६/२२०२६६८० | २२०२६५६६ | ७५०६७७७१००/ ७५०६८८८१०० |

| **आयुक्तालय नियंत्रण कक्ष** | | | | |
|---|---|---|---|---|
| **कार्यालय** | **एसटीडी** | **टेलिफोन क्रमांक** | **फॅक्स क्रमांक** | **व्हॉट्सअॅप क्रमांक** |
| मुंबई शहर | ०२२ | २२६२१८५५/३०५४/ ५०२०/ २२६३३३३ | २२६३३३१९ | -- |
| नवी मुंबई शहर | ०२२ | २७५६१०९९/ २७५७४९२८/ २७५६६३७० | २७५७४९२९ | ८४२४८२०६६५, ८४२८८२०६८६ |
| ठाणे शहर | ०२२ | २५४४३६३६/ ३५३५/ २८२८/ २१२१/ ५३५३ | २५३४६६६० | ९७६९७२४१२७, ९९६९३६५१०० |
| पुणे शहर | ०२० | २६१२६२९६/ २६१२२८८०/ २६१२२२०२ | २६१२८१०५ | ८९७५२८३१००, ८९७५९५३१०० |
| नागपूर शहर | ०७१२ | २५६१२२२/ २५६४३३४/ २५६६८३२ | २५६६६६७ | ८०५५८७६७७३, ८०५५४७२४२२ |
| नाशिक शहर | ०२५३ | २३०५२३३/ २३०५२३४ | २३०५२१९ | ९६७३६७७७३१ |
| अमरावती शहर | ०७२१ | २५५१००० | २५५१०१० | ९९२३०७८६४६, ९९२३०७८६९६ |
| औरंगाबाद शहर | ०२४० | २२४०५०० | २२४०५९६ | ८३९००२२२२२, ७७४१०२२२२२ |
| सोलापूर शहर | ०२१७ | २७४४६००/ १०/ २० | २७४४६१८ | ९४२२९५०००३, ९४२३८८०००४ |

| **प्रादेशिक आणि जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष** | | | | |
|---|---|---|---|---|
| **पोलीस ठाणे घटक** | **एसटीडी** | **टेलिफोन क्रमांक** | **फॅक्स क्रमांक** | **व्हॉट्सअॅप क्रमांक** |
| अमरावती रेंज | ०७२१ | २६६३२५६ | २६६३२५६ | ७७१९९८५०००, ७७१९९८६००० |
| अमरावती ग्रामीण | ०७२१ | २६६५०४१ | २६६५०४१ | ७०३८६५६५४१, ७०३८६२२६५१ |
| अकोला | ०७२४ | २४४५३३३/ २४३५५००० | २४४५३१७ | ८८०५४५११००, ८८०५४६११०० |
| बुलडाणा | ०७२६२ | २४२४०० | २४२२४३ | ९४२२८८०११३, ९४२२८८०२१३ |
| वाशिम | ०७२५२ | २३४८३४ | २३३१९१ | ८६०५१२६८५७, ८६०५८७८२५४ |
| यवतमाळ | ०७२३२ | २५६७०० | २५६७१० | ७२६४८९७७७२, ९०११८९९८८८ |
| औरंगाबाद रेंज | ०२४० | २३३४३२४ | २३५८७३३ | ९५२७४८२२२२, ९५२७४७२२२२ |
| औरंगाबाद ग्रामीण | ०२४० | २३८१६३३/ २३९२१६६/ १५१ | २३९२६३३ | ९८८१९३२२२२, ७७६८९३२२२२ |
| उस्मानाबाद | ०२४७२ | २२२७००/ २२२९०० | २२७६२६ | ७५८८५२७६२०, ७२१८८०४००० |
| बीड | ०२४४२ | २२२३३३/ २२३४१४ | २२१३३३ | ७७४९०८९१०२ |
| जालना | ०२४८२ | २२४८३३/ २२५१०० | २२५३५२ | ९६०४१२११००, ९६०४१६११०० |
| गडचिरोली रेंज | ०७१३२ | २२२४२२/ २२३०१२ | २२२४२२ | -- |



महाराष्ट्र पोलीस

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गडचिरोली | ०७१३२ | २२२१००/ २२३१४२/ ९ | २२२५११ | ९४२१८४२३०२, ९४२२१५००८९ |
| गोंदिया | ०७१८२ | २३६१०० | २३६०९८ | ९४०५८३११००, ९४०५८४११०० |
| कोल्हापूर रेंज | ०२३१ | २६६७५३३ | २६६७५३३ | ९५५२३२८३८३, ७२१८०३८५८५ |
| कोल्हापूर ग्रामीण | ०२३१ | २६६२३३३/ २६५३१३१ | २६५१९११ | ९५५२३२८३८३, ७२१८०३८५८५ |
| सांगली | ०२३३ | २६७२१००/ २६७१०५५ | २६७२३२३ | ९७३०९२८९५८, ७८७५७१४८८३ |
| सातारा | ०२१६२ | २३३८३३/ २३११८१ | २३०२३२ | ९०११८१८८८ |
| पुणे ग्रामीण | ०२० | २५६५७१७१/ २५६७१९६२ | २५६७४६४१ | ९९२३४६३१००, ९४२२४०५४२१ |
| सोलापूर ग्रामीण | ०२१७ | २७३२०००/ ९/ १० | २७३२००८ | ७२६४८८५९०१, ७२६४८८५९०२ |
| नागपूर रेंज | ०७१२ | २५६१६२० | २५२८३१८ | -- |
| नागपूर ग्रामीण | ०७१२ | २५६०२००/ २५६६६५० | २५६०७७९ | ७७५८९०३०७९, ७७५८९०३०७५ |
| वर्धा | ०७१५२ | २३२५००/ २० | २३२५२१ | ८८८८६६७८१२, ८८८८३३८३५४ |
| भंडारा | ०७१८४ | २५२४०० | २५४२८७ | ९४०५८३११०० |
| चंद्रपूर | ०७१७२ | २५१२००/ २७३२५८ | २५५८०० | ९४०४८७२१०० |
| नांदेड रेंज | ०२४६२ | २५१२५३ | २५१४५१ | ७७९८७४४०४४, ८३०८९११२२२ |
| नांदेड | ०२४६२ | २३४७२०/ २३२८०६ | २३५१०३ | ८८८८८८९२५५ |
| परभणी | ०२४५२ | २२०१००/ २२६२४४ | २२३१५७ | ७७४५८५२२२२ |
| लातूर | ०२३८२ | २४२२९६ | २४३६३३ | ९२२७६४९१०० |
| हिंगोली | ०२४५६ | २२०२३२ | २२३२३३ | ९१५८०४४६२५, ९१५८०४२४८९ |
| नाशिक रेंज | ०२५३ | २५९८०११ | २५९८०११ | ८३९०८२४८३७, ८३९०८२९९३७ |
| नाशिक ग्रामीण | ०२५३ | २३०९७१५/ १७ | २३०९७१८ | ८३९०८२१९५२, ८३९०८२२३५२ |
| जळगांव | ०२५७ | २२२३३३३/ २२२५०३२/ २२२३५२३२, विस्तार - १०९१ | २२२०५११ | ९४२२२१०७०१, ९४२२२१०७०२ |
| धुळे | ०२५६२ | २८८२११/ २८८२१२ | २२९१८८ | ९४०४१५३५२०, ९४०४२५३५१९ |
| अहमदनगर | ०२४१ | २४१६१००/ २४१६१३२/ २४१६१३८ | २४१६१३३ | ९६६५८८७००९, ९१५६४३८०८८ |
| नंदूरबार | ०२५६४ | २१०१००/ ११० | २१०११० | ९४०५६२८३७१, ९४०५६२६३१५ |
| ठाणे रेंज | ०२२ | २७५७१५०३ | २७५७१५०३ | ९९८७१७८३८३ |
| ठाणे ग्रामीण | ०२२ | २५३४२७८४/ २५३०४८८३/ २५३९८५०० | २५३०४८७३ | ७०४५१००१११, ७५४५१००२२२ |
| पालघर | ०२५२५ | २९७००४/ २५२१००/ २५२३०० | २५२१०० | ९७३०८११११९, ९७३०७११११९ |
| रायगड | ०२१४१ | २२२१००/ २२२०२८/ २२८४७३ | २२८७८९ | ७०५७६७२२२७, ७०५७३६२२२६ |
| रत्नागिरी | ०२३५२ | २२२२२२/ २२३५३३/ २७१२५७ | २७१२५८ | ८८८८५०६१८१, ८८८८९०५०२२ |
| सिंधुदुर्ग | ०२३६२ | २२८२००/ १०९३ | २२८२०५ | ८२७५७७६२१३, ८२७५७७६२१६ |

**रेल्वे पोलीस नियंत्रण कक्ष**

| कार्यालयाचे नाव | एसटीडी | टेलिफोन क्रमांक | फॅक्स क्रमांक | व्हॉट्सअॅप क्रमांक |
|---|---|---|---|---|
| रेल्वे रेंज | -- | -- | २२०५१९१४ | -- |
| मुंबई रेल्वे | ०२२ | २३७५९२८३/ २३७५९२०१ | २३७५९२८० | ९८३३३१२२२२ |
| पुणे रेल्वे | ०२० | २५५४१६३१/ ५६ | २५५४१६३१ | ९४२२३२७१३०, ९४२२३२७१३१ |
| नागपूर रेल्वे | ०७१२ | २७४३९८४ | २७५५८३५ | ७७९८८८८८१३ |

सौजन्य: गृहविभाग

## डिसेंबर २०१८ पर्यंत सर्व ग्रामपंचायती डिजिटल




'आपले सरकार' अंतर्गत आणखी ५० सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय.

**सर्वसामान्य** माणसांची सर्व शासकीय कामे मोबाइल क्लिकवर होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डिसेंबर २०१८ पर्यंत सर्व ग्रामपंचायती डिजीटल नेटवर्कने जोडण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय जाहीर केला आहे.

मुंबईत सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या माहिती तंत्रज्ञानविषयक सोहळ्यात मुख्यमंत्र्यांनी सर्वसामान्य नागरिकांना थेट लाभ देणाऱ्या विविध डिजिटल उपक्रमांचा शुभारंभ केला. आपले सरकार या वेबपोर्टलमधून आतापर्यंत १५६ सेवा पुरवण्यात येत होत्या. १५ ऑगस्ट २०१६ रोजी या सेवांमध्ये आणखी ५० सेवा समाविष्ट करण्यात आल्या. येत्या २ ऑक्टोबरपर्यंत मोबाइल आधारित आपले सरकार मध्ये शासनाच्या सर्व सेवा देण्यात येणार आहे.

नागपूर जिल्ह्यातील तरोडी बुद्रुक गावातील शाळेत फ्युचर क्लासरूम, अंगणवाडी व रुग्णालयांमध्ये पहिल्या टप्प्यातील आधार नोंदणी आणि सेवा हमी कायद्यांतर्गत ५० सेवा ऑनलाइन करण्याचा शुभारंभही यावेळी करण्यात आला. विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटीची माहिती व्हावी, यासाठी काढण्यात आलेल्या सायबर सुरक्षा जागृती पुस्तिकेचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले. 'आपले सरकार'मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या योजनांमध्ये प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक तसेच अपंगांचे प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील गुणांची पुनर्मोजणी, दुय्यम गुणपत्रिका, दुय्यम पदवी प्रमाणपत्र, नवीन वीज पुरवठा अर्ज, सदोष विद्युत मीटर तक्रार आदींचा समावेश आहे. यावेळी 'आपले सरकार' वेबपोर्टलवर 'महायोजना' या नव्या सेवेचे लोकार्पण करण्यात आले.

## पोलीस महासंचालकपदी सतीश माथूर

**राज्याच्या** ४० व्या पोलीस महासंचालकपदी सतीश माथूर यांची १ ऑगस्ट २०१६ पासून निवड झाली. ते १९८१च्या तुकडीतील आयपीएस अधिकारी आहेत. कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक म्हणून त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. महाराष्ट्र पोलीसमधील जवळपास सर्वच विभागांमध्ये काम केल्याचा प्रदीर्घ अनुभव



त्यांच्याकडे आहे. त्यांनी केंद्र शासनाच्या काही महत्त्वपूर्ण पदांवर प्रतीनियुक्तीवर काम पाहिले आहे. १९९३ च्या बॉम्बस्फोटामधील महत्त्वपूर्ण खटल्याची कार्यवाही पार पाडलेल्या अधिकाऱ्यांपैकी ते एक आहेत. राज्य शासनाने नव्याने निर्माण केलेल्या पोलीस महासंचालक (विधी व तांत्रिक) या पदावर नियुक्त झालेले ते पहिले अधिकारी आहेत.

पोलीस महासंचालकपदाची जबाबदारी सांभाळण्यापूर्वी ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे महासंचालक (एसीबी) म्हणून कार्यरत होते. त्याचबरोबर पोलीस गृहनिर्माण व कल्याण विभागाचे महासंचालक म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय, पुणे पोलीस आयुक्त म्हणून काम पाहिल्यानंतर पाच वर्षे त्यांनी केंद्र सरकारच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर विविध विभागात कार्य केले. पोलीस दलाच्या कार्यात पारदर्शकता, लोकांचा सहभाग आणि पोलीस कर्मचाऱ्यांना उत्तम सुविधा बहाल करण्यावर त्यांचा भर आहे. पोलीस आणि जनता यांच्यातील समन्वय वृद्धिंगत व्हावा, यासाठी त्यांनी अनेक नव्या योजना राबवणे सुरू केले आहे.

## 'कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र'


**'कुशल** महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र' अभियानांतर्गत जावेद हबीब हेअर अँड ब्युटी लिमिटेडच्या माध्यमातून राज्यातील तीस हजार युवक/युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षणाद्वारे, रोजगारक्षम बनविण्यात येणार आहे.

'कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट्र' अभियानांतर्गत जावेद हबीब हेअर अँड ब्युटी लिमिटेड आणि कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांच्यामध्ये कौशल्य विकासाशी संबंधित सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत जावेद हबीब हेअर अँड ब्युटी लिमिटेड या संस्थेमार्फत ब्युटी आणि स्पा क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याची संधी मिळणार आहे.

**सामंजस्य कराराची वैशिष्ट्ये**

- **राज्यातील तीस हजार युवकांना कौशल्य विकास प्रशिक्षणाद्वारे, रोजगारक्षम बनवणे.जावेद हबीब हेअर अँड ब्युटी लिमिटेड यांच्यामार्फत येत्या तीन वर्षात ३० हजार युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.**
- **यावर्षी १० हजार युवक आणि युवतींना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. नागपूर, औरंगाबाद, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, ठाणे आणि नाशिक येथे प्रशिक्षण दिले जाईल.**
- **या प्रशिक्षणाचा कालावधी साडेतीन महिने असेल.**
- **ब्युटी सलून, स्पा, हेअर स्टाईलिंग यामध्ये जावेद हबीब यांच्यासारख्या जाणकाराकडून मार्गदर्शन मिळणार आहे.**

## 'मुंबई दर्शन सहल'




**महाराष्ट्र** पर्यटन विकास महामंडळ व बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन (बेस्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या 'मुंबई दर्शन सहल' या वातानुकूलित बसचे उद्घाटन नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

मुंबई दर्शन वातानुकूलित बसचे दर कमी असल्याने सामान्य जनतेला पर्यटन परवडणार आहे. या बसमुळे मुंबईतील सर्व महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळांची माहिती जगभरात जाईल. पर्यटनात गाईड हा महत्त्वाची भूमिका करत असतो. कारण त्यांच्यामुळेच सर्व देशी-विदेशी पर्यटकांना सर्व प्रेक्षणीय स्थळांची महत्त्वपूर्ण माहिती दिली जाते.

मुंबई दर्शन वातानुकूलित बस ही मुख्यमंत्र्यांच्या 'व्हिजीट महाराष्ट्र-२०१७' ची नांदी आहे. जगासमोर मुंबईची ओळख दाखविण्याचा हा प्रयत्न आहे. एका दिवसात मुंबईतील ६५ प्रेक्षणीय स्थळे, मार्गदर्शन करणारे गाईड, ऑडिओ-व्हिडिओ, अल्पोपहार हे सर्व माफक दरात वातानुकूलित बसमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

**जागतिक** आदिवासी दिनाचे औचित्य साधत आदिवासी विकास विभागाच्यावतीने भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ ९ ऑगस्ट २०१६ रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांच्या आहारातील उष्मांक आणि प्रथिनांमध्ये वाढ करण्याबरोबरच जन्माला येणाऱ्या सुदृढ बालकांचे प्रमाण वाढवण्यासाठी गरोदर स्त्रिया-स्तनदा मातांच्या आहारासाठी नोव्हेंबर २०१५ मध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू करण्यात आली. या अंतर्गत अंगणवाडी कक्षेत येणाऱ्या सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना या योजनेतून सहा महिन्याच्या कालावधीसाठी एकवेळेचा चौरस आहार देण्यात येत आहे.

गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीत, स्तनदा मातांना प्रसूतीनंतर तीन महिन्यांच्या कालावधीसाठी या योजनेचा लाभ देण्यात येत आहे. त्यामुळे उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण कमी होण्यास नक्कीच मदत होत आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार (एनएफएचएस-२०१५-१६) नागरी व ग्रामीण अशी वर्गवारी लक्षात घेता ग्रामीण भागातील स्त्रियांमधील ॲनिमियाचे प्रमाण अजूनही ४९.९ टक्के तर निकषापेक्षा बीएमआय कमी असलेल्यांचे प्रमाण ३० टक्के एवढे आहे. आदिवासी क्षेत्रात हे प्रमाण अधिक असल्याने गरोदर स्त्रियांना शेवटचे तीन महिने एक वेळा सकस आहार देण्याऐवजी आता गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून आहार दिल्यास ॲनिमियाचे प्रमाण कमी होऊन बीएमआय वाढवणे शक्य होऊ शकते. या उद्देशाने डॉ. भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेचे विस्तारीकरण करण्यात येत आहे.

## संत शिरोमणी श्रीसावता माळी शेतकरी आठवडी बाजार



**श्रीसंत** सावता माळी यांनी भाजीपाल्याच्या माध्यमातून ईश्वराशी संवाद साधला. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन सहकार, पणन, वस्त्रोद्योग विभाग आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने थेट शेतकरी ते ग्राहक या योजनेंतर्गत संत शिरोमणी श्री. सावता माळी आठवडी बाजाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य भाव, आणि ग्राहकांना वाजवी दरात भाजीपाला मिळवून देणार आहे.

विधान भवनाच्या प्रांगणात पहिल्या संत शिरोमणी सावता माळी शेतकरी आठवडी बाजाराचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. शेतकरी आठवडी बाजारात फक्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था यांचा समावेश असून, या माध्यमातून विविध प्रकारचा भाजीपाला व फळे एकाच ठिकाणी ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत.

## चिपळूण- कराड रेल्वे मार्गासाठी सामंजस्य करार

**कराड-**चिपळूण हा कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या १०३ कि. मी. लांबीच्या नवीन रेल्वे मार्ग योजनेला गती देण्यासाठी कोकण रेल्वे व शापूरजी पालनजी कंपनी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

पूर्वी घोषणा होऊनही प्रत्यक्षात येऊ न शकलेल्या अनेक प्रकल्पांना रेल्वे मंत्रालयाच्या गतिमान कार्यवाही व सहकार्यामुळे चालना मिळाली आहे. राज्यात अनेक नवे रेल्वे मार्ग आकारास येत आहे. वडसा (देसाईगंज) ते गडचिरोली हा नक्षलग्रस्त भागातील मार्ग, वर्धा- यवतमाळ- नांदेड हा शेतकरी आत्महत्याग्रस्त प्रदेशातील मार्ग, तसेच मराठवाडा- प. महाराष्ट्र यांना जोडणारा नगर-बीड हा मार्गही लवकरच पूर्णत्वास जाणार आहे. त्यामुळे या प्रदेशातील उद्योग, व्यापार व रोजगार वाढून या परिसराच्या विकासाला गती मिळेल. रेल्वेमुळे विकासाला मिळणारी चालना लक्षात घेऊन राज्य शासनाने विविध प्रकल्पांसाठी सुमारे १० हजार कोटी रुपयांचा निधी देण्याची तयारी दाखवली आहे.

### दृष्टिक्षेपात प्रकल्प

- **१०३ किमी लांबी**
- **३१९५. ६० कोटी रुपये मूल्य**
- **रत्नागिरी जिल्ह्यातून ३७ किमी, तर सातारा जिल्ह्यात ६६ किमीचा मार्ग**
- **कराड, चिपळूणसह विहाले, मुंढे, कोयना रोड, पाटण, शेडगेवाडी, खोडशी ही स्थानके**
- **सह्याद्री पर्वतरांगांतून जाणाऱ्या या मार्गामुळे आर्थिक विकासाला चालना**
- **चिपळूण ते कराड हे आताचे रेल्वेचे ४२५ किमीचे अंतर कमी होणार**
- **पर्यावरणाला हानी न पोहोचवता एकूण ४६ किमी लांबीचे अनेक बोगदे**

## स्मार्ट आणि सुरक्षित नागपूरसाठी एल अँड टी बरोबर करार

नागपूर शहर हे देशातील पहिले स्मार्ट आणि सुरक्षित शहर करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला असून त्यासाठी एल अँड टी ही कंपनी राज्य शासनाला सहकार्य करणार आहे. त्यासाठीचे हेतू पत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) या कंपनीला देण्यात आले आहे. सुरक्षित शहरांतर्गत नागपूरमध्ये सीसीटीव्ही आणि कमांड सर्व्हेलन्स यंत्रणा बसविण्यात येणार आहे. याबरोबरच राज्यातील नाशिक, औरंगाबाद आणि अमरावती ही शहरे स्मार्ट करण्यासाठी एच.पी. या कंपनीबरोबर शासनाने सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार ही कंपनी १८०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून ही शहरे स्मार्ट आणि डिजिटल सक्षम करणार आहे.

## ओबीसी, एसबीसी, भटक्या विमुक्तांसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा आता ६ लाख

**राज्यातील** शासनमान्यता प्राप्त, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्य शासनातर्फे राबवण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा साडेचार लाखावरून सहा लाख एवढी वाढवण्यात आली. या निर्णयाचा लाभ या प्रवर्गातील जास्तीच्या ६० हजार विद्यार्थ्यांना होईल. सध्या १,२०,००० विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतात.

## व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन मिशन

**शासकीय** योजनांच्या अंमलबजावणीसोबत खाजगी कंपन्यांच्या सहाय्याने खेड्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा नाविन्यपूर्ण अशा व्हिलेज सोशल ट्रान्फॉर्मेशन मिशनचा प्रारंभ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रारंभीच्या टप्प्यात राज्यातील एक हजार गावांचा कायापालट खाजगी सहभागाने करण्यात येणार आहे. शासनाच्या योजना राबवण्यात येत असताना काही घटकांबाबत शासन सहाय्यांच्या पलिकडील बाबींची आवश्यकता असते. ही दरी खाजगी कंपन्या भरून काढू शकतील. यासाठी हे अभियान सुरू करण्यात येत आहे.




राज्यातील गावांचा कायापालट करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सामाजिक उत्तरदायित्व कक्षाचे आणि त्याच्या www.sahabhag.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. प्रारंभी एक हजार गावे ही 'मॉडेल व्हिलेज' करण्यासाठी या कंपन्या सरसावल्या आहेत.

कार्पोरेट कंपन्यांच्या सहकार्याने राज्यातील खेडेगावांचा विकास करण्यासंदर्भात 'व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन मिशन'संदर्भात मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली.

येत्या २ ऑक्टोबरपासून किमान १०० गावांमध्ये हे अभियान सुरू करण्याचा प्रयत्न आहे. जल, जंगल, जमीन यांच्या माध्यमातून शाश्वत विकास करून गावांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोनातून जलसंधारण, कृषी क्षेत्राच्या आणि कौशल्य विकासासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. हे अभियान राबवण्यासाठी मेकॅनिझम तयार करण्यात येणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री अध्यक्ष असलेल्या गव्हर्निंग कौन्सिलची स्थापन करण्यात येणार आहे. एक हजार गावांपैकी ५० टक्के गावे सहभागी कार्पोरेट कंपन्या निवडणार असून उर्वरित ५० टक्के गावे ही मनुष्यबळ विकास निर्देशांकातील कमी निर्देशांक असलेल्या गावांतून निवडण्यात येणार आहेत. या गावांमध्ये २५ टक्के गावे आदिवासी असतील.

## राजभवनात ब्रिटिशकालीन बंकर

**गेली** अनेक दशके बंद असलेले १५० मीटर लांबीचे ब्रिटिशकालीन बंकर राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी शोधले आहे. मलबार हिल येथील राजभवनात हे भुयार सापडले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच या बंकरला भेट देऊन पाहणी केली. या बंकरचा शोध आश्चर्यकारक असल्याची प्रतिक्रिया श्री. फडणवीस यांनी दिली.


राजभवन येथे आढळलेले हे बंकर वैशिष्ट्यपूर्ण असून ते जतन करण्याचा मनोदय राज्यपालांनी व्यक्त केला आहे. तीन महिन्यांपूर्वी या ठिकाणी राहणाऱ्यांनी राज्यपालांना या बंकरविषयी सांगितले तेव्हा त्यांनी हे बंकर उघडण्याचे आदेश दिले. या बंकरमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या एकूण १३ खोल्या आहेत. त्यासाठी २० फूट उंचीचा दरवाजा आहे. बंकरच्या पश्चिमेला एक दरवाजा आहे. बंकरमध्ये मोठा पॅसेज असून छोट्या खोल्याही आहेत. हे बंकर सुमारे ५००० चौरस फुटांचे असून त्याचा वापर दारूगोळा, काडतुसे व इतर युद्धसाहित्य ठेवण्यासाठी केला जात होता.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीपासून बंद असलेले हे बंकर आश्चर्यकारकरीत्या सुस्थितीत आहे. बंकरला ड्रेनेज सिस्टिम असून हवा खेळती राहण्यासाठी व्यवस्था आहे.



राजभवनातील बंकर

## २ वर्षात नवी मुंबई ते गेट वे ऑफ इंडिया जलवाहतूक



**नवी** मुंबईतून मुंबई येथे जलदगतीने पोहोचता यावे, यासाठी येत्या २ वर्षात नवी मुंबई ते गेट वे ऑफ इंडिया दरम्यान जलवाहतूक सुरू करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

नवी मुंबई ते गेट वे ऑफ इंडिया जलवाहतुकीचा मार्ग तयार करण्यासाठी साधारणपणे १८ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. असे असले तरी या मार्गावरील सर्व सुरक्षा तपासून साधारणपणे मार्च २०१८ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यामुळे येत्या दोन वर्षात या मार्गावरील जलवाहतूक सुरू होईल. नवीन भाऊचा धक्का, मुंबई ते नेरुळ, नवी मुंबई अशी जलवाहतूक व्यवस्था तयार करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

# हाजराफॉल धबधबा

**जल, जंगल आणि जमीन यावर आदिवासी समुदायांचे जिवापाड प्रेम असते. यातूनच त्यांच्या आवडीच्या ठिकाणांना त्यांच्याकडून भावनिक महत्त्व दिले जाते. गोंदिया जिल्ह्यातील अशाच एका स्थळाला आता या समुदायाने आपल्या उपजीविकेचे साधन बनवले असून हाजराफॉल धबधबा आता विदर्भातील एक अभिनव पर्यटन स्थळ म्हणून पूढे आले आहे. नैसर्गिक सौंदर्य लाभलेल्या स्थळामुळे या परिसरातील आदिवासींच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण झाले आहे.**




आदिवासीबहुल, नक्षलदृष्ट्या संवेदनशील, दुर्गम, मागास असलेला गोंदिया जिल्हा जलसंपन्न आणि वनसमृद्ध आहे. नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या गोंदियात अनेक पर्यटनस्थळे आहेत. ही पर्यटनस्थळे पर्यटकांना येण्यासाठी खुणावत आहेत. गोंदियापासून ५५ कि.मी. अंतरावर असलेल्या आदिवासीबहुल व मागास सालेकसा तालुक्यातील नवाटोला हे आदिवासी गोंडबहुल समुदायाची वस्ती असलेले गाव. १२५ उंबरठ्याची वस्ती असलेल्या नवाटोलाची लोकसंख्या ८५७ इतकी आहे. नवाटोला गावाला लागूनच जंगल आहे. कोसमतर्रा ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या नवाटोला ग्रामस्थांनी २६

**विवेक खडसे**

जानेवारी २०१२ रोजी ग्रामसभेत निर्णय घेऊन नवाटोला संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना केली. समितीचे अध्यक्ष म्हणून रामदिन उईके, सदस्य सचिव तथा वनरक्षक सुरेश रहांगडाले यांच्यासह १५ सदस्य काम करीत आहे. वन विभागाने नवाटोला गावालगत असलेले २५० हेक्टर जंगल या समितीकडे संरक्षण आणि संवर्धनासाठी दिले. समितीने या जंगलात वृक्ष लागवड व संगोपनासोबतच चराई बंदी, कुऱ्हाड बंदी केली. वनराई बंधारे बांधून पाण्याची अडवणूक केली. तसेच अनेक उपक्रम या समितीने राबवले.

सालेकसा तालुक्यातील नवाटोला येथील संयुक्त वन व्यवस्थापन समितीने वन

भ्रमंती

विभागाच्या मदतीने जिल्हा पर्यटन समितीकडून मिळालेल्या निधीतून हाजराफॉल या पर्यटनस्थळाचा कायापालट करून मोठ्या प्रमाणात मध्यप्रदेश, छत्तीसगड व राज्यातील पर्यटकांना आकर्षित केले आहे. एवढेच नव्हे







तर अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील पर्यटकांनी ३ जुलै २०१५ रोजी हाजराफॉलला भेट देऊन झिकझॅक बॅलन्स व शिसा बॅलन्सचा आनंद घेतला. तब्बल ५० बेरोजगार आदिवासी युवक-युवतींना या पर्यटनस्थळाच्या विकासामुळे रोजगार उपलब्ध झाला आहे. हाजराफॉल धबधबा बघण्यासोबतच तिथला निसर्गरम्य परिसर आणि उपलब्ध असलेल्या साहसी खेळांच्या सुविधा पर्यटकांना आकर्षित करीत आहे. रोजगारानिमित्त इतरत्र स्थलांतर करणाऱ्या नवाटोला व धनेगाव येथील बेरोजगार आदिवासी युवकांना हाजराफॉलमुळे रोजगार मिळाला आहे.

निसर्गाच्या कुशीत वसलेला नयनरम्य हाजराफॉल धबधब्याचा परिसर विकासापासून उपेक्षित होता. उपवनसंरक्षक डॉ.जितेंद्र रामगावकर यांनी हाजराफॉल परिसराचा कायापालट करण्याचा संकल्प केला. एवढेच नव्हे तर नवाटोला संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून हाजराफॉल पर्यटनस्थळाचा विकास करून स्थानिक बेरोजगार युवक-युवतींना रोजगार उपलब्ध करून देण्याचा निश्चय केला.

जिल्हा पर्यटन समितीच्या माध्यमातून हाजराफॉलच्या परिसर विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला. वन विभागाने वन पर्यटन व इको टुरिझम अंतर्गत नवाटोला संयुक्त वन व्यवस्थापन समितीला ४६ लक्ष ८० हजार रुपये दिले. यातील काही युवक-युवतींनी साहसी खेळाचे प्रशिक्षण नॅशनल ॲडव्हेंचर फाऊंडेशन नागपूर, वॉटर स्पोर्ट ट्रेनिंग नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वॉटर स्पोर्ट गोवा, मनाली (हिमाचल प्रदेश) येथील अटलबिहारी बाजपेयी इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटनेरींग ॲण्ड अलाईड स्पोर्ट या संस्थेतून माऊंटनेरिंग कोर्ससुद्धा केला आहे.

पावसाळा आणि हिवाळ्याच्या दिवसातील पर्यटनस्थळ म्हणून नावलौकिक मिळविलेल्या हाजराफॉलचा आनंद घेण्यासाठी अनेकांची पावले इथे वळली आहे. इथल्या उंच पहाडावरून पडणाऱ्या धबधब्यातून उडणारे तुषार व त्यामधून तयार होणारे इंद्रधनुष्य, पक्षांचा किलबिलाट, धबधब्याचा धो-धो आवाज, जवळील रेल्वे बोगद्यातून जाणाऱ्या रेल्वेचा आवाज, मन प्रसन्न करणारी वनराई शरीराला नवीन ऊर्जा देते.

नवाटोला संयुक्त वन व्यवस्थापन समितीने गावातील बेरोजगार युवक युवतींना पर्यटन क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून दिला आहे. वनांचे रक्षण आणि संवर्धनासोबतच समितीने ग्रामस्थांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले आहेत. समितीने केलेले संयुक्त वन व्यवस्थापन व स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिल्याबद्दल, राज्य शासनाने सन २०१५-१६ चा संत तुकाराम वनग्रामचा ५० हजार रुपयांचा जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

**(लेखक हे गोंदिया येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.) संपर्क : ०९४२३४३४३०८**

## कौतुकास्पद


जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून लोकराज्य या सर्वाधिक खपाच्या मासिकाचा आदिवास ते अग्रक्रम हा विशेषांक आणि इंग्रजी आवृत्ती महाराष्ट्र अहेड प्रकाशित केला आहे. वाचून आनंद वाटला. त्याबद्दल टीम लोकराज्य चे मनापासून अभिनंदन.



आदिवासी समाजाच्या विकासासाठी राज्य शासन करीत असलेल्या प्रयत्नांचे आणि योजनांचे प्रतिबिंब या दोन्ही अंकात उमटले आहे. मुखपृष्ठापासून ते शेवटच्या पृष्ठापर्यंत लोकराज्यचा हा अंक वाचनीय आणि देखणा झाला आहे.

सर्वाधिक खपाचे मासिक असा सन्मान प्राप्त करणाऱ्या लोकराज्यच्या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या संस्कृतीची माहिती लाखो वाचकांपर्यंत पोहोचवल्यामुळे त्यांची ओळख सामान्यांना होणार आहे. आदिवासी समाजाविषयी अनेक पैलू आपण ह्या अंकात मांडल्याने हा अंक परिपूर्ण झाला आहे. लोकराज्य या विशेषांकाला संदर्भमूल्य असल्याने तो अभ्यासकांना उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

**- विष्णू सवरा, आदिवासी विकास मंत्री**




## वाटाड्या

ऑगस्ट महिन्याचा लोकराज्यचा आदिवासी विशेषांक उपयुक्त माहितीने परिपूर्ण आहे. आदिवासींच्या जीवनात परिवर्तन घडविणाऱ्या अनेक शासकीय योजनाचा हा एक खजिना आहे. हा अंक आदिवासी बांधवांच्या विकासात नक्कीच वाटाड्या ठरेल, यात शंका नाही.

**- अश्विनी थुट्टे, भरोसा, जि. बुलढाणा**

## ज्ञानाचा खजिना

लोकराज्यचा मी नियमीत वाचक आहे. प्रत्येक लेख अत्यंत महत्त्वपूर्ण व वाचनीय असतो. मंत्रिमंडळाच्या मुलाखती, विविध विकास योजनांची उपयुक्त माहिती अंकातून मिळते. आम्हा विद्यार्थी मित्रांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी लोकराज्य हे ज्ञानाचा खजिना आहे. लोकराज्य टीमचे खूप आभार..

**- तुकाराम ठोंबरे, रामनगर, ता. जि.जालना**

## अष्टपैलू

जून २०१६ चा अंक खूप आवडला. बाबासाहेबांचे जलनियोजन, आर्थिक धोरण कसे होते याचे विश्लेषण 'अष्टपैलू बाबासाहेब' या लेखात केले आहे.

**- मनिषा ज्ञानदेव कांबळे (शिंदे), ता. करमाळा जि. सोलापूर**

## सर्वसमावेशक

राज्याची कृषीक्षेत्रातील प्रगती दर्शविणारे जुलै २०१६ च्या अंकातील लेख शेतकऱ्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक आहेत. यूपीएससी/एमपीएससीसारख्या स्पर्धापरीक्षांतील यशवंतांच्या मुलाखती दीपस्तंभसारख्या मार्गदर्शक आहेत.

**- माणिक खैरनार, निवृत्त विक्रीकर निरीक्षक, औरंगाबाद**

## प्रेरणादायी

लोकराज्य या मासिकामध्ये येणारे स्पर्धापरीक्षांमध्ये यशस्वी उमेदवारांचे मनोगत, त्यांचा अनुभव प्रेरणादायी असते. स्पर्धा परीक्षेचे मार्गर्शन यातून आम्हाला मिळते. त्याचबरोबर लोकराज्याने महान क्रांतिकारकांचे चरित्रवर्णन थोडक्यात पण समर्पक शब्दात देणारे सदर सुरू करावे ही विनंती.

**- परेश महाजन**

## संग्राह्य अंक

मे २०१६ चा अंक माहितीपूर्ण आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजना व निर्णयांची आणि पर्यटन व रोजगार यांची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. संग्रही ठेवावा असाच हा अंक आहे.

**- महादेव शेडगे, सातारा (जावली)**

## जलव्यवस्थापनाचे मार्गदर्शन

जून २०१६ चा लोकराज्य अंक दुष्काळी परिस्थितीत पाणी वाया घालवणाऱ्या सर्वांच्याच डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा आहे. डॉ. मधुकर जाधव यांच्या 'छत्रपतींचे जलव्यवस्थापन' हा लेख अतिशय उत्तम व मार्गदर्शक आहे.

**- ज्ञानदेव कांबळे, ता. करमाळा,जि.सोलापूर**

### -: आपली पत्रे मिळाली :-

**ढेपले हरिदास, अमोल नागटिळे, श्रद्धा देसाई** (कलमठ-कणकवली, सिंधुदुर्ग), **बाळकृष्ण शिलवंत** (पुंडलीकनगर, चिखली-बुलढाणा), **उज्ज्वला राम शेळके** (राधिकानगर, तरोडा-नांदेड), **वाय. पी. गुरव**, लांजा, **सतीश नाईक**, आंबोडा, बुलडाणा, **मंगल राजाराम इंगोले**, जयपुर, वाशिम

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**

### वार्षिक वर्गणी

वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्च अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

✲ या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



कन्यागत महापर्वकाळ प्रारंभ
श्रीक्षेत्र नृसिंहवाडी, कोल्हापूर
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
आध्यात्म, पर्यावरण आणि प्रगती यांचा संगम
स्वागत...भक्तांचे
सुरक्षा...भाविकांची
सुविधा...जनतेची!
गंगे
कृष्णा
१२ ऑगस्ट २०१६ ते १२ सप्टें. २०१७
लाखो भाविक व पर्यटकांचे
सहर्ष स्वागत..
कन्यागत महापर्वकाळ
सोहळ्यासाठी कृष्णाकाठ सज्ज..
पवित्र तीर्थक्षेत्र पर्यटनात नृसिंहवाडीसह
परिसरातील मंदिरांना अवश्य भेट द्या...
भोजन पात्र मंदिर, शिरोळ
अमरेश्वर मंदिर, औरवाड
स्वयंभू गणेश मंदिर, गणेशवाडी
कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर
यासह कोल्हापूरच्या स्वागत परंपरेचा,
तिर्थक्षेत्र व पर्यटनाचा आनंद घ्या...
ना. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
ना.चंद्रकांत (दादा) पाटील
मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम,
पालकमंत्री, कोल्हापूर
मा. राजू शेट्टी
खासदार
मा. उल्हास पाटील
आमदार
कोल्हापूर जिल्हा पर्यटन समिती
www.facebook.com/Kanyagat
website : www.kanyagat.org
bit.ly/kanyagatytube

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th September 2016
Date of Publication : 10th of every Month




O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक ब्रिजेश सिंह, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह